




# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, बुधवार २५ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०







# एकाच कुटुंबातील तिघांचा भीषण अपघातात मृत्यू

## अहिल्यानगर जिल्ह्यातील घटना; चालकासह चौघे ठार, 13 वर्षीय मुलगा गंभीर

### मृतक पातुर तालुक्यातील मळसूर येथील रहिवासी

**पातूर/प्रतिनिधीः-** पातूर तालुक्यातील मळसूर येथील एकाच कुटुंबातील तिघांचा आणि वाहन चालकाचा भीषण अपघातात मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना मंगळवारी (दि. २४ फेब्रुवारी) पहाटे अहिल्यानगर जिल्ह्यात घडली. या घटनेमुळे मळसूर गावावर शोककळा पसरली असून पायघन कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पातूर तालुक्यातील मळसूर येथील पायघन कुटुंब रोजगाराच्या निमित्ताने श्रीगोंदा तालुक्यातील चिंभळे येथे वास्तव्यास होते. मंगळवारी पहाटेच्या सुमारास ते गावाहून चिंभळेकडे परतत असताना गोळगाव (कोळगाव) शिवारात त्यांच्या कारला दौंडकडून नगरकडे जाणाऱ्या भरधाव ट्रकने समोरून जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की कारचा अक्षरशः चेंदामेंदा झाला.





या अपघातात गजानन जनार्दन पायघन (वय ४७), दुर्गा गजानन पायघन (वय ३६) व त्यांचा मुलगा वैभव गजानन पायघन (वय १९) यांचा जागीच मृत्यू झाला. तसेच कार चालक नितीन अनिल कोकाटे (वय २२, रा. काष्टी) याचाही मृत्यू झाला. अपघातात करण गजानन पायघन (वय १३) हा मुलगा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमींना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. मात्र धडक भीषण असल्याने तिघांचा जागीच मृत्यू झाला होता. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविले. दरम्यान, पायघन कुटुंब मजुरी करून उदरनिर्वाह करत होते. कुटुंबातील कमावते व्यक्ती गमावल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर व नातेवाईकांवर मोठा आघात झाला आहे. मळसूर गावात शोकाकुल वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांनी हळहळ व्यक्त केली आहे. या प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

**पायघन कुटुंबावर दुःखाचा डोंगर!**

**रोजगाराच्या शोधात गाव सोडून परराज्यात नव्हे तर जिल्ह्यातीलच दुसऱ्या तालुक्यात स्थलांतर केलेल्या पायघन कुटुंबावर नियतीने घाला घातला. पहाटेच्या काळोखात झालेल्या या अपघातात कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाल्याने १३ वर्षीय करणवर मोठे संकट ओढवले आहे. एका क्षणात आई-वडील व भावाचा मृत्यू झाल्याने गावकऱ्यांमध्ये तीव्र हळहळ व्यक्त होत आहे.**

मुख्यमंत्र्यांची विधानसभेत माहिती

# 9 शेतक-यांनी आर्थिक विवंचनेतून किडन्या विकल्या!

**मुंबई/प्रतिनिधी :** सोलापूर आणि चंद्रपूरमध्ये खासगी सावकारांच्या जाचाला कंटाळून शेतक-यांनी कम्बोडिया आणि तामिळनाडूत जाउन किडन्या विकल्याची धक्कादायक माहिती विधानसभेत एका प्रश्नामुळे पुढे आली. या प्रश्नाला मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या लेखी उत्तरात एका हॉस्पिटलद्वारे चालविले जात आहे. या प्रकरणात आंतरराज्य व आंतरराष्ट्रीय मानवी अवयव तस्करीचे जाळे कार्यरत असल्याबाबत तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. हा प्रश्न चर्चेला आला नाही; पण प्रश्नाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या लेखी उत्तरात धक्कादायक माहिती पुढे आली.



चंद्रपूर जिल्ह्यातील एका शेतक-याने खासगी सावकाराच्या तगाद्यामुळे कम्बोडिया येथे जाउन ८ लाख रुपयांना किडनी विकली व कर्ज फेडले. पोलिस तपासात यातील मध्यस्थाने स्वतःसह ९ व्यक्तींच्या किडन्या कम्बोडिया आणि तामिळनाडूतील स्टार किम्स हॉस्पिटल येथे विकल्याचे समोर आल्याची धक्कादायक माहिती दिली.

या प्रकरणात सावकारी करणा-या ६ आरोपींबरोबरच किडनी खरेदी-विक्रीत सहभागी असणा-या अन्य ५ जणांना आरोपी करण्यात आले आहे. यापैकी ८ जणांना अटक करण्यात आली आहे. यातील एका आरोपीला फरार घोषित केले असून त्याचा शोध सुरू आहे, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. काँग्रेसचे ज्येष्ठ सदस्य नितीन राउत, भाजपचे अतुल भातखळकर व अन्य सदस्यांनी राज्यात सावकारी कर्जाच्या परतफेडीसाठी शेतक-यांना किडनी विकावी लागत असून किडनी विक्रीचे रॅकेट तामिळनाडू येथील तिरू चिरापल्ली येथील रोशन सदाशिव कुडे या चंद्रपूर जिल्ह्यातील दुधाचा व्यापार करणा-या अल्प भूधारक शेतक-याने खासगी सावकाराच्या जाचाला कंटाळून शेतक-याने कम्बोडियामध्ये जाउन किडनी विकली. हे किडनी रॅकेट तामिळनाडू येथील तिरू चिरापल्ली (तिरू ची) येथील एका हॉस्पिटलव्दारे चालवले जात असल्याबद्दल प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर मुख्यमंत्र्यांनी लेखी उत्तर दिले.

**सावकारी कर्ज फेडण्यासाठी शेतक-याने उचलले पाउल** तक्रारदार शेतक-याने सावकारांकडून ९ लाख १५ हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. या कर्जाच्या व्याजासह शेतक-याने आरोपींना ४८ लाख ५३ हजार रुपयांची ➪(पान २ वर)

# राज्यात वर्षभरात 48 हजार 278 महिला बेपत्ता

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यात २०२५ मध्ये एकूण ४८ हजार २७८ महिल्या हरविल्याची नोंद करण्यात आली आहे. तत्पूर्वी २०२४ मध्ये ही संख्या ४५ हजार ६६२ इतकी होती. यात अल्पवयीन मुलींची संख्याही अधिक आहे. २०२५ आणि २०२४ मध्ये अनुक्रमे १२ हजार ११३ अल्पवयीन मुली आणि ११ हजार ३१६ इतक्या अल्पवयीन मुली हरविल्याची नोंद करण्यात आली आहे. दरम्यान, हरविलेल्या एकूण महिल्यांपैकी २०२४ ला ३० हजार ८७७ आणि २०२५ मध्ये ३६ हजार ५८१ महिला मिळून आल्या आहेत. विधानसभेत लेखी तारांकित प्रश्नाच्या उत्तरात ही माहिती देण्यात आली आहे. राज्यात विशेषत; मुंबई, नवी मुंबई, रायगड, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर शहारातील अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याबाबत आमदार मंगेश कुडाळकर, प्रशांत ठाकूर, मनीषा चौधरी यांच्यासह अनेक आमदारांनी यासंदर्भात लेखी तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. त्या प्रश्नाच्या लेखी उत्तरात वरील माहिती देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भातील लेखी उत्तर दिले आहे. या लेखी उत्तरानुसार राज्यातील मुंबई शहर, नवी मुंबई, रायगड, नागपूर शहर आणि छत्रपती संभाजीनगर या ५ जिल्ह्यात २०२४-२०२५ रोजी एकूण ४ हजार ९८९ बालके हरविल्याची नोंद करण्यात आली होती. त्यापैकी ४ हजार ➪(पान २ वर)



# आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू शेगाव येथे करणार ‘राष्ट्रीय आरोग्य मेळावा-2026’ चे उद्घाटन

**मुंबई/प्रतिनिधी :** भारत सरकारचे आयुष मंत्रालय, अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २५ ते २८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथे चार दिवसांचा ‘राष्ट्रीय आरोग्य मेळावा २०२६‘ आयोजित करण्यात आला आहे.

औषधी वनस्पती लागवड आणि कृषी वनीकरणाद्वारे आयुष औषध प्रणालींबाबत सर्वसामान्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे , सर्वसमावेशक आरोग्य सेवा प्रदान करणे आणि शेतक-यांसाठी उपजीविकेच्या नवीन संधी निर्माण करणे हे या मेळाव्याचे उद्दिष्ट आहे. राष्ट्रीय आरोग्य मेळावा- २०२६ चे उद्घाटन बुधवार २५ फेब्रुवारी २०२६ रोजी मा. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते होणार आहे. उद्घाटन समारंभ संत गजानन महाराज संस्थानच्या विसावा मैदानावर होणार आहे. उद्घाटन समारंभ महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार व केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव आणि इतर अनेक मान्यवर पाहुण्यांच्या उपस्थितीत होणार आहे.

या संपूर्ण मेळाव्यात नागरिकांना आयुर्वेद, योग आणि निसर्गोपचार, युनानी, सिद्ध, सोवा रिग्पा, होमिओपॅथी आणि इतर पारंपारीक आरोग्यसेवा शाखांसह विविध आयुष प्रणालीं मार्फत मोफत आरोग्य तपासणी, वैद्यकीय सल्ला आणि औषधे घेण्याची संधी मिळेल. आयुष क्षेत्रातील उत्कृष्ट उत्पादन पद्धती, गुणवत्ता मानके आणि अलीकडील संशोधन प्रदर्शित करण्यासाठी अनेक प्रतिष्ठित आयुष औषधनिर्माण आणि वेलनेस कंपन्या या मेळाव्यात सहभागी होणार आहेत. त्याचबरोबर दैनंदिन आरोग्य गरजांसाठी औषधी वनस्पती आणि साध्या घरगुती उपचारांचे समर्पित प्रदर्शन देखील या मेळाव्यात भरवले जाणार आहे.



बुलढाणा जिल्हा आणि आसपासच्या भागातील शेतक-यांसाठी उत्पन्नाचा शाश्वत आणि लाभदायी स्रोत म्हणून कृषी वनीकरण आणि औषधी वनस्पतींची लागवड स्वीकारण्यास प्रोत्साहन देणारा एक विशेष उपक्रम यावेळी आयोजित करण्यात आला असून,तो या राष्ट्रीय आरोग्य मेळावा -२०२६ चे एक प्रमुख आकर्षण आहे. दि. २७ फेब्रु वारी २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता शेगाव येथील विसावा परिसरात ‘आयुर्वेदिक शेती, उत्पादन आणि विपणन‘ या विषयावर विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या महामेळाव्यात, शेतक-यांना वनोत्पादनांवर आधारित आणि औषधी पिकांची लागवड, प्रक्रिया, मूल्यवर्धन आणि विपणन यावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळेल जेणेकरून पारंपारिक शेती करणा-यांना आयुर्वेदिक शेतीसह ते करता येईल आणि त्यांच्या उत्पन्नात भर पडेल. केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी शेतक-यांना आयुर्वेदिक शेती आणि उत्पादन कार्यक्रमात सक्रियपणे सहभागी होण्याचे आणि पारंपारिक पिकांसोबत औषधी वनस्पती लागवडीची क्षमता शोधण्याचे आवाहन केले आहे.

शेतक-यांनी त्यांच्या जमिनीचा काही भाग औषधी वनस्पतींसाठी राखून ठेवल्याने शेतक-यांना शाश्वत आणि लाभदायी उत्पन्न मिळेल, तर नागरिकांना उच्च दर्जाचे नैसर्गिक उपचार पर्याय उपलब्ध होतील आणि आयुष मूल्य साखळी अधिक मजबूत होईल असे मत त्यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र आणि शेजारील राज्यांमधील नागरिक, शेतकरी, बचत गट, विद्यार्थी, आरोग्य स्वयंसेवक आणि आयुष भागधारक यांनी शेगावला भेट देउन राष्ट्रीय आरोग्य मेळावा २०२६ चा जास्तीत जास्त लाभ घ्यावा आणि या राष्ट्रीय कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात येत आहे.

# कंत्राटदारांचे तब्बल 77 हजार कोटी थकले

## राज्य कंत्राटदार महासंघाचा आरोप

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य सरकारच्या तिजोरीत निर्माण झालेल्या खडखडाटामुळे कंत्राटदारांचे तब्बल ७७ हजार कोटी रुपयांचे देणे थकल्याचा गंभीर आरोप राज्य कंत्राटदार महासंघाने केला आहे. विशेष म्हणजे शासनाने दिलेले चेकही ट्रेझरीमध्ये वटत नसल्यामुळे राज्याची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट झाली असून कंत्राटदारांनाही मोठे आर्थिक संकट आले असून त्वरित बिलाची रक्कम मिळाली नाही तर आंदोलनाचा इशारा कंत्राटदार संघटनेकडून देण्यात आला आहे. सोमवारपासून राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरु वात झाली आहे. त्यात ६ मार्च रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज्याचा अर्थसंकल्प मांडणार आहेत. या पार्श्वभूमीवर राज्याच्या तिजोरीत खडखडाट झाल्याची वस्तुस्थिती समोर आली आहे. राज्य कंत्राटदार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष मिलिंद भोसले यांच्या मते, राज्यातील कंत्राटदारांचे तब्बल➪(पान २ वर)



# मंत्रालयात लक्ष्मीदर्शन, झिरवळ राजीनामा द्या!

## मंत्रालयातील भ्रष्टाचार प्रकरणी विरोधकांचे विधानभवनाच्या पाय-यांवर आंदोलन

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याच्या विधीमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु आहे. आज अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा दिवस आहे. अधिवेशनाच्या दुस-या दिवशी मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या खात्यातील लाचखोरी प्रकरणामुळे सध्या वातावरण तापले आहे. आता मंत्रालयातील लाचखोरी प्रकरणाविरोधात विरोधकांनी जोरदार आंदोलन केले. विधानभवनाच्या पाय-यांवर विरोधकांकडून कडाडून विरोध करण्यात आला आहे. यावेळी नरहरी झिरवळ यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली. अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या मंत्रालयातील दालनात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईचे पडसाद आज विधानभवनात उमटले. मंत्रालयात लक्ष्मीदर्शन, झिरवळ राजीनामा द्या, अशी विरोधकांनी घोषणाबाजी केली. यावेळी विरोधकांनी विधानभवनाच्या पाय-यांवर जोरदार आंदोलन केले. सकाळपासूनच महाविकास आघाडीचे नेते आक्रमक पवित्र्यात दिसले. विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, आमदार सतेज पाटील आणि इतर प्रमुख नेत्यांनी विधानभवनाच्या पाय-यांवर ठिय्या मांडत आंदोलन केले. यावेळी फाईल हलते➪(पान २ वर)



# AI समिट गोंधळ- युवक काँग्रेस अध्यक्ष उदय भानू यांना अटक

**नवी दिल्ली-** दिल्लीत AI इम्पॅक्ट समिटमधील गोंधळ प्रकरणी इंडियन यूथ काँग्रेस (IYC) चे राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानु चिब यांना अटक करण्यात आली. २३ फेब्रु वारी रोजी दिल्ली पोलिसांनी त्यांना चौकशीसाठी बोलावले होते, जी २० तास चालली. मध्य प्रदेशातूनही ३ काँग्रेस नेत्यांना अटक करण्यात आली आहे. घटनेच्या दिवशीच ४ आरोपींना अटक करण्यात आली होती. या प्रकरणात आतापर्यंत ८ जणांना अटक झाली आहे. IYC चे राष्ट्रीय महासचिव शेष नारायण ओझा यांनी म्हटले आहे की, जेव्हा यूथ काँग्रेस नेत्यांनी विरोध केला, तेव्हा त्यांना देशविरोधी म्हटले गेले. ही तीच पद्धत आहे, जी इंग्रजांच्या राजवटीत वापरली जात होती. पंतप्रधान देशाच्या बरोबरीचे नाहीत. खरं तर, २० फेब्रु वारी रोजी इंडियन यूथ काँग्रेसच्या ११ सदस्यांनी भारत मंडपममध्ये घुसून AI समिटदरम्यान शर्टलेस होउन पंतप्रधान मोदींच्या फोटो असलेले टी-शर्ट फडकवले होते. यावेळी 'पंतप्रधान मोदी काम्प्रोमाइज्ड' अशा घोषणा देण्यात आल्या होत्या.

# केंद्रीय मंत्रिमंडळाकडून महाराष्ट्रासह 8 जिल्ह्यांतील रेल्वे मार्गवाढीच्या तीन मल्टी-ट्रॅकिंग प्रकल्पांना मंजुरी

## गोंदिया-जबलपूर मार्ग दुहेरीकरणाला मंजुरी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहार समितीने रेल्वे मंत्रालयाच्या सुमारे ९,०७२ कोटी रुपयांच्या तीन महत्त्वाच्या रेल्वे मार्गवाढीच्या प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. या प्रकल्पांमध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रातील गोंदिया-जबलपूर मार्ग दुहेरीकरणाचा समावेश आहे. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, बिहार आणि झारखंड या चार राज्यांतील८ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येणा-या या प्रकल्पांमुळे भारतीय रेल्वेच्या विद्यमान जाळ्यात सुमारे ३०७ कि.मी.ची भर पडणार आहे. यामध्ये गोंदिया-जबलपूर दुहेरीकरणासोबतच पुनारख-किउल आणि गम्हरिया-चांडिल या मार्गांच्या तिस-या आणि चौथ्या लाईनच्या कामांचा समावेश आहे.या प्रस्तावित मल्टी-ट्रॅकिंग प्रकल्पामुळे सुमारे ५,४०७ गावे आणि जवळपास ९८ लाख लोकसंख्येचा रेल्वे संपर्क अधिक सुधारेल. रेल्वे मार्गांची वाढलेली क्षमता वाहतूक व्यवस्थेत लक्षणीय सुधारणा घडवून आणेल, ज्यामुळे भारतीय रेल्वेची कार्यक्षमता आणि सेवा विश्वसनीयता वाढेल. या निर्णयामुळे रेल्वे संचालन अधिक सुलभ होईल आणि प्रवासी तसेच मालवाहतुकीतील गर्दी कमी होण्यास मोठी मदत होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नवीन भारत दृष्टिकोनानुसार हे प्रकल्प प्रादेशिक सर्वांगीण विकास साधण्यावर भर देतात, ज्यातून स्थानिक स्तरावर रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी वाढून नागरिक आत्मनिर्भर बनतील.



प्रधानमंत्री गति शक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅन अंतर्गत तयार करण्यात आलेल्या या प्रकल्पांचा मुख्य उद्देश एकात्मिक नियोजन आणि विविध घटकांच्या सल्लामसलतीद्वारे बहुमार्गीय संपर्क मल्टीमॉडेल कनेक्टिव्हिटीर आणि वाहतूक कार्यक्षमता वाढवणे हा आहे. यामुळे लोक, वस्तू आणि सेवांची अखंडित वाहतूक सुनिश्चित होईल. या क्षमता वाढीमुळे देशातील अनेक महत्त्वाच्या पर्यटन स्थळांपर्यंत रेल्वे संपर्क सुधारेल, ज्यात जबलपूरचे कचनार शिव मंदिर, बालाघाटमधील कान्हा राष्ट्रीय उद्यान, पेंच राष्ट्रीय उद्यान, धुआंधार धबधबा आणि दलमा वन्यजीव अभयारण्य यांसारख्या प्रसिद्ध स्थळांचा समावेश आहे. हे प्रकल्प कोळसा, पोलाद, लोखंड खनिज, सिमेंट, अन्नधान्य आणि खते यांसारख्या अत्यावश्यक वस्तूंच्या वाहतुकीसाठी महत्त्वाचे मार्ग उपलब्ध करून देतील. या रेल्वेमार्गांच्या विस्तारामुळे दरवर्षी ५२ दशलक्ष टन (MTPA) अतिरिक्त मालवाहतूक शक्य होईल. रेल्वे हा पर्यावरणपूरक आणि उर्जा-कार्यक्षम पर्याय असल्याने, हे प्रकल्प देशाच्या हवामान उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी सहायक ठरतील.

# लाडक्या बहिणींचा हप्ता जमा होण्यास सुरूवात

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांच्या खात्यात जानेवारी महिन्याचा हप्ता वर्ग करण्यास सुरु वात झाली आहे. महिला व बाल कल्याण विभागाने सोमवारपासून ही प्रक्रिया सुरू केली आहे. काल रात्रीपासून आतापर्यंत राज्यातील हजारो महिलांना हे पैसे मिळाले आहेत.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांना दरमहा १५०० रुपयांचे अर्थसहाय्य केले जाते. फेब्रु वारी महिना संपत आला तरी या महिलांना अद्याप जानेवारी महिन्याचा निधी मिळाला नव्हता. त्यामुळे हा हप्ता केव्हा मिळणार? असा सवाल उपस्थित केला जात होता. अखेर गत १८ फेब्रु वारी रोजी सामाजिक न्याय विभागाने महिला व बाल कल्याण विभागाला ९८ कोटींचा निधी वर्ग केल्यानंतर हा हप्ता जारी करण्याचा मार्ग मोकळा झाला होता. त्यानुसार, सोमवार रात्रीपासून पात्र लाभार्थी महिलांना हा हप्ता मिळण्यास सुरु वात झाली आहे. राज्य सरकारने गत डिसेंबर महिन्याचा लाभ जानेवारीच्या १४ तारखेला दिला होता. त्या अंतर्गत सुमारे १ कोटी ६० लाख महिलांच्या खात्यात रक्कम वर्ग करण्यात आली होती. तत्पूर्वी, सरकारने सर्व लाभार्थ्यांना ई-केवायसी करणे बंधनकारक केले होते. त्यात अनेकांची केवायसी चुकल्यामुळे त्यांचे नाव लाभार्थ्यांच्या यादीतून कापले गेले होते.






# श्री हव्याप्र मंडळाच्या विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय परिषदेत यश

## चेवांग भूतिया यांना 'बेस्ट पेपर सादरीकरण' पुरस्कार



**अमरावती/प्रतिनिधीः-** छत्रपती संभाजीनगर येथे नुकतेच पार पडलेल्या शारीरिक शिक्षण व क्रीडा विषयक राष्ट्रीय परिषदेत श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशनच्या विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी उल्लेखनीय यश संपादन करून संस्थेचा गौरव वाढविला. देशभरातील नामांकित संशोधक, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या परिषदेत महाविद्यालयाच्या चमूने संशोधन आधारित पेपर सादर करत आपली शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली.

या परिषदेत गौतम कुमार, किशोर मंडल, शशांक कुमार, दिनेश कुमार, तनू कुमारी, वैष्णवी वेलये, नर्गिस एस. इस्लाम, सोनाली शर्मा, प्रियंका सुब्बा, अनुपम सुरिन, नमिता कुमारी, मिकित लेप्चा, उमा भारती, श्रद्धा ढगे, कोमल गवई, जान्हवी चंदेल, अंचिसा मोमिन, चेवांग भूतिया, सोनम शेर्पा, इबादाष्यियांग खारसोहनोह, संगय शेर्पा, डॉ. निलेश जोशी आणि डॉ. सुनीता केणे यांनी संशोधन पेपर सादर केले.

सर्वांच्या संशोधनाच्या विषयाची शास्त्रीय मांडणी, अद्ययावत संदर्भांचा वापर आणि प्रभावी सादरीकरण यांमुळे उपस्थितांचे लक्ष वेधले.

विशेष उल्लेखनीय म्हणजे चेवांग भूतिया या विद्यार्थ्याच्या उत्कृष्ट सादरीकरणाची परीक्षकांनी दखल घेत त्याला 'बेस्ट पेपर सादरीकरण' पुरस्काराने सन्मानित केले. हा सन्मान HVPM च्या संशोधनपरंपरेचा आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीचा गौरव मानला जात आहे. या यशामागे प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, उपप्राचार्य डॉ. माधुरी चेंडके यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व व सातत्यपूर्ण पाठबळ महत्त्वाचे ठरले. तसेच डॉ. लक्ष्मीकांत खंडागळे आणि डॉ. मनोज कोहळे, प्रा. देवानंद सावरकर यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना संशोधनाची योग्य दिशा मिळाली. या यशाबद्दल श्री ह.व्या.प्र. मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, कार्याध्यक्ष अॅड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष श्री श्रीकांत चेंडके, प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. लक्ष्मीकांत खंडागळे आणि सर्व प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# बांठीया समितीच्या शिफारशीप्रमाणे निवडणुका घ्या- बबलू देशमुख



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा परिषद निवडणुका बांठीया समितीच्या शिफारशीनुसार घेण्यात याव्यात, मात्र ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण असलेल्या जागांवर सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिल्यामुळे प्रक्रिया खडली आहे. दरम्यान, १२ जिल्हा परिषदांच्या निवडणुका पार पडल्या असताना उर्वरित २२ जिल्हा परिषद निवडणुकांबाबत शासन जाणूनबुजून वेळकाढूपणा करत असल्याचा आरोप काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी केला आहे.

बांठीया समितीच्या शिफारशीप्रमाणे राज्यातील जिल्हा परिषद निवडणुका घेणे अपेक्षित होते. मात्र, ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण असलेल्या जागांवर सुप्रीम कोर्ट यांनी स्थगिती दिल्यामुळे अनेक ठिकाणी निवडणूक प्रक्रिया अडकून पडली आहे.

दरम्यान, राज्यातील १२ जिल्हा परिषदांच्या निवडणुका पूर्ण झाल्या असल्या तरी उर्वरित २२ जिल्हा परिषदांबाबत अद्याप स्पष्टता नाही. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी शासनावर टीका करत, बांठीया समितीच्या निकषांनुसार ५० टक्के आरक्षण ठेवून निवडणुका तात्काळ जाहीर कराव्यात, अशी मागणी केली आहे.

शासन मुद्दाम वेळकाढूपणा करत असून स्थानिक स्वराज्य संस्थांची लोकशाही प्रक्रिया लांबणीवर टाकली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. यामुळे प्रशासनावर ताण वाढत असून जनतेचे प्रतिनिधित्वही प्रलंबित राहिल्याचे त्यांनी नमूद केले.

# भारत-स्विट्झर्लंड संसदीय मैत्री गटावर डॉ. अनिल बोंडे यांची नियुक्ती

**नवी दिल्लीः** भारताच्या संसदेच्या वतीने स्वित्झर्लंडसोबत संसदीय स्तरावर संबंध अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने भारत–स्वित्झर्लंड संसदीय मैत्री गटाची स्थापना करण्यात आली आहे. १८ व्या लोकसभेच्या कालावधीसाठी हा मैत्री गट स्थापन करण्यात आला असून, त्यामध्ये राज्यसभेचे खासदार डॉ. अनिल सुखदेवराव बोंडे यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

लोकसभाचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी डॉ. बोंडे यांची या मैत्री गटावर सदस्य म्हणून निवड केली आहे. याबाबतचे अधिकृत पत्र L.V. Ramana, संचालक, लोकसभा सचिवालय (कॉन्फरन्स अँड प्रोटोकॉल शाखा) यांनी जारी केले आहे.



भारत–स्वित्झर्लंड संसदीय मैत्री गटाचा उद्देश दोन्ही देशांमधील संसदीय संवाद, सहकार्य, व्यापार, तंत्रज्ञान, शिक्षण आणि सांस्कृतिक देवाणघेवाण अधिक बळकट करणे हा आहे. या गटाच्या माध्यमातून परस्पर दौरे, चर्चासत्रे आणि धोरणात्मक संवाद घडवून आणले जातील. डॉ. अनिल बोंडे यांची या गटावर नियुक्ती ही विदर्भासह महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे प्रतिनिधित्व करताना ते दोन्ही देशांमधील सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी सक्रिय भूमिका बजावतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

संसदीय राजनय (Parliamentary Diplomacy) अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने ही नियुक्ती महत्त्वाची ठरणार असून, भारत–स्वित्झर्लंड संबंधांना नवीन दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. यावेळी खासदार डॉ अनिल बोंडे यांनी देशाची उपराष्ट्रपती व राज्यसभेचे सभापती सी पी राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्यांचे आभार मानले.

## १ व १० वरिल उर्वरित

### ९ शेतक-यांनी आर्थिक विवंचनेतून

रक्कम व एक एकर जमीन परतफेड म्हणून दिली; पण तरीही सावकारांकडून पैशांसाठी सतत तगादा सुरूच होता. यामुळे संबंधित शेतक-याने कम्बोडिया येथे जाउन ८ लाख रुपयांना किडनी विकली व ६ लाखांचे कर्ज फेडले. या प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले असून तपास केला असता सोलापूर येथील एका मध्यस्थामार्फत कम्बोडिया येथे किडनी विकल्याचे समोर आले आहे. मध्यस्थाने स्वतःसह आणि ९ व्यक्तींच्या किडन्या कम्बोडिया तसेच तामिळनाडूतील स्टार किंम्स हॉस्पिटल येथे विकल्या असल्याचे उघड झाले. यातील पीडित ७ जण परराज्यातील आहेत.

### राज्यात वर्षभरात ४८ हजार

८१३ बालके मिळून आल्याची माहिती या उत्तराच्या निमित्ताने देण्यात आली आहे. या २ वर्षात १४ ते १८ वयोगटातील हरवलेल्या मुला मुलींपैकी ९६ टक्क्यांपेक्षा जास्त मुले व मुली मिळून आल्या असल्याचे या वेळी जाहीर करण्यात आले आहे.

**बेपत्ता मुलांच्या शोधासाठी ऑपरेशन मुस्कान-** बेपत्ता व शोषित मुलांचा शोध घेउन त्यांना पालकांच्या स्वाधीन करण्यासाठी राज्यात २०१५ ते डिसेंबर २०२४ अखेरपर्यंत एकूण १३ ऑपरेशन मुस्कान राबविण्यात आले आहेत तर यंदाच्या वर्षात १४ ऑपरेशन मुस्कान सुरू असल्याचे या वेळी लेखी उत्तरात स्पष्ट करण्यात आले आहे.

### कंत्राटदारांचे तब्बल ७७ हजार

७७ हजार कोटी रुपयांची बिले थकली आहेत. सरकारच्या काही विभागांनी थकबाकीचे चेक दिले आहेत. पण जेव्हा हे चेक बँकेत किंवा ट्रेझरीकडे नेले जातात, तेव्हा तिथे पैसे नसल्याचे सांगण्यात येते. हा कंत्राटदारांची थट्टा करण्याचाच प्रकार आहे.

**९ तारखेच्या बैठकीत ठरणार आंदोलनाची दिशा-** निधीअभावी केवळ जुनी देयकेच रखडलेली नाहीत. तर सध्या सुरू असलेली विकासकामेही जागीच थांबली आहेत. नव्या कामांना मंजुरी देण्याचे प्रमाणही नगण्य आहे. या अन्यायाविरोधात आवाज उठवण्यासाठी ९ मार्च रोजी राज्यातील शासकीय अभियंता व कंत्राटदारांची महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत पुढील आंदोलनाची दिशा ठरवली जाणार आहे, असे भोसले यांनी सांगितले.

**गत वर्षभरात १० टक्केच रक्कम अदा-**उल्लेखनीय बाब म्हणजे पैशांचा तुटवडा निर्माण झाल्याचा फटका राज्यातील विकासकामांना बसत आहे. गतवर्षापर्यंत राज्यातील कंत्राटदारांची एकूण थकबाकी ८९ हजार कोटी रुपयांच्या घरात होती. त्यानंतर वर्षभरात सरकारने केवळ १० टक्के रक्कमच कंत्राटदारांना अदा केली. उर्वरित ७७ हजार कोटींसाठी आजही कंत्राटदार सरकारच्या कार्यालयाचे उंबरठे झिजवत आहेत. यापैकी अनेकांनी आपल्या खिशातील पैसे टाकून ही कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. पण वेळेवर बिले मिळत नसल्यामुळे ते आर्थिक तंगीत सापडले. यामुळे काही जणांनी आत्महत्या केल्याच्याही घटना घडल्या.

**सरकारला कंत्राटदारांचे बळी घ्यायचेत का? :** अंबादास दानवे

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार तथा विधान परिषदेतील माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या प्रकरणी सरकारवर टीका केली आहे. जनतेला आश्वासनांची गाजरे दाखवून झाली, आता कंत्राटदारांनाही चुना लावला जातोय? तिजोरीत खडखडाट असताना दिलेले चेक म्हणजे केवळ रद्दीचे तुकडे! शेतक-यांच्या आत्महत्यांनी महाराष्ट्र आधीच होरपळतोय, आता सरकारला कंत्राटदारांचे बळी घ्यायचे आहेत का? असा सवाल त्यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे.

**टेंडर कोणत्या आधारे काढले? :** सचिन अहिर

सचिन अहिर म्हणाले की, ७७ हजार कोटी रुपयांची बिले थकवण्यात आली आहेत. तर अनेक लोकांना आगाउ चेक देण्यात आले आहेत ते वटलेले नाहीत, त्यांची तरतूद अधिवेशनात काही तरतूद करण्यात आलेली नाही. कंत्राटदारांना ७७ हजार कोटींची बिले अद्याप देण्यात आलेली नाहीत मग कोणत्या आधारावर टेंडर काढण्यात आले? त्यामध्ये कुणाचा हिस्सा होता? कुणी पैसे घेतलेले आहेत? हे आम्ही विधानसभा आणि विधान परिषदेत मांडणार आहोत.

### मंत्रालयात लक्ष्मीदर्शन, झिरवळ

पैशाने, मंत्रालय चालते हफ्त्याने, मंत्रालयात एकच हिरवळ, यांचं नाव झिरवळ झिरवळ, भ्रष्टाचारी मंत्र्याला पाठीशी घालणा-या सरकारचा धिक्कार असो, अशी घोषणाबाजी करण्यात आली.

काही दिवसांपूर्वी मंत्रालयातील पाचव्या मजल्यावरील अन्न व औषध प्रशासन विभागाच्या कार्यालयात खळबळजनक कारवाई झाली. एका प्रलंबित फाईलच्या मंजुरीसाठी एका लिपिकाला लाच स्वीकारताना एसीबीने रंगेहाथ पकडले. खुद्द मंत्र्यांच्या दालनापर्यंत भ्रष्टाचाराचे धागेदोरे पोहोचल्याने प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. याच मुद्द्यावरून आता विरोधकांनी सरकारची कोंडी करण्यास सुरुवात केली आहे.

भ्रष्टाचाराला मंत्र्यांचा आशीर्वाद

यावेळी विजय वडेट्टीवार यांनी माध्यमांशी बोलताना सरकारवर जोरदार टीका केली. राज्याचा कारभार हाकणा-या मंत्रालयाच्या इमारतीत जर मंत्र्यांच्या डोळ्यांदेखत लाच घेतली जात असेल, तर हे सरकार भ्रष्टाचारात किती बुडाले आहे हे स्पष्ट होते. मंत्र्यांच्या आशीर्वादाशिवाय खालचा कर्मचारी एवढे धाडस करू शकत नाही. त्यामुळे नैतिक जबाबदारी स्वीकारून नरहरी झिरवाळ यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी विजय वडेट्टीवार यांनी केली.

### अंजनगाव-आकोट महामार्गावर

(वय ६०), रुखमाबाई गवई (वय ७०) सर्व राहणार अकोट हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना अंजनगाव ग्रामीण रुग्णालयातून उप जिल्हा ग्रामीण रुग्णालय अचलपूर येथे पुढील उपचाराकरिता पाठवण्यात आले आहे. तर परिवहन महामंडळाच्या बस मध्ये जखमी झालेले वंदना पिंपळकर (वय ३५), रमेश रामचंद्र पिंपळकर (वय ७०रा.अचलपुर) हे सुद्धा गंभीर जखमी असून पुढील उपचारासाठी त्यांना उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले आहे.

अपघात एवढा भीषण होती की कारच्या समोरचा भाग व एसटी बसचा समोरील भागाचा चेंदामेंदा झाला. भंडारज रोडवर हा भीषण अपघात घडताच या गावातील ग्रामस्थ मदत करण्यासाठी धावून आले. तातडीने गंभीर जखमींना अंजनगाव ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. ग्रामीण रुग्णालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी-कर्मचारी यांनी तातडीने जखमी रुग्णांवर उपचार सुरू केले.

### मनपाच्या जनसंवाद कार्यक्रमात

हा कार्यक्रम एकाचवेळी पार पडला. पण, या जनसंवाद कार्यक्रमात विसंवादाचेही दर्शन घडले. रहाटगाव येथील अतिक्रमणाची तक्रार घेऊन आलेल्या एका तक्रारदाराला राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नगरसेवक चंदू खेडकर यांनी आक्षेपार्ह शब्दात शिवीगाळ केल्याने चांगलीच खळबळ उडाली. महापालिका आयुक्त सौम्या शर्मा यांच्या उपस्थितीतच हा प्रकार घडल्याने सर्वच जण आश्चर्यचकित झाले. चंदू खेडकर यांनी शिव्या दिल्यानंतर तक्रारकर्त्यानेही प्रत्युत्तर दिले. दोघांमध्ये चांगलीच शाब्दिक बाचाबाची झाली. दोघांना नंतर शांत करण्यात आले. रहाटगाव येथे मोक्याच्या जागेवर करण्यात आलेल्या अतिक्रमणाविषयी लेखी तक्रार रहाटगाव येथीलच एका नागरिकाने जनसंवाद कार्यक्रमा दरम्यान केली होती. या तक्रारीवर चर्चा सुरू होती. त्यावेळी तक्रारकर्ते आणि नगरसेवक चंदू खेडकर हे समोरासमोर आले. खेडकर हे अचानक आक्रमक झाले आणि इतर नागरिकांसमोरच त्यांनी तक्रारदाराला उद्देशून अवमानकारक शब्दांचा वापर केल्याचा आरोप आहे.सुनावणीदरम्यान खेडकर हे आयुक्तांना स्थळ पाहणीचा आग्रह करीत असताना तक्रारदाराने व्यत्यय आणल्याने दोघांमध्ये चांगलाच वाद निर्माण झाला. अखेर खेडकर यांचा संयम सुटला व त्यांनी तक्रारदाराविरुद्ध अश्लील शब्दांचा वापर केल्याचा आरोप आहे. तक्रारदार प्रशासनाची दिशाभूल करीत असल्याचे नगरसेवक खेडकर यांचे म्हणणे होते.

**१०८ तक्रारीचा निपटारा-**महापालिका आयुक्त सौम्या शर्मा या परिस्थिती हाताळण्याचा प्रयत्न करीत होत्या. मात्र त्यांच्या उपस्थितीतच अशा प्रकारे भाषेची पातळी घसरल्याने उपस्थित नागरिकांनी नाराजी व्यक्त केली. या जनसंवाद कार्यक्रमात प्रशासनाने २६२ तक्रारींवर सुनावणी घेत निपटारा करण्याचा प्रयत्न केला. चार तक्रारींवर शुक्रवारी निर्णय घेण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. या कार्यक्रमांत नागरिकांकडून एकूण २६२ तक्रारी आल्या. यामध्ये सर्वाधिक तक्रारी मालमत्ता कर आकारणी व स्वच्छतेसंदर्भात होत्या. यातील १०८ तक्रारींचा निपटारा प्रांगणातील मंडपातच झाला व १५४ तक्रारी सभागृहात वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आल्या.

### भारवाडी येथील हत्या प्रकरणात

बहिणीला राज चव्हाण याचा नातेवाईक असलेला सुजल नावाच्या मुलाने पळवुन नेले होते.ज्यामध्ये पोक्सो गून्हा दाखल करण्यात आला होता. यात पळवुन घेवुन जाण्यासाठी सुजलला राज चव्हाण व माहिर सोलंकी यांनी मदत केल्याने मृत विमल याचे राज व माहिर यांचे सोबत वैमनस्य वाढले होते. तसेच पॉक्सो प्रकरणात मृत विमल हा राज व माहिर यांना पैशांची मागणी करीत होता.परंतु दोघेही पैसे देत नसल्यामुळे विमल दोघांनाही शिवीगाळ व जिवे मारण्याची धमकी देत होता. दरम्यान पैसे न दिल्याच्या रागातून मृत विमलने १४ फेब्रुवारी रोजी राज चव्हाण याची चारचाकी वाहन त्यांचेच घरासमोर जाळले होते. त्यामुळे विमल आपला गेम करू शकतो अश्याच भीतीने राज चव्हाण आणि माहिर सोलंकी याने तळजोड करण्याच्या हेतूने मृत विमलशी संपर्क केला व भारवाडी येथे धारधार चाकूने राज आणि माहिरने विमलची हत्या केली.

या संपूर्ण प्रकरणाचा तपास पोलीस अधिक्षक विशाल आनंद अप्पर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत,उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे, तिवसा पोलीस निरीक्षक गोपाल उपाध्याय यांच्या नेतृत्वात पीएसआय अमोल मुडे, सागर हटवार, मुलचंद भांबुरकर, अंमलदार बळवंत दाभणे, रविंद्र बावणे, भुषण पेटे, पंकज फाटे, गजेन्द्र ठाकरे, युवराज मानमोटे, रवी वऱ्हाडे, अमोल देशमुख, सुधीर बावणे, मंगेश लकडे, दिनेश कनोजिया, सचिन मसांगे, सागर नाठे, शाम सोनोने, चालक हर्षद घुसे तसेच सायबर येथील अधिकारी व अंमलदार पथकाने केला.

### तमिळनाडूत सापडली अपहृत

व तिला ताब्यात घेण्याची विनंती केली. जीआरपी तिरुचिरापल्लीने तत्परता दाखवत मुलीला सुरक्षित ताब्यात घेतले. त्यानंतर पोलिस पथकाने तेथे जाऊन चौकशी केली असता, आईशी झालेल्या वादामुळे रागाच्या भरात घर सोडल्याचे मुलीने सांगितले. कायदेशीर प्रक्रियेनुसार मुलीला तिरुचिरापल्ली येथील बालकल्याण समितीसमोर हजर करण्यात आले. आवश्यक औपचारिकता पूर्ण केल्यानंतर २२ फेब्रुवारी रोजी पोलिस पथक तिला अमरावतीत घेऊन आले आणि तिच्या आईच्या ताब्यात सुरक्षित ताब्यात दिले. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त श्याम घुगे, सहायक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर व वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक विपुल हुलावले, मिलिंद हिवरे, अमित बकातवार, प्रशांत बेलोरकर, भाग्यश्री पालवदे व सुषमा आठवले यांनी पार पाडली.

### मेळघाटातील मनरेगा मजुरांच्या

निधी तातडीने मिळावा, यासाठी मनरेगा आयुक्त डॉ. भरत बास्टेवाड यांनीही याबाबत पाठपुरावा केला आहे.

केंद्र शासनाने १९ फेब्रुवारी २०२६ रोजी राज्याच्या १३ कोटी मनुष्यदिवसांच्या लेबर बजेटमध्ये वाढ करून सुधारीत १६ कोटी मनुष्यदिवसांच्या बजेटला मान्यता दिली आहे. त्यामुळे मार्च अखेरपर्यंत मजुरांना नियमित रोजगार उपलब्ध होऊन मजुरी वेळेत अदा केली जाणार आहे.

### 'हे मना' आध्यात्मिक पुस्तकाचे

उलगडणारे, अंतरंगाला तेजोमय करणारे विचार शब्द म्हणजे हे मना पुस्तक आहे. हे पुस्तक महाराष्ट्रातील प्रत्येकाला शाळा,कॉलेज ,ग्रंथालय मध्ये घेणे गरजेचे आहे. अध्यात्माचा कळस यामध्ये आहे. अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज श्रीमंत भूषण सिंह राजे होळकर यांच्या अध्यक्षतेत होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये प्रमुख अतिथी म्हणून जितेंद्रनाथ महाराज, खासदार डॉ. अनिल बोंडे, पदमश्री विकास महात्मे, दीपक बोराडे, माजी खासदार नवनीत राणा, हरिभाऊ भदे, शरद वसतकार, श्रीराम मुंडे, अरुण पडोळे, एड. दिलीप एडतकर, संगीता शिंदे, माजी राज्यमंत्री प्रवीण पोटे पाटील, काशीराम साबळे, माधव अवघड, सोपान कनेरकर, नागेश वसतकार उपस्थित राहणार आहे. कार्यक्रमात उपस्थित राहण्याचे आवाहन पुस्तकाचे लेखक गजानन पातुर्डे, नेहा पातुर्डे, डॉ. प्रमोद साहेबराव पातुर्डे यांनी केले आहे. पत्रकार परिषदेमध्ये माधवराव अवघड, गजानन पातुर्डे, प्रमोद पातुर्डे, एड. अचल कोल्हे, श्याम बोबडे, आशिष मेहेत्रे, राम नागे, अंकुश घुलक्षे आदी उपस्थित होते.

### खुनाच्या प्रयत्नातील फरार

जीव घेण्याच्या उद्देशाने हा हल्ला झाल्याचा आरोप आहे. या प्रकरणी अप. क्र. ११६/२६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान एकूण ११ आरोपींनी संगनमताने हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. मात्र, मुख्य सूत्रधार पापा उर्फ दिपक अशोक छप्परवार (वय ३०, रा. लक्ष्मी नगर) हा फरार होता. गोपनीय माहितीच्या आधारे तो अमरावतीत येणार असल्याची खबर मिळताच डी.बी. पथकाने सापळा रचून त्याला अटक केली.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सहायक पोलीस आयुक्त कैलाश पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, क्राईम पोलीस निरीक्षक विजया पंधरे व प्रशासन पोलीस निरीक्षक समाधान वाठोरे यांच्या नेतृत्वात डी.बी. पथक प्रमुख पोलिस हवालदार भारत वानखड़े, राजेश गुरेले, मतिन शेख, रुपेश हटकर, सुशांत प्रधान, महेश शर्मा, अमोल कराळे यांनी केली.

### मंदिरात चोरी करणारा आरोपी

तपासादरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी मंगेश प्रकाश चवरे (वय ३८, रा. बेनोडा) याला ताब्यात घेतले. चौकशीअंती त्याने गुन्ह्याची कबुली दिली. आरोपीकडून चोरीस गेलेला चांदीचा मुकुट तसेच गुन्ह्यात वापरलेली दुचाकी जप्त करण्यात आली. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत १ लाख ४० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे व सहायक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांच्या नेतृत्वात करण्यात आली. पुढील तपास सुरू आहे.

### कुख्यात आरोपी शेख शहबाजवर

अवैध शस्त्र बाळगणे, जीवघेणा हल्ला, बळजबरी तसेच तडीपार आदेशाचे उल्लंघन अशा स्वरूपाचे एकूण सात गुन्हे दाखल आहेत. यापूर्वी त्याच्यावर प्रतिबंधात्मक तसेच तडीपारची कारवाई करण्यात आली होती. मात्र त्यानंतरही तो गुन्हेगारी कृत्यांमध्ये सक्रिय राहिल्याने त्याच्यावर एमपीडीए अंतर्गत प्रस्ताव सादर करण्यात आला. पोलीस निरीक्षक हनमंत उरलागोंडावार व पोलीस निरीक्षक जनार्दन साळुंखे यांनी सहायक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर व पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ यांच्या मार्फत प्रस्ताव सादर केला होता. प्रभारी सहायक पोलीस आयुक्त सीमा दाताळकर व पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या एमपीडीए सेलने प्रस्तावाची प्रक्रिया पूर्ण केली. अमरावतीचे पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी २३ फेब्रुवारी २०२६ रोजी स्थानबद्धतेचा आदेश पारित केला. त्यानुसार आरोपी शेख शहबाज याला अमरावती मध्यवर्ती कारागृहात दाखल करण्यात आले.

### नागझिरीजवळील भीषण अपघातातील

धडक दिली. धडक इतकी भीषण होती की शेख शहजाद यांचा जागीच मृत्यू झाला, तर राहुल मुंदरे गंभीर जखमी झाले. अपघातानंतर संबंधित वाहन चालक घटनास्थळावरून फरार झाला. घटनेची माहिती मिळताच नागझिरी नॅशनल हायवे ट्रॅफिक पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमी राहुल मुंदरे यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्यांची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याचे सांगितले होते. पुढील उपचारासाठी त्यांना सुपर स्पेशालिटी रुग्णालयात हलविण्यात आले; मात्र उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या शवागारात ठेवण्यात आले. घटनेची माहिती मिळताच कामुंजा व शेवती परिसरातील नातेवाईकांनी रुग्णालयात गर्दी केली होती. वातावरण शोकाकुल झाले होते.

### प्रवक्ते हनुमंत पवार यांच्यावरील

केल्याचे दिसून येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक नागरिकाला आपले मत व्यक्त करण्याचा घटनात्मक अधिकार आहे. राजकीय मतभेद असू शकतात; मात्र मतभिन्नतेला उत्तर म्हणून हिंसाचाराचा मार्ग अवलंबणे हे कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणारे आहे. अशा प्रकारच्या घटना लोकशाही मूल्यांवर व अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर आघात करणाऱ्या असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर प्रशासनाने कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता निष्पक्ष व पारदर्शक चौकशी करावी, संबंधित आरोपींवर तात्काळ गुन्हा नोंदवून कठोर कायदेशीर कारवाई करावी, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृहखाते असतांना भाजपाच्या कार्यकर्त्यांकडून सातत्याने असे गुंडगिरीचे प्रकार राज्यात वाढत आहेत. या सरकारमध्ये गुंडगिरीला अभय तर देण्यात येत नाही ना, असा संतप्त सवाल यावेळी युवक कॉंग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी केला.

प्रशासनाने तातडीने अहवाल सादर करून जनतेसमोर वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली आहे.

अमरावती विधानसभा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष वैभव देशमुख यांचे पुढाकाराने देण्यात आलेल्या या निवेदन प्रसंगी प्रदेश युवक कॉंग्रेसचे महासचिव सागर कलाने, शहरजिल्हा युकाँ अध्यक्ष निलेश गुहे, बडनेरा युकाँ अध्यक्ष आशिष यादव, शहरजिल्हा उपाध्यक्ष नितीन काळे, एनएसयुआय शहराध्यक्ष संकेत साहू, धनंजय बोबडे, मोहीत भेंडे, शुभम बांबल, संकेत भेंडे, गोविंद ठाकरे, प्रथमेश गावंडे, प्रियल मोहोड या युवक कॉंग्रेस पदाधिकाऱ्यांसह प्रदीप पाटील, नितीन चौधरी हे सामाजिक कार्यकर्तेसुद्धा उपस्थित होते.

### प्रवीण पोटे यांची भाजप

करून त्यांना मोठी जबाबदारी दिली आहे. आगामी विधान परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने ही फार मोठी जबाबदारी मानल्या जात आहे. आमदार रवी राणा आणि नवनीत राणा यांच्यासोबत प्रवीण पोटे यांचे राजकीय वैमनस्य सर्वश्रुत आहे. भाजपा ने प्रवीण पोटे यांना मोठी जबाबदारी देऊन राणा दांपत्याला एक अप्रत्यक्ष संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे की पक्ष प्रवीण पोटे यांच्यासोबत आहे. दरम्यान प्रवीण पोटे यांचे सर्व स्तरावरून अभिनंदन करण्यात येत आहे. पोटे समर्थकांमध्ये आनंदाची लाट उसळली आहे.

### यवतमाळ नगर परिषदला मुंबईत

नेमणूक का, असा सवालही उपस्थित केला जात आहे.

४७ लाखांचा निर्बीजीकरण खर्च, तरीही कुत्र्यांची वाढ कायम पालिकेने मागील तीन वर्षांत २,९२४ मोकाट श्वानांचे निर्बीजीकरण केल्याचा दावा केला आहे. प्रति श्वान १,६१० रुपये या दराने तब्बल ४७,०७,६४० रुपयांचा खर्च दाखविण्यात आला आहे. मात्र शहरातील विविध भागांत मोकाट व आक्रमक श्वानांच्या टोळ्या वाढल्याचे चित्र आहे. चाव्याच्या घटना, पिसाळलेल्या श्वानांच्या तक्रारी वाढत असून नागरिक भीतीच्या छायेत जगत आहेत.

निर्बीजीकरण केंद्रात सध्या केवळ ३–४ श्वान असल्याची माहिती समोर येत असल्याने 'उर्वरित श्वानांचे काय?' असा थेट प्रश्न उपस्थित होत आहे. आकडे फुगवले गेले की प्रत्यक्ष काम झाले, याची स्वतंत्र चौकशी करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

अनेक भागांत कचरा संकलनासाठी घंटागाडी नियमित येत नसल्याच्या तक्रारी आहेत. सांडपाणी निचरा व्यवस्था ढासळलेली, रस्त्यांवर खड्डे कायम, दिवाबत्ती अपुरी या मूलभूत प्रश्नांवर ठोस सुधारणा दिसत नसताना पुरस्कार स्विकारण्याच्या घाईवर नागरिक टीका करत आहेत.नगरपरिषदेत जुने सागवान फर्निचर परस्पर विकल्याचा आरोपही पुढे आला आहे. कोणतीही वैधानिक परवानगी, लिलाव प्रक्रिया किंवा ठराव न घेता मालमत्ता विक्री करणे कायदेशीर ठरते का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. सार्वजनिक संस्थेची मालमत्ता विक्रीसाठी शासनमान्य लिलाव व पारदर्शक प्रक्रिया बंधनकारक असते. अन्यथा ती कारवाई नियमबाह्य ठरू शकते, असे कायदे तज्ज्ञांचे मत आहे.यापूर्वी नगराध्यक्ष म्हणून बाळासाहेब चौधरी यांच्या कार्यकाळात स्वच्छतेबाबत राज्यस्तरीय सन्मान मिळाला तेव्हा प्रत्यक्ष कामांमध्येही सुधारणा जाणवत होती. त्यानंतर प्रशासकीय अधिकारी म्हणून माधुरी मडावी यांनी स्वच्छता, पारदर्शकता आणि विकासकामांचा घेतलेला धडाका नागरिकांनी अनुभवला होता. त्यामुळे त्या काळातील पुरस्कार आणि जमिनीवरील काम यांचा मेळ स्पष्ट दिसत होता. सध्याच्या स्थितीत मात्र पुरस्कार आणि प्रत्यक्ष परिस्थिती यांत मोठा विसंवाद असल्याची टीका होत आहे.

जनमाध्यम
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ बुधवार, २५ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
एक प्रतिष्ठित सवय
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# विहीर सर्वेक्षणात घोळ प्रकरणाची 'ऑन द स्पॉट' पाहणी

■ प्रतिनिधी | खेट्री ■

**पातूर तालुक्यातील सावरगाव परिसरात गाळलेल्या विहिरींच्या सर्वेक्षणात झालेल्या कथित घोळप्रकरणी अखेर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार उच्चस्तरीय समितीने मंगळवारी (दि. २४) 'ऑन द स्पॉट' पाहणी केली. या पाहणीनंतर संबंधित अहवाल मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे सादर केला जाणार असल्याने या प्रकरणात पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

सावरगाव परिसरातील विहिरींच्या सर्वेक्षणात सचिव समाधान साळोकार व कृषी सहाय्यक अरुण ताले यांनी आर्थिक व्यवहार करून अनियमितता केल्याचा आरोप तक्रारदार महादेव पायगन यांनी केला होता. याबाबत त्यांनी संबंधितांकडे लेखी तक्रार दाखल केली होती.

## सावरगावातील प्रकरण : सीईओने मागविला अहवाल




दरम्यान, पातूर येथील गटविकास अधिकाऱ्यांनी पंचायत समितीमार्फत चौकशी अहवाल मागविला होता. मात्र, पंचायत समितीच्या चौकशी समितीने संशयास्पद अहवाल सादर करून संबंधितांना वाचवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप तक्रारदाराने केला. या अहवालावर आक्षेप घेत महादेव पायगन यांनी निष्पक्ष चौकशीची मागणी करत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या दालनात आत्मदहनाचा इशारा दिला होता.

या गंभीर इशाऱ्याची दखल घेत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी मूर्तिजापूर पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी यांची स्वतंत्र चौकशीसाठी नियुक्ती केली. त्यानुसार २४ फेब्रुवारी रोजी समितीने सावरगाव परिसरात प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून संबंधित कागदपत्रांची पडताळणी केली. या प्रकरणात दोषी आढळल्यास कारवाई होणार का, याकडे ग्रामस्थांसह तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### अनियमिततेचा प्राथमिक अंदाज

स्थळ पाहणीदरम्यान काही विहिरींच्या सर्वेक्षणात तफावत आढळल्याचा प्राथमिक अंदाज समितीने व्यक्त केल्याची माहिती सूत्रांनी दिली. अंतिम अहवाल सादर झाल्यानंतरच अनियमितता झाली की नाही, यावर अधिकृत शिक्कामोर्तब होणार आहे.

# 28 फेब्रुवारीला वाशिममध्ये राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशन




■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, २८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता येथील वाटाणे लॉनमध्ये राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशन, पुरस्कार वितरण व पदाधिकारी सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या अधिवेशनासाठी राज्यभरातून पत्रकार उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाचे उद्घाटन केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार असून सहउद्घाटक म्हणून महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित राहतील. अध्यक्षस्थानी पालकमंत्री दत्तात्रय भरणे राहणार आहेत. विशेष उपस्थितीत सहकार मंत्री आकाश फुंडकर, मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री इंद्रनील नाईक आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. या सोहळ्यात प्रतापराव जाधव यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. तसेच भागवताचार्य डॉ. रमाकांत व्यास यांना 'संत सेवाश्री', राधेश्याम चांडक यांना 'विदर्भ भूषण', श्रीमती शिलाताई राठी यांना 'जीवन गौरव' पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. विविध क्षेत्रातील मान्यवरांना भूषण, गौरव व सेवारत्न पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येणार आहे.

दुपारी २ ते ३ या वेळेत 'पत्रकारांचा डीएनए काय व अजितदादा पवार यांच्या मृत्यूचे राजकारण तर होत नाही ना?' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. त्यानंतर 'सायबर युगातील माध्यमे आणि मूल्यनिष्ठ पत्रकारिता' तसेच 'संत विचारातून अभिव्यक्ती स्वातंत्र्य' या विषयांवर प्रबोधन सत्र होणार आहे. राज्य, विदर्भ व जिल्हास्तरीय पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या अधिवेशनासाठी मोठ्या संख्येने पत्रकारांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# जगण्यावागण्याची संवेदना कवितेतून उमटावी -प्रा.राठोड



■ प्रतिनिधी | वाशिम ■

कविता ही सामाजिक संवेदनाचे अक्षरलेणे असून सामाजिक व्यथावेदनाचे शब्दचित्र त्यातून प्रतिबिंबीत होते एकप्रकारे जगण्यावागण्याची संवेदनाच कवितेतून उमटत असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध कवी तथा गोरबोलीचे अभ्यासक प्रा.रतनकुमार राठोड यांनी केले . ते

मालेगाव येथील रामराव झनक कला महाविद्यालयाच्या वतीने आयोजित दत्तक ग्राम पांगरी नवघरे येथील रासेयो शिबीराच्या बौद्धीक सत्रात बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.लता जावळे होत्या.तर विचारपिठावर रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा . डॉ . दिपक जमधाडे , मंडळ अधिकारी प्रशांत गौरकर , प्रा . डॉ . उषा गौरकर प्रा . डॉ . भिमराव जांभरुणकर उपस्थित होते. यावेळी प्रा.रतनकुमार राठोड यांनी संत तुकाराम, महाराज , बहीणाबाई चौधरी,प्रा. डॉ .श्रीकृष्ण राऊत यांच्या कविता अभंगाचे सामाजिक अधिष्ठान स्पष्ट केले . तसेच स्वताच्या माझा बाप शेतकरी, आजकाल,जगायचे आहेत, माझ्यातला मी, बीज,माणसाच्या शोधात आदी कवितांचे प्रभावी सादरीकरण करुन त्यांचे वाङ्मयीन सौंदर्य व सामाजिक संदर्भ स्पष्ट केले. यावेळी उपस्थित रासेयोच्या स्वंयसेवकांनी भरभरुन प्रतिसाद दिला. रतनकुमार राठोड यांच्या पहाडी आवाजातील गीतगायनाला अक्षरश: डोक्यावर घेतले.

# कारंजा येथे 'व-हाडी जत्रा' मिनी सरस प्रदर्शनाचे थाटात उद्घाटन

■ प्रतिनिधी | कारंजा ■

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, वाशिम यांच्या वतीने आयोजित 'वऱ्हाडी जत्रा' मिनी सरस प्रदर्शन-२०२६ या पाच दिवसीय प्रदर्शनाचे उद्घाटन दि. २३ फेब्रुवारी रोजी धाबेकर सांस्कृतिक सभागृह येथे उत्साहात पार पडले.

कारंजा उपविभागीय अधिकारी तथा परिविक्षाधीन आय.ए.एस. अधिकारी आकाश वर्मा यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले तसेच राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक किरण गणेश कोवे, कारंजा पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी पूनम राणे, विस्तार अधिकारी सचिन गटलेवार,



जिल्हा अभियान व्यवस्थापक सुधीर खुजे, जिल्हा व्यवस्थापक प्रफुल्ल इटाळ, महिला व बाल विकास विभागाचे सुरज जाधव, जिल्हा व्यवस्थापक दत्ता चव्हाण, तृष्णा ठाकरे आणि वर्षा ठाकरे यांची उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना आकाश वर्मा म्हणाले की, ग्रामीण भागातील बचत गटांच्या महिलांच्या उत्पादनांना योग्य व्यासपीठ मिळाल्यास त्यांच्या व्यवसायाला अधिक चालना मिळेल. महिलांनी आपल्या उत्पादनाचे प्रभावी मार्केटिंग करणे गरजेचे असून आजच्या काळात डिजिटल मार्केटिंगकडे वळणे आवश्यक आहे, असे त्यांनी नमूद केले. प्रकल्प संचालक किरण गणेश कोवे यांनी मनोगत व्यक्त करताना ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासनाने या प्रदर्शनाच्या माध्यमातून पुढाकार घेतल्याचे सांगितले. परिसरातील नागरिकांनी प्रदर्शनाला भेट देऊन महिला बचत गटांच्या उत्पादनांची खरेदी करून त्यांचे मनोबल वाढवावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा अभियान व्यवस्थापक सुधीर खुजे यांनी केले. सूत्रसंचालन जिल्हा परिषद शिक्षिका जया खंडागळे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन जिल्हा परिषद शिक्षिका जया खंडागळे यांनी केले तर अभियान व्यवस्थापक संदीप ढाले यांनी आभार मानले.

विधिमंडळाचे अधिवेशन सुरू असल्यामुळे नियोजित उद्घाटक व लोकप्रतिनिधी कार्यक्रमास उपस्थित राहू शकले नाहीत. दि. २३ ते २७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत भरविण्यात आलेल्या या प्रदर्शनात सुमारे ८० वस्तू विक्रीचे स्टॉल तसेच २० खानावळीचे स्टॉल आहेत. जिल्ह्यातील सुमारे १०० स्वयंसहायता समूहांची उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध आहेत. खाद्यपदार्थ, मसाले, हातमागावरील कापड, ग्रामीण हस्तकला साहित्य आदी विविध वस्तूंसह खाद्यपदार्थांची मेजवानी या प्रदर्शनात लाभत आहे. आयोजकांच्या वतीने कारंजा नगरीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने प्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# वाशिम तहसील माहेश्वरी महिला मंडळच्या वतीने चर्चासत्राचे आयोजन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या वाशिम तालुका माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने महेश भवन येथे दिनांक २५ फेब्रुवारी रोजी दुपारी तीन वाजता एक दिवसीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे सदर चर्चा १७ मध्ये मोटिवेशनल वक्ता, कॉर्पोरेट ट्रेनर हीलींग ट्रेनर, कौन्सिलर मास्टर

गायत्री विवेक रांदड यां नियंत्रणांतून समन्वयाकडे या विषयावर मार्गदर्शन करणार आहे.., सदर चर्चा सत्रात होणारी चर्चा आणि प्रश्न उत्तरे, आजच्या युगात, नियंत्रण आणि समन्वय यांच्यात संतुलन साधणे खूप महत्वाचे आहे. नियंत्रण म्हणजे आपल्या जीवनातील परिस्थिती आणि भावनांवर प्रभुत्व मिळवणे, तर सामंजस म्हणजे परिस्थिती



आणि आपल्या भावनांशी जुळवून घेणे आहे. सदर चर्चासत्रामधून ङस्वत:ला ओळखा सकारात्मक दृष्टिकोन नियंत्रण ठेवा निरंतर शिक्षण घेणे, असून नियंत्रणातून समन्वयाकडे

जाण्यासाठीआपल्याला आपल्या जीवनातील परिस्थिती आणि भावनांवर प्रभुत्व मिळवणे आवश्यक आहे, सदर कार्यक्रमाचा महिला भगिनींनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आव्हान आयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

# मनोज वानखेडे यांची विभागीय अध्यक्षपदी तसेच विवेक भुयार यांची सचिवपदी निवड



■ प्रतिनिधी | वाशिम ■

शासन मान्यता प्राप्त महाराष्ट्र राज्य दि. कर्मचारी व अधिकारी संघटना मुंबई-३२ यांची राज्यस्तरीय सभा दि. २२ फेब्रुवारी रोजी नाशिक येथे आयुक्त कार्यालय, संघटना कार्यालय, नाशिक रोड येथे पार पडली. सभेचे अध्यक्षस्थान राज्य अध्यक्ष बाळासाहेब सोनवणे यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून राज्य सचिव राजेंद्र आंधळे उपस्थित होते.

राज्यातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संघटना बळकटीकरणासंदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. बैठकीत राज्यस्तरीय निवडपत्र व जिल्हाध्यक्ष निवडपत्रांचे वितरण करण्यात आले.

यावेळी वाशिम जिल्ह्यातील मनोज वानखेडे यांची अमरावती विभागीय अध्यक्षपदी तसेच विवेक भुयार यांची अमरावती विभागीय सचिवपदी निवड जाहीर करण्यात आली. या निवडीबद्दल उपस्थित पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

सभेत दिव्यांग ळउ्छ कार्ड पडताळणी, ऊॅ परीक्षा, दिव्यांग बिंदूनामावली व पदोन्नती आरक्षण, दिव्यांग मंत्रालय सचिवांसोबत बैठक आयोजित करणे तसेच राज्य अधिवेशनाचे आयोजन या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. दिव्यांग कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या अन्यायकारक बाबींविरुद्ध राज्य संघटना ठामपणे पाठपुरावा करेल, असे आश्वासन देण्यात आले.

यावेळी राज्यातील अनेक जिल्ह्यांतील जिल्हा व राज्य पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते. विविध पदांवर नियुक्ती झालेल्या सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे सभेत मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले.

# अज्ञान, अंधश्रद्धा व स्वच्छतेसाठी संपूर्ण आयुष्य खर्ची घालणारे म्हणजे संत गाडगेबाबा -पडघान



■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक अजय बहुजन हिताय सार्वजनिक वाचनालय संतोषी माता नगर वाशीम येथे दि.२३ फेब्रुवारी २६ रोजी संत गाडगेबाबा यांच्या जयंती चे आयोजन करण्यात आले होते.सर्व प्रथम उपस्थित मान्यवरांनी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले.नंतर प्रमुख मार्गदर्शक म्हणून असलेले समाजसेवक राजकुमार पडघान यांनी आपल्या भाषणात सांगितले की,संत गाडगेबाबा यांनी अज्ञान , अंधश्रद्धा निर्मूलन व स्वच्छतेसाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले आहे.पुढे राजकुमार पडघान यांनी सांगितले की,संत गाडगेबाबा यांनी शाळा न शिकता शिक्षण, आरोग्य आणि गोरगरीबांच्या सेवेला जास्त महत्त्व दिले आहे.


एवढेच काय तर भुकेलेल्यांना अन्न, तहानलेल्या पाणी, उघड्या नागड्यांना वस्त्र गरीब मुलांना शिक्षणासाठी मदत, रोग्याला औषधोपचार,बेकारांना रोजगार असे सांगून देव हा दगडात नसून तो तुमच्या ह्र्दयात आहे.असे आपल्या कीर्तनातून संत गाडगेबाबा सांगत असत.त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य हे अज्ञान, अंधश्रद्धा निर्मूलन व स्वच्छतेसाठी खर्ची घातले आहे.

# शुक्रवारी जिल्हास्तरीय श्री गुरुदेव कार्यकर्ता संम्मेलन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

श्री गुरुदेव सेवा मंडळ वाशिम जिल्ह्याच्यावतीने शुक्रवार दि. २७ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता वैकुंठधामवासी सौ.स्नेहलता पुनमचंद सोमाणी परिसर वाटाणे लॉन येथे जिल्हास्तरीय श्री गुरुदेव कार्यकर्ता संम्मेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

स्थानिक वाटाणे लॉन येथे आयोजित संम्मेलनाचे उद्घाटन आजीवन प्रचारक गुरुकुंज आश्रम येथील आचार्य हरिभाऊ वेरुळकर गुरुजी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला सहउद्घाटक वाशिम मंगरुळपीर विधानसभा सदस्य आ. शाम खोडे असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वारकरी सेवक दिनकरराव वाटाणे राहतील. विशेष अतिथी म्हणून जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा पोलिस अधिक्षक अनुज तारे, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. अर्पित



चौहाण, विज्ञान भारतीचे जिल्हा संयोजक प्रा. राजेश गोरुले, अध्यात्म गुरुकूल आश्रमचे व्यवस्थापक रवि मानव, आजीवन प्रचारक ह.भ.प. नामदेवराव गव्हाळे महाराज, नगराध्यक्ष अनिल केंदळे, उपाध्यक्ष राजु भांदुर्गे, जिल्हा सेवा अधिकारी सुनिलभाऊ दशमुखे, जिल्हा महिला सेवा अधिकारी सौ. ज्योती उगले, आप्पास्वामी शिक्षण संस्थेचे प्रा. भाऊसाहेब काळे, माजी जि.प. सदस्य दौलतराव इंगोले राहतील. आशीर्वाद विशेष निमंत्रीत म्हणून आचार्य विजयप्रकाश दायमा, प.पु. शंकरबाबा, ह.भ.प. बालयोगी संत गोपालबाबा, ह.भ.प. सागर महाराज परिसकर, प.पु. शांतीपुरी महाराज येवता, ह.भ.प. नामदेवराव काकडे महाराज, उपस्थित राहतील. सदर कार्यक्रमात गुरुकुंज आश्रमचे सरचिटणीस तथा महाराजाचे निजी सचिव ह.भ.प. जनार्धन पंत बोथे गुरुजी यांना केंद्र शासनाच्यावतीने प्रतिष्ठेचा पदमश्री पुरस्कार मिळाल्याबद्दल जिल्ह्याच्यावतीने विशेष सत्कार करण्यात येणार आहे. दुपारी ४ ते ६ प्रबोधनाचा कार्यक्रम होणार असून या सत्रामध्ये अध्यात्म गुरुकूलचे संचालक रवि मानव हे राष्ट्रसंतांची सामाजीक क्रांती व आजचा संघर्ष या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. सभाध्यक्ष आचार्य हरिभाऊ वेरुळकर गुरुजी तर उद्घाटक ह.भ.प. गव्हाळे महाराज राहतील. सायंकाळी ५ वाजता सामुहीक ध्यान व राष्ट्रवंदना होणार आहे.

# जिल्हाधिका-यांनी घेतला जलजीवन मिशनचा आढावा

**अकोला :** जिल्ह्यातील नागरिकांना जलजीवन मिशनअंतर्गत प्रत्येक कुटुंबाला नळजोडणीद्वारे शुद्ध पाणीपुरवठ्याचे उद्दिष्ट असून, ही कामे पूर्णत्वास जाण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले.

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन- जलजीवन मिशन समितीची बैठक जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांच्या अध्यक्षतेत झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता नीलेश राठोड यांच्यासह संबंधित यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.

मिशनमधील उद्दिष्ट पूर्ण होण्याच्या अनुषंगाने प्रत्येक योजनेचा सातत्याने पाठपुरावा होणे आवश्यक आहे.

## जाहीर सुचना

सर्व जनतेस व वित्तीय संस्थेस ह्या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, श्री. पवन रमेश देवकर रा. बहादुरा ता. बाळापुर जि. अकोला यांनी खालील वर्णनाची मालमत्ता जना स्मॉल फायनान्स बँक लि. येथे गहाण ठेवुन कर्ज मिळण्याकरिता अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन :** मौजे ग्रा. पं. कोथळी खुर्द ता. बार्शिटाकळी जि. अकोला च्या हद्दीतील मालमत्ता क्र. ४५२ ज्याचे एकूण क्षेत्रफळ ८४ चौ.मी. असून ज्यास चतुर्सिमा : पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : खुला प्लॉट, ऊत्तरेस : विक्रम नांदे व दक्षिणेस : रस्ता

येणे प्रमाणे वरील मालम ता हि श्री. रमेश बोन्द्राजी देवकर ह्यांना वडिलोपार्जित मिळालेली असून गावठाण हद्दीतील आहे. श्री. पवन रमेश देवकर यांनी वरील मालमत्ता जना स्मॉल फायनान्स बँक लि. येथे गहाण ठेवुन कर्ज मिळण्याकरिता अर्ज केला आहे

त्याअर्थी जर वरील मालमत्तेवर कोणाचे काही कर्ज, गहाण, बोजा, हक्क, अधिकार, आक्षेप अथवा ताबा असल्यास त्यांनी सदर सुचना प्रकाशीत झाल्या पासुन १४ (चौदा) दिवसात खालील नमुद पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानीशी आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणाचाही कसल्याही स्वरुपाचा आक्षेप नाही असे समजुन जना स्मॉल फायनान्स बँक लि. हे वरील मालमत्ता गहाण ठेवुन कर्जाची रक्कम वितरीत करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत वा ऊजर चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. २४/०२/२०२६

**अधिवक्ता: संजीव रा. बोचरे**
संतोष नगर, आगाशे गुरूकुल,
मलकापुर रोड, अकोला - ४४४००४
मोबा. ९८९०४४४८२४

# कुंभार समाजाच्या १९ मागण्यांसाठी मुख्यमंत्री फडणवीस यांना निवेदन

## माती कला बोर्ड त्वरित कार्यान्वित करा; ५० कोटींची तरतूद करण्याची मागणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

कुंभार समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात सखल कुंभार समाज विकास परिषदेच्या वतीने ना. देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर करण्यात आले. मार्फत जिल्हाधिकारी, अकोला यांच्याकडे हे निवेदन देण्यात आले असून समाजाच्या १९ मागण्यांकडे तातडीने लक्ष देण्याची विनंती करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील बहुसंख्य कुंभार समाज मूर्तीकाम, गाडगे, मडकी व वीट बनविण्याचा पारंपरिक व्यवसाय करीत असून माती उपलब्धता, रॉयल्टी, इंधन व जागेअभावी गंभीर अडचणींचा सामना करावा लागत आहे. माती उत्खननासाठी पटवारी, मंडळ अधिकारी व तहसील कार्यालयांकडून त्रास दिला जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

दि. ९ मार्च २०१८ रोजी तत्कालीन सरकारने कुंभार समाजाच्या आर्थिक व शैक्षणिक उन्नतीसाठी श्री संत शिरोमणी गोरोबा काका माती कला बोर्ड स्थापन करण्याची घोषणा केली होती. मात्र सात वर्षे उलटूनही बोर्ड कार्यान्वित न झाल्याने समाजात



नाराजीचे वातावरण असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. येत्या अर्थसंकल्पात या बोर्डासाठी ५० कोटी रुपयांची तरतूद करून त्वरित कार्यान्वयन करावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे.

तसेच १९८७ पासून राज्याच्या विधिमंडळात कुंभार समाजाला प्रतिनिधित्व मिळाले नसल्याचे सांगत विधान परिषदेत प्रतिनिधी द्यावा, अशी मागणीही करण्यात आली. तेर (जि. धाराशिव) येथील श्री संत गोरोबाकाका जन्मस्थानाचा विकास आराखडा देहू-आळंदीप्रमाणे तयार करावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. कुंभार समाजाला मातीवरील रॉयल्टी पूर्णतः माफ करणे, कुंभार खाणीवरील अतिक्रमण हटविणे, स्वतंत्र खाणी उपलब्ध करून देणे, महानगरपालिका व ग्रामपंचायत क्षेत्रात भट्टी व माती साठवणुकीसाठी जागा उपलब्ध करून देणे, माती उत्खनन परवानगी नोव्हेंबर ते ३१ मे या कालावधीसाठी देणे, वयोवृद्ध कारागिरांना दरमहा ५ हजार रुपये मानधन देणे, २ टक्के स्वतंत्र आरक्षण देणे आदी मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत. याशिवाय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये 'कुंभार कला व मूर्ती कला' विषय सुरू करणे, ओळखपत्रालाच माती वाहतूक परवाना मान्यता देणे, अकृषक कर माफ करणे, वीट व्यावसायिकांना रिजेक्ट कोल व फ्लाय ॲश उपलब्ध करून देणे, भद्रावती (जि. चंद्रपूर) येथील कुंभार कला प्रशिक्षण केंद्र पुनर्जीवित करणे, प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेतील प्रलंबित अर्ज मंजूर करणे, खादी ग्रामोद्योग आयोगाच्या योजनेअंतर्गत साहित्य वितरण करणे, वीट भट्टी व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध करणे, नागपूर येथील ४३० वीट व्यावसायिकांसाठी 'ब्रिक्स झोन' जाहीर करणे तसेच विदर्भातील जिल्ह्यांमध्ये जळाऊ लाकूड सवलतीच्या दरात उपलब्ध करून देणे आदी मागण्यांचा समावेश आहे.

समाजाच्या मागण्यांकडे शासनाने सकारात्मक दृष्टीकोनातून पाहून न्याय द्यावा, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदन देताना संजय वाडकर (जिल्हाध्यक्ष), प्रा. दिलीप अफतूरकर, प्रा. नंदकिशोर थुटे, पुंडलिक वनकर, रामचंद्र मेहरे, अशोकराव मांगूळकर, मनोज बनचरे, महेश डवरे, ॲड. अरुण सौदागर, इंजि. नितेश मेहरे, मनोज लोंदे यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ९० ■ बुधवार, २५ फेब्रुवारी २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## खा.अमर काळे यांचा पुढाकाराने आई-बहीणींच्या आरोग्याची जिंकली लढाई

### -समुद्रपूरची सात गावे ठरली गर्भाशय कर्करोगमुक्त

**वर्धा जनमाध्यम :** महिलांच्या आरोग्याच्या लढ्यात समुद्रपूर तालुक्याने ऐतिहासिक पाऊल टाकत सात गावे गर्भाशयाच्या कर्करोगमुक्त ठरल्याची अधिकृत घोषणा मंगळवारी (दि. २५) जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आली. भावनिक वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाने उपस्थितांच्या डोळ्यांत अभिमान आणि दिलासा दोन्हीही दाटून आले.



मॅनकाईंड फार्मा आणि स्वस्त वृक्ष फाउंडेशन व आरोग्य विभागाच्या संयुक्ताने राबविण्यात आलेल्या लसीकरण मोहिमेत १२ पैकी ७ गावांनी शंभर टक्के लसीकरण पूर्ण केले. त्यामुळे ही गावे अधिकृतपणे गर्भाशयाच्या कर्करोगमुक्त घोषित करण्यात आली. ग्रामीण भागात महिलांच्या आरोग्याविषयी जागृती निर्माण करत प्रत्यक्ष कृतीतून साध्य केलेले हे यश राज्यासाठी आदर्श मानले जात आहे.

कार्यक्रमाला जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभागाचे अधिकारी, अंगणवाडी सेविका, गटप्रवर्तिका तसेच गावांचे सरपंच मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोहिमेत मोलाची भूमिका बजावणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना खासदार अमर काळे यांनी ही मोहीम टप्प्याटप्प्याने संपूर्ण वर्धा लोकसभा मतदारसंघात राबवून संपूर्ण मतदारसंघ गर्भाशय कर्करोगमुक्त करण्याचा निर्धार व्यक्त केला. महिलांचे आरोग्य सुरक्षित असेल, तर समाजाचे भविष्य सुरक्षित राहील, असे ते म्हणाले.

समुद्रपूर तालुक्यातील या सात गावांच्या यशाने ग्रामीण आरोग्य व्यवस्थेवर विश्वास दृढ झाला असून महिलांच्या सशक्तीकरणाच्या दिशेने हे मोठे पाऊल ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# वर्धा नगरपालिकेचा १६१ कोटींचा अर्थसंकल्प, पण हातात फक्त ३० लाखांची शिल्लक

## उत्पन्न वाढवले नाही तर विकासाच्या गाडीस ब्रेकः वर्धा पालिकेची स्पष्ट कबुली

**वर्धा जनमाध्यम :** शहराच्या विकासाच्या मोठमोठ्या घोषणा आणि कोट्यवधींच्या तरतुदींच्या गजरात अखेर वर्धा नगर परिषदेचा सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीचा १६१ कोटी ३३ लाख १६ हजार ३०० रुपयांचा अर्थसंकल्प मंगळवारी सादर झाला. मात्र एवढ्या भल्या मोठ्या अंदाजपत्रकानंतरही हाती उरली केवळ ३०.५४ लाखांची शिल्लक, त्यामुळे विकासाच्या गाडीस खऱ्या अर्थाने वेग मिळणार की कागदावरच आकडे नाचणार, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

नगराध्यक्ष सुधीर पांगूळ यांनी अर्थसंकल्प सादर करताना शहराच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प व्यक्त केला. सभेला उपाध्यक्ष प्रदीपसिंग ठाकूर, मुख्याधिकारी विजय देशमुख, लेखापाल स्वप्रिल तुमडाम यांच्यासह सर्व विभागांचे सभापती, नगरसेवक व अधिकारी उपस्थित होते. अखेर सर्वसंमतीने अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला.

**उत्पन्न वाढविणे हाच कळीचा मुद्दा-** मालमत्ता कर (५.०८ कोटी), पाणीपट्टी (२.८४ कोटी) आणि बांधकाम विकास शुल्क (३.५० कोटी) हे प्रमुख स्थानिक उत्पन्न स्रोत आहेत. याशिवाय शासनाकडून सहाय्यक अनुदान (४५ कोटी), अमृत पाणीपुरवठा (१८.५० कोटी), मलनि:सारण योजना (१२ कोटी), १५ वा वित्त आयोग (५.५० कोटी) आदी अनुदानांवर पालिकेचा मोठा आधार आहे. सभेत स्पष्टपणे नमूद करण्यात आले की, महसूली उत्पन्न वाढविल्याशिवाय मोठी भांडवली कामे हाती घेणे शक्य होणार नाही. अन्यथा विकासाच्या घोषणा आणि वास्तव यामध्ये तफावत राहणार आहे.

### आकड्यांचा खेळ काय सांगतो

महसूली जमा: ६२,३२,२१,७५४ रुपये, महसूली खर्च: ६१,९८, २३,००० रुपये, भांडवली जमा: ७७,०३, २६,००० रुपये,भांडवली खर्च : ९९,०४,३९,००० रुपये, महसूली उत्पन्नापेक्षा खर्च कमी ठेवत तूट टाळली असली तरी भांडवली खर्च जास्त असल्याने मोठ्या विकासकामांसाठी आर्थिक कसरत करावी लागणार, हे उघड आहे.



### रस्ते, सौंदर्यीकरण आणि दलित वस्तीवर भर

प्रभागांतील विविध रस्त्यांच्या विकासासाठी ४ कोटी २० लाख रुपये राखीव ठेवण्यात आले आहेत. शहरातील उद्याने, चौक, दुभाजक सौंदर्यीकरण आणि फेरीवाला क्षेत्र विकासासाठी २ कोटी ५० लाख रुपये तर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजनेसाठी तब्बल ८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

### विकासाची दिशा की आर्थिक तारेवरची कसरत-

कोट्यवधींच्या तरतुदी, शिल्लकीचा दाखला आणि विकासाच्या घोषणा यामध्ये शहरवासीयांच्या अपेक्षा मात्र उंचावल्या आहेत. आता प्रत्यक्षात रस्ते, पाणी, स्वच्छता, मलनि:सारण आणि सामाजिक योजनांमध्ये कितपत बदल घडतो, हे येणारा काळच ठरवणार आहे.

शिल्लकीचा अर्थसंकल्प सादर झाला असला, तरी उत्पन्न वाढीची लढाई जिंकली नाही तर विकासाच्या स्वप्नांना आर्थिक वास्तवाचा अडथळा येणार, हेच या सभेतून स्पष्ट झाले.

### कल्याणकारी योजनांची तरतूद, पण प्रश्न कायम

प्रधानमंत्री आवास योजना – ६० लाख, रमाई आवास योजना – ७० लाख, दिव्यांग कल्याण – २५ लाख, महिला व बाल कल्याण – १० लाख

दिव्यांग कल्याणासाठी केवळ २५ लाखांची तरतूद केल्याने काही सदस्यांनी नाराजी व्यक्त केली. शहरात दिव्यांगांसाठी अधिक सुविधा उभारण्याची मागणी जोर धरत आहे.

### देखभाल-दुरुस्तीत मोठा खर्च-

बांधकाम विभाग – १ कोटी, आरोग्य विभाग – १.५० कोटी, आस्थापना खर्च – तब्बल ३.८० कोटी, आस्थापनेवरील वाढता खर्च पालिकेच्या आर्थिक तब्येतीसाठी भविष्यात डोकेदुखी ठरणार का, याचीही चर्चा रंगली.

## गुन्हेगारांना इशारा; वर्धा पोलिसांचा ताफा झाला 'हायटेक'



**वर्धा जनमाध्यम :** कायदा आणि सुव्यवस्थेच्या आघाडीवर आता अधिक सज्ज, अधिक सतर्क, वर्धा पोलीस दलच्या ताफ्यात चार अत्याधुनिक 'एथ्श मिनी' वाहनांची भर पडताच जिल्ह्यातील गुन्हेगारांना जणू थेट इशाराच देण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या आवारात पार पडलेल्या विशेष कार्यक्रमात पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या हस्ते या वाहनांचे लोकार्पण करण्यात आले.

**कायदा-सुव्यवस्थेसाठी गतिमान प्रतिसाद; अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या हस्ते ४ अत्याधुनिक 'SLM मिनी' वाहनांचे लोकार्पण**

वाहनांचे पूजन करून हिरवी झेंडी दाखवत अग्रवाल यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले, गुन्हेगारीला आळा घालायचा असेल तर पोलिसांची सज्जता अत्याधुनिक असली पाहिजे. ही वाहने केवळ गस्तीसाठी नाहीत, तर कायदा मोडणाऱ्यांवर वचक निर्माण करणारी आहेत. चारही बाजूंनी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी सज्ज असलेली ही एथ्श मिनी वाहने आता जिल्ह्यातील शहरी तसेच दुर्गम भागांत वेगाने धावतील. आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ प्रतिसाद, बंदोबस्त, आंदोलनांवरील नियंत्रण, सण-उत्सव काळातील निगराणी आणि गुन्हे तपासात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर या सर्व आघाड्यांवर ही वाहने महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत.

यावेळी अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, पोलीस उपअधीक्षक (गृह) पुंडलीक भटकर, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर (वर्धा), चंद्रशेखर डोले (आर्वी), सुशील कुमार नाईक (हिंगणघाट), वंदना कारखेले (पुलगाव), स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक विनोद चौधरी, मोटार परिवहन अधिकारी देवानंद पाटील यांच्यासह सर्व पोलीस ठाण्यांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

नव्या वाहनांच्या समावेशाने वर्धा पोलिसांची 'फोर्स' आता अधिक वेगवान, अधिक सजग आणि अधिक आक्रमक झाली आहे. गुन्हेगारांनी सावध राहावे, कारण पोलिसांची नजर आता चारही बाजूंनी असणार आहे.

## सिरसोलीत वाघाचा हल्ला; गायीचा जागीच मृत्यू, गावात भीती

**आष्टी शहीद जनमाध्यम :** आष्टी तालुक्यातील वर्धा नदीकाठच्या सिरसोली गावात वाघाच्या हल्ल्याने खळबळ उडाली आहे. गावाच्या शेवटच्या टोकावर गोठ्यात बांधलेल्या गाभण गायीवर वाघाने हल्ला करून तिला ठार केल्याची घटना २४ फेब्रुवारी रोजी सकाळी उघडकीस आली.



भूमिहीन शेतमजूर बाबा किसना सोनुले यांच्या दोन गाईंपैकी एक गाभण गाय होती. रोजप्रमाणे दोन्ही गाई गोठ्यात बांधून ते घरी गेले होते.

रात्रीच्या सुमारास वाघाने गोठ्यात घुसून हल्ला केल्याचा अंदाज आहे. सकाळी गाय रक्ताच्या थारोळ्यात मृतावस्थेत आढळली.

सुमारे ५० हजार रुपये किमतीची गाय दगावल्याने सोनुले कुटुंबावर आर्थिक संकट कोसळले आहे.

परिसरात वाघाचा वावर अधूनमधून दिसत असल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे बिट गार्ड चंद्रशेखर शेंडे यांनी घटनास्थळी पंचनामा केला. पीडित कुटुंबाला शासकीय मदत देण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## मनरेगा अपहारप्रकरणी १८९६ पानांचे दोषारोपपत्र

### ५० लाखांहून अधिक निधी वळविल्याचा आरोप

**वर्धा जनमाध्यम :** आर्वी पंचायत समितीतील मनरेगा निधी अपहार प्रकरणात तपासाला निर्णायक वळण मिळाले असून मुख्य आरोपी प्रणाली कसर हिच्याविरुद्ध १८९६ पानांचे सविस्तर दोषारोपपत्र आर्वी येथील न्यायालयात २० फेब्रुवारी रोजी दाखल करण्यात आले आहे. जवळपास दोन हजार पानांच्या कागदपत्रांचा संच छाननीनंतर अंतिम स्वरूपात सादर करण्यात आला. या प्रकरणात दोष सिद्ध झाल्यास संबंधित आरोपीस किमान १० वर्षांच्या कारावासाची शिक्षा होऊ शकते, अशी माहिती कायदे तज्ज्ञांनी दिली.




प्रणाली कसर हिने सुरुवातीला कंत्राटी डाटा एन्ट्री ऑपरेटर म्हणून काम सुरू केले होते. पुढे मनरेगा सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (एपीओ) पदाची जबाबदारी सांभाळताना तिने शासनाचा सुमारे ५० लाखांहून अधिक निधी टप्प्याटप्प्याने स्वतःच्या बँक खात्यात वळविल्याचा आरोप आहे. याशिवाय काही नातेवाईक व इतरांच्या खात्यांतही शासकीय निधी हस्तांतरित केल्याचे तपासात उघड झाले. गटविकास अधिकारी आणि जिल्हास्तरीय समितीने प्राथमिक चौकशी करून संबंधित प्रकरणी आर्वी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर गुन्हा नोंदवून कसरला अटक करण्यात आली. सध्या ती जिल्हा मध्यवर्ती कारागृहात न्यायालयीन कोठडीत आहे. पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला.

जानेवारी महिन्यात सहाय्यक पोलिस निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याने वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तपासाला वेग देत सुमारे १९०० पानांचे आरोपपत्र तयार केले. कागदपत्रांची छाननी करून काही बाबी वगळल्यानंतर अंतिम १८९६ पानांचे दोषारोपपत्र न्यायालयात सादर करण्यात आले.

या आरोपपत्रात विविध बँक खात्यांची स्टेटमेंट्स, निधी हस्तांतरणाची शृंखला, व्यवहारांचे तांत्रिक विश्लेषण तसेच सुमारे ३५ व्यक्तींचे जबाब समाविष्ट आहेत. तपास यंत्रणेकडून संकलित केलेले हे पुरावे न्यायालयीन प्रक्रियेत महत्त्वाचे ठरणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. दरम्यान, या प्रकरणातील इतर संभाव्य संबंधित व्यक्तींची भूमिकाही तपासली जात आहे. आर्थिक गुन्हे शाखेकडून पुढील कारवाईबाबत हालचाली सुरू असून, येत्या काळात तपासाचा व्याप्ती वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. जिल्ह्यातील मनरेगा योजनेच्या अंमलबजावणीबाबत या प्रकरणामुळे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, न्यायालयीन प्रक्रियेतील पुढील टप्प्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## गर्दीचा गळा आवळला; बाजारदिवशी सेलूत प्रशासनाचा सर्जिकल स्ट्राइक

### नगरपंचायत-पोलीस प्रशासनाची संयुक्त धडक कारवाई

**सेलू जनमाध्यम :** वर्षानुवर्षे बाजारदिवशी गुदमरलेल्या सेलूच्या मुख्य रस्त्याला अखेर दिलासा मिळाला आहे. मंगळवारी सकाळीच नगरपंचायत प्रशासनाने ठाम आणि नियोजनबद्ध कारवाई करत मुख्य रस्त्यावर थाटलेली दुकाने हटवून त्यांना नियोजित आठवडी बाजाराच्या जागी स्थलांतरित केले. परिणामी, बाजारदिवशी होणारी वाहतुकीची कोंडी मोठ्या प्रमाणात कमी झाली असून नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

२४ फेब्रुवारी रोजी सकाळी आठ वाजताच नगरपंचायतीचा ताफा रस्त्यावर उतरला. मुख्याधिकारी अनुप अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी आणि कर्मचारी यांनी मुख्य रस्त्यावर मांडलेली दुकाने हटविण्याची मोहीम सुरू केली. पोलीस बंदोबस्तात पोलीस निरीक्षक देवेन्द्र ठाकूर यांनीही प्रत्यक्ष उपस्थित राहून कारवाई सुरळीत पार पाडली.

दर मंगळवारी आठवडी बाजारामुळे मुख्य रस्त्यावर मोठी गर्दी होत असे. रस्त्याच्या दुतर्फा दुचाकी आणि चारचाकी वाहने उभी राहत असल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प होत होती. शाळकरी मुले, रुग्णवाहिका, ज्येष्ठ नागरिक आणि व्यावसायिक यांना याचा मोठा फटका बसत होता. या प्रश्नावरून नागरिकांकडून प्रशासनाकडे सातत्याने तक्रारी होत होत्या.

विशेष म्हणजे, ही कारवाई केवळ दंडात्मक नव्हती. ध्वनिक्षेपकाद्वारे पूर्वसूचना देत विक्रेत्यांना समजावून सांगण्यात आले. त्यांना नियोजित जागेवर पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली. स्थलांतर करताना नगरपंचायतीच्या कर्मचाऱ्यांनी विक्रेत्यांना प्रत्यक्ष मदत केली. त्यामुळे वादाविना आणि गोंधळाशिवाय मोहीम पार पडली.


कारवाई दरम्यान शहरातील पत्रकार अनिल वांदिले, सतीश वांदिले, आशिष धापुडकर, संजय धोंगडे, सचिन धानकुटे, विनकुमार पाटील तसेच काही सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. नागरिकांनी प्रशासनाच्या या ठाम भूमिकेचे स्वागत केले असून, बाजारदिवशी मुख्य रस्ता कायमस्वरूपी मोकळा ठेवण्याची मागणीही पुढे येत आहे.

एकंदरीत, इच्छाशक्ती आणि समन्वय यांच्या जोरावर सेलूत बाजारदिवशीच्या कोंडीवर निर्णायक प्रहार करण्यात यश आले आहे. आता ही शिस्त कायम राखली जाते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## दुरुस्तीचा फटका; १४ गावांतील पाणीपुरवठा ठप्प

### -सलग पाच दिवस नळ कोरडे; नागरिकांची पाण्यासाठी भटकंती

**वर्धा जनमाध्यम :** शहरालगतच्या १४ गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या योजनेतील मुख्य जलवाहिनी दुरुस्तीमुळे सध्या पाणीपुरवठा पूर्णपणे बंद आहे. परिणामी, गेल्या पाच दिवसांपासून नागरिकांना पाण्यासाठी मोठी धावपळ करावी लागत आहे.



महाकाळी येथील धाम प्रकल्पातून पाण्याची उचल करून पिपरी (मेघे), बोरगाव, सावंगी, सिंदी (मेघे), साटोडा, नालवाडी, म्हसाळा, वरुड, वायगाव (निपाणी), उमरी, दत्तपूर आणि सालोड या गावांना पाणीपुरवठा केला जातो. या योजनेअंतर्गत सुमारे २२ हजार नळजोडण्या देण्यात आल्या आहेत.

७ किलोमीटर लांबीची मुख्य जलवाहिनी जीर्ण झाल्याने ती बदलण्याचे काम २० फेब्रुवारीपासून सुरू करण्यात आले आहे. दिवाळीपूर्वी साडेतीन किलोमीटरचा भाग बदलण्यात आला होता. उर्वरित काम २५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण होईल, अशी माहिती देण्यात आली आहे. त्यानंतर दोन दिवस तांत्रिक चाचणी घेण्यात येणार असून २६ किंवा २७ फेब्रुवारीपासून पाणीपुरवठा सुरळीत होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, पाच दिवसांपासून नळाला पाणी न आल्याने महिलांवर आणि ज्येष्ठांवर विशेषत: ताण वाढला आहे. बोअरवेल असलेल्या घरांना काही प्रमाणात दिलासा मिळत असला, तरी पूर्णपणे नळाच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबांची अडचण वाढली आहे. दुरुस्तीचे काम तातडीने पूर्ण करून पर्यायी व्यवस्था करावी, अशी

## वर्धा नगरपालिकेला बसणारा ७ कोटींच्या वीजबिलाचा फटका थांबवा

### -नगरसेवक डॉ.चावरे यांचा सौर प्रकल्पाचा सभेत प्रस्ताव

**वर्धा जनमाध्यम :** दरवर्षी पाणीपुरवठा व पथदिव्यांच्या वीजबिलासाठी कोट्यवधी रुपये मोजावे लागत असल्याने नगरपरिषदेच्या आर्थिक स्थितीवर वाढता ताण येत आहे. या पार्श्वभूमीवर वर्धा नगर परिषदेच्या अंदाजपत्रक सभेत नगरसेवक डॉ. सुनील चावरे यांनी सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचा ठोस प्रस्ताव मांडत प्रशासनाचे लक्ष वेधले.

नगरपरिषदेला दरवर्षी सुमारे ७ कोटी २० लाख रुपये वीजबिल म्हणून अदा करावे लागतात. ही रक्कम महावितरणकडे जमा केली जाते. बिल भरण्यात विलंब झाल्यास स्ट्रीट लाईट तोडण्याच्या नोटिसा मिळतात, ज्यामुळे शहराच्या सुरक्षेवर थेट परिणाम होतो, अशी बाब डॉ. चावरे यांनी सभेत स्पष्ट केली.



वाढत्या वीजदरांच्या ओझ्याखाली नगरपरिषद दबली जात आहे. कायमस्वरूपी उपाय म्हणून सौर ऊर्जा प्रकल्प हाच पर्याय आहे, असे सांगत त्यांनी नगरपरिषद स्तरावर सोलार पार्क उभारण्याची मागणी केली. हा प्रकल्प पीपीपी (Public-Private Partnership) किंवा रेस्को (RESCO) मॉडेलद्वारे राबविल्यास प्रारंभीचा आर्थिक भार कमी होईल आणि दीर्घकालीन बचत साधता येईल, असेही त्यांनी नमूद केले. शहराला हरित व स्वावलंबी बनविण्यासाठी सर्वांनी एकमताने निर्णय घ्यावा, असे आवाहन करत डॉ. चावरे यांनी सौर ऊर्जेकडे वळण्याची गरज अधोरेखित केली. त्यांच्या या प्रस्तावामुळे नगरपरिषदेत सौर प्रकल्पाच्या चर्चेला वेग आला असून, आता प्रशासन कोणता निर्णय घेते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.


### बांधकाम निविदा

### कार्यालय ग्रामपंचायत, रिधोरा, त.सेलू, जि.वर्धा

ग्रा.पं.रिधोरा अंतर्गत खालील कामाच्या नोंदणीकृत निविदा धारकांकडून दोन लिफाफा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | योजना | तांत्रिक मं.दिनांक | प्राकलन किंमत | निविदा फी | इसारा १ टक्का रक्कम | निविदा सादर करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | नाली बांधकाम करणे | १५ वा वित्त आयोग | ५७३/२०२५-२६ | १५०००० | ५०० | १५०० | २३.०२.२०२६ ते ०२.०३.२०२६ सायं.५ वाजेपर्यंत |
| २ | अंगणवाडी दुरुस्ती करणे | १५ वा वित्त आयोग | ५७४/२०२५-२६ | १७७५०० | ५०० | १७७५ | २३.०२.२०२६ ते ०४.०३.२०२६ सायं.५ वाजेपर्यंत |
| ३. | संरक्षण भिंत बांधकाम करणे जि.प.शाळा रिधोरा | १५ वा आयोग | ५७४/२०२५-२६ | १००००० | ५०० | १००० | २३.०२.२०२६ ते ०२.०३.२०२६ सायं.५ वाजेपर्यंत |
| ४. | बंदिस्त नाली बांधकाम करणे | १५ वा वित्त आयोग | ५७६/२०२५-२६ | ३५०००० | ५०० | ३५०० | २३.०२.२०२६ ते ०४.०३.२०२६ सायं.५ वाजेपर्यंत |
| ५. | सिमेंट रोड बांधकाम करणे | १५ वा वित्त आयोग | ५७७/२०२५-२६ | १०३००० | ५०० | १०३० | २३.०२.२०२६ ते ०४.०३.२०२६ सायं.५ वाजेपर्यंत |
| ६. | जि.प.शाळा स्वच्छता गृह दुरुस्ती करणे | ग्राम स्वच्छता पुरस्कार | ५७८/२०२५-२६ | ५०००० | ५०० | ५०० | २३.०२.२०२६ ते ०४.०३.२०२६ सायं.५ वाजेपर्यंत |
| ७. | ग्रा.पं. सौदर्यीकरण करणे | १५ वा वित्त आयोग | ५७९/२०२५-२६ | १३०००० | ५०० | १३०० | २३.०२.२०२६ ते ०४.०३.२०२६ सायं.५ वाजेपर्यंत |
| ८. | पाईप लाईन दुरुस्ती करणे | १५ वा वित्त आयोग | ५८०/२०२५-२६ | ३६५०० | ५०० | ३६५ | २३.०२.२०२६ ते ०४.०३.२०२६ सायं.५ वाजेपर्यंत |

कामाच्या संबंधित अटी व शर्ती ग्रा.पं.कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आलेली आहे. अनामत रक्कम व निविदा फी चा भरणा खाते क्र. 970110110007322 IFSC Code-BKID0009718 सामान्य फंड ग्रा.पं.रिधोरा बॅंक ऑफ इंडिया सुकळी बाई या खात्यात मुदतीच्या आत जमा करण्यात यावा.

**स्वा/-**
**सरपंच,**
**ग्रामपंचायत, रिधोरा**

**स्वा/-**
**सचिव**
**ग्रामपंचायत, रिधोरा**

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय



## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे मुंबई येथे आगमन

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे दुपारी ३.०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ मुंबई येथे आगमन झाले.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी पुष्पगुच्छ देउन स्वागत केले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, महापौर रितू तायडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल उपस्थित होते.तसेच लेफ्ट जनरल डी. एस. कुशवाह, पोलीस महासंचालक सदानंद दाते, एयर व्हाईस मार्शल पी. एस. वाडोदकर, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, सौरभ कटियार, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

### महामार्गांवरील अपघात रोखण्यासाठी कठोर उपाययोजना

# दारू पिउन वाहन चालवणा-यांवर कठोर कारवाई- परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यातील वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर परिवहन विभागाने विविध कठोर उपाययोजना हाती घेतल्या असून दारू पिउन वाहन चालवणा-या चालकांवर कठोर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानसभेतील लक्षवेधी सूचनेवर दिली.

राज्यातील महामार्गावर चालविण्यात येत असलेल्या खासगी स्लिपर कोच बसेसच्या अपघातासंदर्भात सदस्य धनंजय मुंडे यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक बोलत होते. यावेळी सदस्य जयंत पाटील, भास्कर जाधव, आदित्य ठाकरे, देवयानी फरांदे आदींनी या चर्चेत सहभाग घेतला.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, गेल्या वर्षी झालेल्या भीषण बस अपघातात २५ प्रवाशांचा मृत्यू झाला. संबंधित बस पुणे नोंदणी क्रमांकाची होती आणि प्रकरण छत्रपती संभाजीनगर येथे दाखल करण्यात आले. तसेच ऑक्टोबर २०२३ मध्ये समृद्धी महामार्गावरील वैजापूर येथे झालेल्या अपघातात १२ प्रवाशांचा मृत्यू झाला. अशा घटना गंभीर आहेत. २५ जणांचा मृत्यू झालेल्या अपघातातील चालक दारू च्या नशेत असल्याचे पोलिस चौकशीत स्पष्ट झाले. बस पलटी झाल्याने प्रवाशांना बाहेर पडता आले नाही आणि त्यांचा मृत्यू झाला. काही खासगी बस चालक स्लीपर कोचच्या नावाखाली बसमध्ये अनधिकृत बदल करतात.




पूर्वी एकच स्लीपर कोच असायचा; आता दोन स्तरांवर स्लीपर कोच बसवले जातात. परदेशात स्लीपर कोचला बंदी आहे; मात्र आपल्या देशात केंद्र सरकारच्या नियमानुसार सेवा सुरू असल्याने बंदी नाही. महाराष्ट्राने बंदी घातली तरी इतर राज्यांत नोंदणीकृत बस येथे येउ शकतात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

अपघात रोखण्यासाठी राज्यभर चेकपोस्ट उभारण्यात आले असून अधिका-यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विविध उपाययोजनांमुळे अपघातांचे प्रमाण कमी झाले असून गेल्या वर्षभरात इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात अपघातांचे प्रमाण एक टक्क्याने घटले आहे. मात्र हे समाधानकारक नसून अपघातांचे प्रमाण शून्यावर आणण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले.वेग नियंत्रणासाठी बसमध्ये ८० किमी प्रतितास मर्यादेचा स्पीडोमीटर बसवण्याचे निर्देश अधिका-यांना देण्यात आले आहेत. काही बस १२० ते १४० किमी वेगाने धावत असल्याच्या तक्रारी आहेत. तसेच ब्रेक ॲनालायझर यंत्रणा बसवण्याचा विचार सुरू आहे. चालकाने दारू प्यायल्यास ही यंत्रणा बस सुरू होउ देत नाही. या यंत्रणेची किंमत दीड लाख रुपये आहे. एसटी महामंडळाच्या नव्या बसमध्ये तसेच टाटा आणि अशोक लेलँड कंपन्यांकडून घेतल्या जाणा-या बसमध्ये ही यंत्रणा अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. खाजगी बस चालकांनीही ही यंत्रणा बसवावी, असे निर्देश देण्यात आले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.रस्ते सुरक्षेसाठी आराखडा तयार केला जात आहे. रिफ्लेक्टर, ॲरो मार्किंग, यु-टर्न आणि स्ट्रेट लेनसाठी दिशादर्शक फलक, १००, २००, ३००, ५०० मीटर अंतर दर्शवणारे बोर्ड लावण्याची योजना आहे. हा आराखडा राष्ट्रीय महामार्ग, सार्वजनिक बांधकाम विभागाचे रस्ते, एसटी महामंडळाचे मार्ग तसेच महापालिका क्षेत्रातील रस्त्यांवरही लागू केला जाणार आहे. अंतिम टप्प्यातील या आराखड्याला लवकरच मान्यता मिळेल, असे मंत्री महोदयांनी यावेळी सांगितले. सांगली येथे एका बसचे चेसी नंबर वेगवेगळ्या प्रकारे वापरल्याची बाब निदर्शनास आली असून त्याची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. चुकीच्या पद्धतीने वाहन चालवणे, नियमांचे उल्लंघन करणे किंवा फसवणूक आढळल्यास संबंधितांवर कारवाई करून आवश्यक असल्यास गुन्हे दाखल करण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. सभागृहात उपस्थित सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची चौकशी करून तातडीने कारवाई केली जाईल, अशी ग्वाही मंत्री श्री. सरनाईक यांनी दिली.

### डिजिटल अरेस्ट हा निव्वळ खोटेपणा

## फसवणुकीचा संशय आल्यास लगेच 1930 वर संपर्क करावा

**मुंबई/प्रतिनिधी ::** कोणालाही डिजिटल अरेस्ट करता येत नाही. अशा प्रकारचा काल, मेसेज किंवा व्हिडिओ काल आल्यास तो फसवणूक असल्याने डिजिटल अरेस्टचा फोन आल्यास नागरिकांनी तत्काळ १९३० या सायबर हेल्पलाईनवर संपर्क साधावा. अशा प्रकरणात जनजागृतीसाठी राज्य आणि केंद्र शासनाकडून याबाबत मोठ्या प्रमाणात जनजागृती मोहीम राबवली जात असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत प्रश्नोत्तरांच्या वेळी सांगितले. राज्यात, विशेषत मुंबई आणि अहिल्यानगर शहरांमध्ये डिजिटल अरेस्ट आणि ऑनलाईन फसवणुकीद्वारे होत असलेल्या लूट प्रकरणांबाबत आमदार अबू आझमी यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, अलीकडे काही फसवे लोक स्वतःला पोलीस अधिकारी, कस्टम अधिकारी म्हणून ओळखवतात आणि नागरिकांना सांगतात की त्यांच्या नावावर आलेल्या पार्सलमध्ये ड्रग्स सापडले आहेत. त्यानंतर ते नागरिकांना सांगतात की त्यांना डिजिटल अरेस्ट करण्यात आले आहे आणि स्क्रीनसमोरून हलू नये. त्यानंतर ते लोकांना घाबरवून मोठी रक्कम ऑनलाइन ट्रान्सफर करण्यास भाग पाडतात. या प्रकरणांत सामान्य नागरिकांसह उच्चपदस्थ निवृत्त अधिकारीही फसले आहेत. एका निवृत्त आयएएस अधिकारी आणि नौदलातील वरिष्ठ अधिका-याने सुद्धा भीतीपोटी पैसे गमावले आहेत. या फसवणुकीचे जाळे विदेशातून चालवले जाते, तर भारतातील लोक फक्त हँडलर म्हणून काम करतात. राज्यात सायबर गुन्ह्यांवर नियंत्रणासाठी व्यापक यंत्रणा उभारण्यात आली असून, जर कोणी चुकीने पैसे ट्रान्सफर केले असतील आणि तत्काळ १९३० वर कळविले, तर बँकांच्या समन्वयातून त्या रकमा गोठविणे शक्य असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## राज्यातील खासगी व धर्मादाय रुग्णालयांना शासकीय आरोग्य योजना राबविणे बंधनकारक

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यातील खासगी व धर्मादाय रुग्णालयांनी केंद्र आणि राज्य शासनाच्या आरोग्य योजनांची अंमलबजावणी करणे बंधनकारक असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले. आमदार भिमराव तापकीर यांनी मांडलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शासनाने धर्मादाय रुग्णालयांची नवीन सवलतीची व्याख्या तयार केली असून त्या अनुषंगाने अनेक रुग्णालये आता धर्मादाय श्रेणीत येतात. या रुग्णालयांनी गरीब व गरजू रुग्णांसाठी राखीव खाटा आणि निधीबाबत पारदर्शकता ठेवणे आवश्यक आहे. रुग्णालयांमधील उपलब्ध खाटा आणि रुग्णांवरील खर्चाची अचूक माहिती मिळावी म्हणून शासनाने डायनॅमिक डॅशबोर्ड तयार केला आहे. या माध्यमातून प्रत्येक रुग्णालयातील खाटांची माहिती, त्यावरील खर्च, आणि धर्मादाय निधीचा उपयोग आदी माहिती कोणत्याही वेळेत पाहता येईल. पूर्वी रुग्णालये केवळ खर्च दाखवायची, पण



प्रत्यक्ष सेवा देतात की नाही याची खात्री नव्हती. आता निश्चित दर (रेट्स) शासनाने वाढवून दिले आहेत आणि त्या दरानुसारच रुग्णालयांना सेवा द्यावी लागेल. प्रत्येक रुग्णालयाने आपल्या बेडचा दर सार्वजनिकपणे घोषित करणे अनिवार्य असेल. तसेच रुग्णालयांनी त्यांच्या एकूण निधीपैकी २ टक्के रक्कम धर्मादाय सेवेसाठी वापरणे बंधनकारक आहे. मात्र आतापर्यंत या निधीचा अचूक वापर दिसून येत नव्हता. या अधिवेशनात कायद्यात सुधारणा करून हा २ टक्के निधी डॅशबोर्डवर दिसेल, ज्यातून कोणत्या रुग्णावर किती खर्च झाला हे स्पष्ट होईल. या संदर्भातील काही मुद्दे उच्च न्यायालयात प्रलंबित आहेत. न्यायालयाने विधी व न्याय विभागाला रुग्णालयांची बाजू ऐकून निर्णय घेण्याचे निर्देश दिले असून, शासनाचे मत स्पष्ट आहे की, सर्व धर्मादाय रुग्णालयांनी केंद्र व राज्याच्या आरोग्य योजना तसेच राखीव खाटा व निधी पारदर्शकपणे लागू कराव्यात, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.पहिल्यांदाच राज्य शासनाकडे प्रत्येक रुग्णालयाच्या बेडची अद्ययावत माहिती उपलब्ध आहे. पुढील दुरुस्ती नंतर ही प्रणाली अधिक सक्षम आणि पारदर्शक होईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. या प्रश्नाच्या चर्चेत राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, विधानसभा सदस्य विजय वडेट्टीवार, आमिन पटेल,प्रशांत बंब यांनी सहभाग घेतला.

## राज्यातील शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे काम प्राधान्याने सुरू

**मुंबई/प्रतिनिधी :** उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दहावी व बारावी परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणि शिस्त आणण्यासाठी राज्यातील शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे काम प्राधान्याने सुरू आहे. राज्यातील १७ हजार अनुदानित शाळात सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत. उर्वरित ४ हजार शाळात लवकरच सीसीटीव्ही बसविले जातील, असे शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी सांगितले. राज्यातील शाळेतील प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत विधान



परिषद सदस्य सुधाकर अडबाले यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य शशिकांत शिंदे, अभ्यंकर, भाई जगताप यांनी सहभाग घेतला. राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले, शासन व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सुमारे ६५ हजार शाळांपैकी जिल्हा नियोजन समितीच्या ५ टक्के निधीतून आतापर्यंत १८ हजार शाळांत सीसीटीव्ही बसविण्यात आले आहेत. या निधीतून केवळ सीसीटीव्ही नव्हे तर कंपाऊंड, वर्गखोल्यांची दुरुस्ती आदी कामेही केली जात असल्याचे राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी सांगितले. राज्यमंत्री डॉ. भोयर म्हणाले, डोंगरी भागातील शाळांसाठी स्वतंत्र डोंगरी विकास निधी उपलब्ध असून त्या माध्यमातूनही या भागातील शाळेत सीसीटीव्ही बसविण्याची सूचना करण्यात येईल. शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळामध्ये सीसीटीव्ही बसविण्यासाठी आवश्यक असलेल्या निधीचे स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करून शासनाकडून निधी उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही केली जाईल असेही त्यांनी सांगितले.

## शिक्षकांच्या अशैक्षणिक कामाबाबत आमदारांसमवेत बैठक घेणार

**मुंबई/प्रतिनिधी :** शिक्षकांवर वाढत चाललेल्या अशैक्षणिक कामांच्या पार्श्वभूमीवर अध्यापनावर परिणाम होउ नये यासाठी सर्व शिक्षक आमदारांसोबत बैठक घेउन याबाबत निर्णय घेण्यात येईल असे शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. याबाबत सदस्य विक्रम काळे यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य प्रवीण दरेकर, अभिजीत वंजारी, ज्ञानेश्वर म्हात्रे, किरण सरनाईक यांनी उपप्रश्न उपस्थित केले. राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले, शिक्षकांना अध्यापनासाठी पुरेसा वेळ मिळावा यासाठी २३ ऑगस्ट २०२४ शासन निर्णयानुसार शैक्षणिक, अशैक्षणिक आणि आरटीई अंतर्गत अनिवार्य कामांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार दशवार्षिक जनगणना, आपत्ती निवारणाची कामे तसेच स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य विधिमंडळ व संसद निवडणुका हीच अनिवार्य कामे शिक्षकांकडून घेतली जाणार आहेत. इतर अशैक्षणिक कामे शिक्षकांना सोपवू नयेत, याबाबत संबंधित विभागांना त्यांच्या क्षेत्रीय कार्यालयांना आवश्यक सूचना देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच शिक्षकांचे काम सुलभ व्हावे आणि प्रत्यक्ष अध्यापनासाठी अधिक वेळ उपलब्ध व्हावा यासाठी सरल व युडायस (यूडीआयएसई) प्रणालींचे एकत्रिकरण करण्यात आले आहे. शाळा स्तरावरील विविध समित्यांचे विलिनीकरण करून समित्यांची संख्या कमी करण्यात आली आहे.

## कृषी उत्पन्न बाजार समितीतील गैरव्यवहार प्रकरणी सखोल चौकशी

**मुंबई/प्रतिनिधी :** पुणे कृषी उत्पन्न बाजार समिती मधील कथित गैरव्यवहारांबाबत प्राप्त तक्रारी व निवेदनांच्या अनुषंगाने सखोल चौकशी सुरू करण्यात आली आहे. पणन संचालकांनी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली असून हा अहवाल सादर करण्यासाठी २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असल्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. याबाबत सदस्य अमित गोरखे यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य सदाभाउ खोत, विक्रम काळे, सतेज पाटील यांनी उपप्रश्न उपस्थित केले. पणन मंत्री जयकुमार रावल म्हणाले, पणन संचालकांनी जिल्हा उपनिबंधक (ग्रामीण), पुणे यांना आवश्यक कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार अनधिकृत स्टाल्स बंद करण्यात आले असून अनधिकृत बांधकामांवर दंडात्मक कारवाईची प्रक्रिया सुरू आहे. संबंधितांना बांधकामे काढून घेण्याच्या नोटिसाही बजावण्यात आल्या आहेत.

जाहीर निविदा न काढता संचालक मंडळाच्या ठरावाद्वारे देण्यात आलेल्या सुरक्षा सेवा, मानधन व इतर कामांबाबत तत्काळ स्थगिती व रद्द करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पुढील सर्व कामे टेंडरिंग पद्धतीने व कायद्यानुसारच करण्यात यावीत, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. निवडणुकांमुळे आचारसंहितेच्या कालावधीत निविदा प्रक्रिया रखडली होती, मात्र त्यानंतर निविदा काढून प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. .

## विधानसभा तालिका अध्यक्ष जाहीर

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी सदस्य सर्वश्री योगेश सागर, संजय केळकर, दिलीप लांडे, चंद्रकांत नवघरे, सुनिल प्रभू, राजू खरे, अमित झनक आणि समाधान अवताडे यांची तालिका अध्यक्ष म्हणून नाम-नियुक्ती जाहीर केली.

## वि.परिषद तालिका सभापतींची नियुक्ती

**मुंबई/प्रतिनिधी :** विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला २३ फेब्रुवारीपासून सुरुवात झाली असून विधान परिषदेच्या कामकाजासाठी तालिका सभापतींची नियुक्ती विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी सभागृहात जाहीर केली. सभापती प्रा. राम शिंदे यांनी तालिका सभापती म्हणून सदस्य चित्रा वाघ, कृपाल तुमाने, विक्रम काळे, राजेश राठोड आणि सुनिल शिंदे यांची नियुक्ती करण्यात आल्याचे जाहीर केले.

## ऑर्केस्ट्राबारवर कडक कारवाई करण्याबाबत कायद्यात दुरुस्ती करणार

**मुंबई/प्रतिनिधी :**वारंवार नियमभंग करणा-या ऑर्केस्ट्रा-बारवर कडक कारवाई करण्याबाबत कायद्यात लवकरच दुरुस्ती करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. राज्यात नियमांचे उल्लंघन करणा-या ऑर्केस्ट्रा व डान्सबारविरुद्ध कारवाई करण्याचा मुद्दा आमदार सुभाष देशमुख यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात उपस्थित केला होता. या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हणाले की, ऑर्केस्ट्राबारच्या नावाखाली काही ठिकाणी डान्सबार चालवले जातात. अशा ठिकाणी कारवाई केल्यानंतरही पुन्हा त्याच प्रकारे व्यवसाय सुरु केला जातो. त्यामुळे राज्य शासनाने ठरवले आहे की तीन वेळा नियमांचे उल्लंघन झाल्यास त्यांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्याची तरतूद कायद्यात करण्यात येईल. या अधिवेशनात किंवा पुढील अधिवेशनात यासंदर्भात आवश्यक दुरुस्ती प्रस्तावित केली जाईल.

## विद्यार्थ्यांसाठीच्या प्रमुख पाच ते सहा योजनांची माहिती देणारे फलक शाळांमध्ये लावले जावे

### शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

**मुंबई/प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या अनेक योजना असून त्यांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे. यासाठी सर्व शाळांमध्ये प्रमुख पाच ते सहा योजनांची ठळक माहिती देणारे फलक प्रदर्शित केले जावे, असे निर्देश शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिले. शालेय शिक्षण विभागाच्या विविध योजनांबाबत आढावा बैठक मंत्रालयात झाली. यावेळी मंत्री दादाजी भुसे बोलत होते. बैठकीला शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजीतसिंग देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळाचे अध्यक्ष नंदकुमार बेडसे, शिक्षण संचालक (एनसीईआरटी) हेमंत वसेकर, शिक्षण संचालक (माध्यमिक) महेश पालकर, शिक्षण संचालक (प्राथमिक) शरद गोसावी, उपसचिव तुषार महाजन व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मंत्री दादाजी भुसे म्हणाले, विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या वतीने अनेक योजना राबविल्या जातात. या योजनांची माहिती ब-याच वेळेला विद्यार्थ्यांना व पालकांना नसते. या योजनांपासून विद्यार्थी वंचित राहू नये म्हणून प्रयत्न केले जावे. प्रमुख योजनांची माहिती ठळक स्वरूपात तीन बाय चार आकाराच्या फलकाद्वारे प्रत्येक शाळेमध्ये दर्शनी जागी लावली जावी. मंत्री दादाजी भुसे म्हणाले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेतून अनाथ विद्यार्थ्यांसह, तसेच ज्याचे दोन्ही पालक अपंग आहेत असे विद्यार्थी, प?क्सो कायदा अंतर्गत नुसार पिडित विद्यार्थी आदींना शिक्षणासाठी दरमहा २,२५० रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने यासाठी नियुक्त संस्थांनी अशा बालकांचा शोध घेउन त्यांची परिपूर्ण माहिती द्यावी. जिल्हा न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली समिती कडून यासाठी कार्यवाही केली जाते. एकल पालक असलेल्या विद्यार्थ्यांसाठी कोरोना कालावधी सुरू केलेली योजना आता नियमित स्वरूपात सुरू आहे, असे मंत्री दादाजी भुसे यांनी यावेळी सांगितले.राज्यातील सर्व अनुदान व विनाअनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक नोंदणी आणि प्रमाणीकरण होणे गरजेचे आहे. एकूण २१५३४१९९ विद्यार्थ्यांपैकी १०४५१२५ विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण होणे बाकी असून त्या साठी कार्यवाही केली जावी अशा सूचना मंत्री दादाजी भुसे यांनी दिल्या.

## इराणमधील भारतीय नागरिकांना इराण सोडण्याचे तेहरानमधील भारतीय दूतावासाचे आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी :** भारत सरकारने ५ जानेवारी २०२६ रोजी जारी केलेल्या सूचनेच्या अनुषंगाने आणि इराणमधील बदलती परिस्थिती लक्षात घेता, सध्या इराणमध्ये असलेल्या भारतीय नागरिकांना (विद्यार्थी, यात्रेकरू, व्यापारी आणि पर्यटक) उपलब्ध वाहतुकीच्या साधनांनी, ज्यामध्ये व्यावसायिक विमान सेवांचा समावेश आहे, त्याद्वारे इराण सोडण्याचा सल्ला तेहरानमधील भारतीय दूतावासामार्फत देण्यात आला आहे. १४ जानेवारी २०२६ रोजीच्या सूचनेनुसार सर्व भारतीय नागरिक आणि भारतीय वंशाच्या व्यक्तींनी योग्य खबरदारी बाळगावी, आंदोलने किंवा निदर्शने होणा-या भागांत जाणे टाळावे, इराणमधील भारतीय दूतावासाच्या संपर्कात राहावे आणि स्थानिक घडामोडींसाठी स्थानिक प्रसारमाध्यमांवर लक्ष ठेवावे. इराणमधील सर्व भारतीय नागरिकांनी पासपोर्ट आणि ओळखपत्रांसह आपली प्रवास आणि इमिग्रेशन कागदपत्रे स्वतःकडे तयार ठेवावीत. यासंदर्भात कोणत्याही मदतीसाठी त्यांनी भारतीय दूतावासाशी संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे. इराणमध्ये असलेल्या ज्या भारतीय नागरिकांनी अद्याप भारतीय दूतावासाच्या लिंकवर (https://www.meaers.com/request/home) नोंदणी केलेली नाही, त्यांनी ती करुन घ्यावी. ही लिंक दूतावासाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे. इराणमधील इंटरनेट व्यत्ययामुळे एखादा भारतीय नागरिक नोंदणी करु शकत नसेल तर त्यांच्या भारतातील कुटुंबीयांनी ही नोंदणी करावी असे आवाहन तेहरानमधील भारतीय दुतावासामार्फत करण्यात आले आहे.

**भारतीय दूतावासाचे आपत्कालीन संपर्क क्रमांक आणि ईमेल :-** +९८९१२८१०९११५; +९८९१२८१०९१०९; +९८९१२८१०९१०२; +९८९९३२१७९३५९.

## शासकीय कामकाजात ‘एआय’च्या प्रभावी वापरावर भर –मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे बाजारपेठेचे आणि रोजगाराचे स्वरूप झपाट्याने बदलत असून शासनाने सज्ज आणि सक्षम प्रशासन उभारण्यासाठी शासकीय कामकाजात एआयच्या प्रभावी वापरावर भर देण्यास सुरुवात केली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुंबई येथे नॅसकॉम टेक्नॉलॉजी अँड लिडरशिप फोरम २०२६ च्या चर्चासत्रात पत्रकार विष्णु सोम यांनी विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरात मुख्यमंत्री देवेंद फडणवीस यांनी आपले विचार व्यक्त केले. या चर्चासत्रात मायक्रोसॉफ्ट इंडियाच्या अध्यक्ष सिंधू गंगाधरन आणि पीडब्ल्यूसीचे अध्यक्ष संजीव कृष्णन यांचाही सहभाग होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शासन यंत्रणेत एआयचा वापर वाढवून सक्षम डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा उभारण्यावर भर दिला जात आहे. राज्यातील शैक्षणिक संस्था आणि उद्योग क्षेत्र यामध्ये समन्वय वाढवून एआय-सक्षम मनुष्यबळ तयार करण्यावर शासन काम करत आहे. यासाठी मुंबईत राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात येईल. बदलत्या तंत्रज्ञानामुळे रोजगाराच्या संधींचे स्वरूप बदलत आहे आणि शिक्षण प्रणालीने त्यानुसार करावयाचे बदल यावर विचारमंथन होईल. शासन, शिक्षण संस्था आणि नॅसकॉमसारख्या उद्योग संघटनांनी एकत्रितपणे काम केल्यास एआय क्षेत्रात महाराष्ट्र अधिक वेगाने पुढे जाउ शकतो, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

**डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांमध्ये भारताचे जागतिक नेतृत्व**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अलीकडेच दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत ब्राझीलच्या मंत्र्यांनी भारताच्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या (DPI) अनुभवाच्या आधारे स्वताची प्रणाली विकसित करत असल्याचे सांगितले. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या बाबतीत भारत सध्या जागतिक नेतृत्व करत आहे.

**कृषी क्षेत्रात ॲग्रीस्टॅक आणि महाविस्तार या एआयचा वापर**

राज्यात नुकत्याच सुरू झालेल्या एआय ४अग्री समिटचा उल्लेख करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अग्रीस्टॅक या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील प्रत्येक शेतक-याची जमीनधारणा, पिकांची माहिती आणि इतर तपशील एकत्रित केले जात आहेत. त्याचबरोबर महाविस्तार या एआय ॲपद्वारे जनरेटिव्ह एआयचा वापर करून प्रत्येक नोंदणीकृत शेतक-याला वैयक्तिक्त डिजिटल सहाय्यक उपलब्ध करून देण्यात येत आहे. सध्या ३० लाख शेतकरी या प्लॅटफॉर्मवर जोडले गेले आहेत. ॲग्रीस्टॅक आणि महाविस्तार यांचा संगम शेतक-यांसाठी उत्पादन खर्च २५ ते ४० टक्क्यांनी कमी करण्यास आणि शेतीतील अनिश्चितता कमी करण्यास नक्की मदत करेल.

धोरणनिर्मितीत उद्योगांचा सहभाग

राज्यातील धोरणनिर्मिती आता पॉलिसी-लेड ग्रोथ या मंत्रावर आधारित असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. जागतिक क्षमता केंद्र (जीसीसी) धोरण तयार करताना विविध उद्योग संघटनांचा सहभाग घेतला गेला. त्यानुसार पुणे शहर हे जीसीसी या परिसंस्थेत देशात अव्वल ठरल्याचे अहवालात नमूद झाले आहे. तसेच लाजिस्टिक धोरणही लाजिस्टिक कौन्सिलच्या सहभागातून तयार करण्यात आले असून ते भविष्योन्मुख असल्याचे त्यांनी सांगितले. पुरवठा साखळी व्यवस्थापनात लाजिस्टिक्सची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होत असल्याने या क्षेत्रात एआयचा वापर वाढवण्यासाठी स्वतंत्र धोरण तयार करण्याचे काम सुरू आहे. यासाठी नॅसकाम, सीआयआय आणि विविध सेक्टर कौन्सिल्ससोबत सहकार्य केले जाणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

एआय म्हणजे संधी- एआयमुळे रोजगार नष्ट होतील, या भीतीबाबत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, संगणक क्रांतीच्या वेळीही अशीच भीती व्यक्त करण्यात आली होती. मात्र भारताने त्या क्रांतीचा लाभ घेत आयटी क्षेत्रात मोठी झेप घेतली. आता एआयकडे पर्याय म्हणून नव्हे तर प्रगतीची संधी म्हणून पाहिले पाहिजे. रोजगाराचे स्वरूप बदलेल, नव्या संधी निर्माण होतील. आज क्रिएटर हा व्यवसाय अस्तित्वात आला आहे; तो दहा वर्षांपूर्वी कल्पनेतही नव्हता, असे ते म्हणाले. त्याचबरोबर, नव्या पिढीने तंत्रज्ञान आत्मसात केले असून बदल स्वीकारण्याची मानसिकता महत्त्वाची असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## महाज्योतीचे कोणतेही प्रशिक्षण बंद नाही

### विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार ऑनलाईन प्रशिक्षणाचा निर्णय




**मुंबई/प्रतिनिधी :**महाज्योती मार्फत राबविण्यात येणारे सर्व स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रम वेळेत आणि नियोजनबद्ध पद्धतीने सुरू असून कोणताही कार्यक्रम ठप्प नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या वाढत्या मागणीचा विचार करून काही प्रशिक्षण कार्यक्रम ऑनलाईन स्वरूपात राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे प्रकल्प संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे. महाज्योतीकडून एकूण ११ प्रकारचे स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येतात. त्यापैकी संघ लोकसेवा आयोग (यूपीएससी), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) चे राज्यसेवा व संयुक्त गट ब व क तसेच मिलिटरी भरती प्रशिक्षण या स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण हे ऑफलाईन स्वरूपात देण्यात येत आहे. त्यातील संघ लोकसेवा आयोग प्रशिक्षणाचा लाभ घेणा-या विद्यार्थ्यांना प्रतिमाह रुपये १३ हजार विद्यावेतन, एकवेळ रुपये १८ हजार आकस्मिक निधी प्रदान करण्यात येतो. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे राज्यसेवा व संयुक्त गट-ब व क तसेच मिलिटरी भरती प्रशिक्षण कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांना प्रतिमाह रुपये १० हजार विद्यावेतन, एकवेळ रुपये १२ हजार आकस्मिक निधी प्रदान करण्यात येतो. त्यामुळे या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या स्वरूपात कोणताही बदल करण्यात आलेला नसून विद्यावेतन, आकस्मिक निधी नियमित चालू राहणार आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा प्रशिक्षणातून २९८, कर्मचारी निवड आयोग प्रशिक्षणात ४९९, मिलिटरी भरती प्रशिक्षणात १५००, एमबीए सीएटी/सीएमएटी-सीईटी प्रशिक्षणात १५००, यूजीसी एनईटी/सीएसआयआर/एमएच-एसईटी प्रशिक्षणात १२०० तर यूपीएससी प्रशिक्षणात ४००, एमपीएससी गट ब व क मध्ये ४००, एमपीएससी राज्यसेवा प्रशिक्षणात ३०० तर जेईई, एनईईटी-एमएच-सीईटी प्रशिक्षणात ३५०० विद्यार्थ्यांना आतापर्यंत लाभ देण्यात आलेला आहे.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# राज्याचा लेखाजोखा

महाराष्ट्र हे अग्रगण्य प्रगत राज्य आहे आणि दावोस येथून राज्यामध्ये २० लाख कोटीची गुंतवणूक येणार आहे हे राज्यपालांनी आवर्जून सांगितले. याबरोबरच राज्यात या गुंतवणुकीसोबत १५ लाख रोजगारांची निर्मिती होणार आहे हे देखील राज्यपालांनी नमूद केले. राज्याने दावोसमधून ९.८ लाख कोटी रुपयांचे एमओयू म्हणजे सामंजस्य करार केले. ही आकडेवारी रूक्ष वाटू शकते. यंदाचे अधिवेशन अनेक अर्थाने विशेष आहे कारण या अधिवेशनापासून पुढे उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांची अनुपस्थिती जाणवेल. अजित पवार यांना अपेक्षित असलेले सर्व मुद्दे आणि अपेक्षांचा अर्थसंकल्पात समावेश असेल असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. अलीकडेच राज्याला केंद्रीय अर्थसंकल्पात २०० कोटी रुपये मिळाले, तर कर चलनाद्वारे राज्याला ९८३०६ कोटी रुपयांची तरतूद प्राप्त झाली. याचा राज्याला मोठा फायदा होणार आहे. या अधिवेशनाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे अद्याप विरोधी पक्षनेत्यांची नियुक्तीच झालेली नाही. या मुद्द्यावर राजकारण केले जात आहे आणि उबाठा आणि शप वगैरे राजकारण करत आहेत. यंदाच्या अधिवेशनात १५ विधेयके मांडली जाणार आहेत. अजित पवार यांनीच अर्थसंकल्पाची मांडणी केली होती. त्यामुळे त्यांच्या कल्पना आणि मुद्दे यांना अर्थसंकल्पात स्थान असेल हे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. सध्या महाराष्ट्र विधानसभेत कोणत्याही एका पक्षाला १० टक्के जागांचा आकडा न गाठता आल्यामुळे विरोधी नेतेपद रिक्त आहे. अर्थात हा निर्णय विधानसभा सभापती घेऊ शकतात आणि विरोधी नेत्याची निवड करू शकतात. राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात राज्याच्या आर्थिक प्रगतीचा लेखाजोखा मांडतानाच राज्य सरकार विकसित महाराष्ट्र घडवण्यासाठी कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले. ही घोषणा राज्याची आशावादी आणि कणखर नेतृत्वाची साक्ष देते. राज्यपालांच्या अभिभाषणात महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्नाचा आवर्जून उल्लेख केला गेला. राज्यपाल म्हणाले, की सरकार सीमावासीयांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. हा सीमावासीयांना दिलासा आहे. सीमावादावरून उबाठा पक्ष नेहमीच भाजपला लक्ष्य करण्याचा प्रयत्न करतो. त्याला राज्यपालांचे विधान हे चपखल उत्तर आहे. राज्यपालांच्या अभिभाषणात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा होता तो समृद्धी महामार्गाचा. या महामार्गाचा विस्तार आता वाढवणपर्यंत केला जाणार आहे, ही राज्यपालांची घोषणा अत्यंत आश्वासक आहे. कारण वाढवण बंदर हे भारताचे सर्वात मोठे डीप ड्राफ्ट कंटेनर बंदर आहे आणि ज्याच्यामुळे राज्याच्या औद्योगिक क्षमतेत प्रचंड वाढ होणार आहे. या बंदरापर्यंत समृद्धी महामार्ग जाणे ही व्यावसायिकांना आणि व्यापाऱ्यांना फार मोठी संधी आहे. गडचिरोलीला स्टील हब म्हणजे पोलाद हब बनवणार ही राज्य सरकारची घोषणा खूप महत्त्वाची आहे. कारण गडचिरोलीत व्यापक उच्च दर्जाच्या लोखंडी ओरचा साठा म्हणजे लोखंडी खनिजाचा साठा सापडतो आणि त्यामुळे हा प्रकल्प जेएसडब्ल्यू स्टील राबवत आहे. स्टील हबमुळे राज्याच्या औद्योगिक वाढीला चालना मिळणार असून त्यातून रोजगार निर्माण होणार आहे. कारण हे क्षेत्र ५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवण्यासाठी प्रमुख आहे. राज्यपालांनी आपल्या भाषणात महाराष्ट्राच्या विकासाचा रोडमॅप मांडला. परदेशी गुंतवणूक आणण्यात राज्य नंबर वन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यासाठी त्यांनी आकडेवारी सादर केली. विदर्भाच्या विकासासाठी पावले उचलण्यात येत असल्याचे त्यानी सांगितले. कनेक्टिव्हिटी वाढवण बंदरापर्यंत समृद्धी महामार्ग विस्तारित करण्यात येणार असल्याने त्यामुळे कनेक्टिव्हिटी अधिक सक्षम होईल असे राज्यपाल म्हणाले. सरकारने शेतकऱ्यांकडे पुरेसे लक्ष दिले आहे आणि त्यासाठी कृषी उत्पादकता वाढवण्यासाठी आणि पीक नियोजन अचूक करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान वापरण्याचे धोरण आखण्यात आले आहे, असे राज्यपालांनी सांगितले. हा निर्णय म्हणजे शेतकऱ्यांसाठी त्यांच्या प्रश्नांवर अचूक वार करण्यासाठी नेमका आहे आणि याचा लाभ महाराष्ट्रातील लाखो शेतकऱ्यांना होईल अशी आशा व्यक्त करण्यात आली आहे. राज्याच्या १४७ सुधार योजनांना मंजुरी देण्यात आली आहे आणि हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र जन अभियान सुरू करण्यात आले आहे. या अंतर्गत १० कोटी वृक्ष लावण्याचे सरकारने ठरवले आहे. या अभिभाषणातून प्रमुख निष्कर्ष असे आहेत, की महाराष्ट्र हे विक्रमी गुंतवणूक असलेले एकमेव राज्य आहे. दावोसला महाराष्ट्रासोबत अन्य राज्यांचे मुख्यमंत्रीही होते, ज्यात तामिळनाडू आणि मध्य प्रदेश हे होते. पण बाजी मारली ती मुख्यमंत्री फडणवीस यांनी आणि महाराष्ट्राच्या प्रगतीचे हे चिन्ह आहे. दुसरे म्हणजे समृद्धी महामार्ग वाढवण बंदरापर्यंत वाढवण्याचे धोरण आखून तसेच विदर्भातील पायाभूत सुविधांच्या विकासावर राज्याने विशेष भर दिला आहे. पूर्वी मुंबई-पुणे आणि पश्चिम महाराष्ट्र यापुरताच महाराष्ट्र पाहिला जात होता. त्यामुळे विकासाचा अनुशेष निर्माण झाला होता. आता तसा तो राहिलेला नाही. समृद्धी असो की वाढवण बंदर असो. विकासाची फळे सर्वत्र चाखायला मिळत आहेत आणि हीच वाव महाराष्ट्राच्या विकासाला पुढे नेणारी आहे. अर्थात राज्य सरकारने महिलांकडे दुर्लक्ष केले नाही आणि राज्यपालांनी जाहीर केले, की महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी लखपती दीदी यासारख्या योजना आणि त्यातून रोजगाराच्या संधी निर्माण होतील. त्यावर भर देण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न राहील. राज्य आर्थिक मजबूत स्थितीत असल्याचे दाखवते कारण देशाच्या जीडीपीत राज्याचा वाटा १३ टक्के आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादावर सरकारने मोठी तयारी केली आहे, हेही त्यातून अधोरेखित झाले. एकूण हे अभिभाषण म्हणजे आशावादाचे प्रतिबिंब होते. याशिवाय राज्य सरकारने बांबू धोरण गेमिंग आणि रिअलिटी धोरण तयार करत आहे. महिला स्वयंसहाय्यता गटांची स्थापना आणि त्याद्वारे महिलांची उन्नती, किल्ले पर्यटनाला चालना देण्यासाठी वारसा यादीत समाविष्ट केलेल्या किल्ल्यांच्या परिसरात माहिती व सुविधा केंद्रे स्थापन करण्याच्या सुविधा या महत्त्वाच्या आहेत.

# परदेशी शिष्यवृत्ती योजना : आशेचा किरण नव्हे निराशेचे कारण!




**कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध असतानाही केवळ नियोजनाच्या अभावामुळे पात्र विद्यार्थी परदेशात जाऊ शकत नाहीत. एक संपूर्ण शैक्षणिक वर्ष वाया जाते. ही केवळ एखाद्या विद्यार्थ्याची वैयक्तिक हानी नाही, तर राज्याच्या परदेशी शिष्यवृत्ती योजनेचे हे विदारक चित्र आहे. तरीही प्रशासनाला याचे गांभीर्य वाटत नाही, कारण याबाबत जाब विचारणारी सक्षम व्यवस्था उभीच नाही.**

राज्य शासनाची परदेशी गुणवंत शिष्यवृत्ती योजना ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल पण गुणवंत विद्यार्थ्यांसाठी आहे. परदेशात उच्च शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांनी ज्ञान, कौशल्य आणि अनुभव मिळवावा, हा या योजनेमागचा उद्देश आहे. मात्र उच्च व तंत्र शिक्षण विभाग चालवत असलेल्या या योजनेची सध्याची परिस्थिती पाहता, ही योजना विद्यार्थ्यांसाठी आशेऐवजी निराशेचे कारण ठरत आहे. नुकतीच या परदेशी शिष्यवृत्तीची अंतिम निवड यादी जाहीर करण्यात आली. एकूण ४० जागा असताना प्रत्यक्षात केवळ २४ विद्यार्थ्यांची यादी प्रसिद्ध झाली. विशेष म्हणजे, संपूर्ण राज्यातून फक्त ८२ अर्ज आले. हे आकडे अत्यंत गंभीर आहेत. कारण इतक्या मोठ्या राज्यात, इतक्या महत्त्वाच्या योजनेसाठी अर्जच येत नसतील, तर ही बाब केवळ विद्यार्थ्यांची चूक नाही, तर प्रशासनाच्या अपयशाचे स्पष्ट लक्षण आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे, २०२५ हे शैक्षणिक वर्ष संपत आले असताना ही यादी जाहीर झाली. अशा वेळी निवड झालेले विद्यार्थी या शैक्षणिक वर्षात परदेशात जाऊच शकत नाहीत. म्हणजेच त्यांचे एक संपूर्ण वर्ष वाया जाते. दुर्दैवाने, हा पहिलाच प्रकार नाही. दरवर्षी या विभागाकडून हाच अनुभव विद्यार्थ्यांना येतो.

दरवर्षी जाहिरात उशिरा काढली जाते, निवड प्रक्रिया मुद्दाम लांबवली जाते, वरिष्ठ पातळीवरील बैठका वेळेवर होत नाहीत आणि बजेटचे नियोजनही वेळेत पूर्ण होत नाही. या सर्व ढिसाळ कारभाराचा थेट फटका विद्यार्थ्यांना बसतो.

इतर विभागांशी तुलना केली, तर हे अपयश अधिक ठळकपणे दिसते. समाजकल्याण विभाग, बहुजन कल्याण विभाग यांसारख्या विभागांतील विद्यार्थ्यांचे परदेशातील शिक्षण सुरू होऊन सहा महिने उलटलेले असतात. तर दुसरीकडे उच्च व तंत्र शिक्षण विभागातील विद्यार्थी अजूनही अंतिम यादीच्या प्रतीक्षेत असतात. परिणामी, चालू शैक्षणिक वर्षात परदेशात जाणे अशक्य ठरते आणि विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होते.

शासनाने सर्व परदेशी शिष्यवृत्ती योजनांसाठी समान आणि सर्वसमावेशक धोरण जाहीर केले आहे. मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारी यंत्रणाच या प्रक्रियेकडे दुर्लक्ष करताना दिसते. कुठेही ठोस कालमर्यादा नाही, उत्तरदायित्व निश्चित नाही आणि दंडात्मक तरतुदीही नाहीत. त्यामुळे प्रशासनावर कोणताही दबाव राहत नाही आणि नुकसान मात्र विद्यार्थ्यांचेच होते. शैक्षणिक, आर्थिक आणि मानसिक. ही योजना महाविद्यालय व विद्यापीठ पातळीवर पोहोचतच नाही. ना योग्य प्रसिद्धी केली जाते, ना मार्गदर्शन शिबिरे घेतली जातात, ना विद्यार्थ्यांना समुपदेशन दिले जाते. परिणामी, वर्षानुवर्षे मोजक्याच विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळतो.

२०१८-१९ पासून ही योजना सुरू झाली. सुरुवातीला दरवर्षी १० विद्यार्थी परदेशात पाठवले जात होते. आता ही संख्या कागदावर ४० करण्यात आली आहे. पण प्रत्यक्षात परदेशात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढताना दिसत नाही. कारण अर्ज येत नाहीत. आणि अर्ज येत नाहीत कारण विद्यार्थ्यांचा या प्रक्रियेवर विश्वास राहिलेला नाही, तसेच काहीही वेळेवर होत नाही.

याउलट समाजकल्याण, बहुजन कल्याण आणि सारथी या विभागांच्या परदेशी शिष्यवृत्ती योजनांना मोठ्या प्रमाणावर अर्ज येतात. विद्यार्थ्यांचे प्रवेश वेळेत होतात, ते चालू शैक्षणिक वर्षातच परदेशात जातात आणि शिष्यवृत्तीचा प्रत्यक्ष लाभ त्यांना मिळतो. हा फरक केवळ निधीचा नाही, तर नियोजन, कालबद्धता आणि उत्तरदायित्वाचा आहे.

कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध असतानाही केवळ नियोजनाच्या अभावामुळे पात्र विद्यार्थी परदेशात जाऊ शकत नाहीत. एक संपूर्ण शैक्षणिक वर्ष वाया जाते. ही केवळ एखाद्या विद्यार्थ्याची वैयक्तिक हानी नाही, तर राज्याच्या परदेशी शिष्यवृत्ती योजनेचे हे विदारक चित्र आहे. तरीही प्रशासनाला याचे गांभीर्य वाटत नाही, कारण याबाबत जाब विचारणारी सक्षम व्यवस्था उभीच नाही.

जोपर्यंत या योजनेत कालबद्धता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व आणले जात नाही, तोपर्यंत उच्च व तंत्र शिक्षण विभागाची परदेशी शिष्यवृत्ती योजना ही संधी देणारी नव्हे, तर संधी हिरावून घेणारी योजना ठरत राहील. गुणवंत विद्यार्थ्यांना जागतिक व्यासपीठावर नेण्याऐवजी त्यांना प्रतीक्षेच्या फेऱ्यात अडकवणारी ही व्यवस्था तातडीने बदलण्याची गरज आहे.

**ॲड. कुलदीप आंबेकर**

# हिंदूंच्या सणासुदीला वस्तुंच्या किंमती का वाढतात?

सणासुदीचे दिवस म्हटले की, काही विशिष्ट वस्तुंना बाजारात ग्राहकांची प्रचंड मागणी असते आणि याच गोष्टीचा फायदा घेवून ग्राहकांची प्रचंड प्रमाणात लूट केली जाते. प्रत्येक गोष्टींचे भाव, अव्वाच्च्या सव्वा वाढवून विकल्या जातात. सर्वात खेदाची बाब म्हणजे हिंदू धर्मीयांचे सण-उत्सव जेव्हा असतात तेव्हा तर प्रत्येक वस्तुंचे भाव गगनाला भिडतात.ज्या प्रमाणे मोगल सुलतान शाहित 'जिझीया' कर सारखे वेगवेगळे कर लावून हिंदूंची लूट केली जायची. त्याचप्रमाणे आज सुद्धा स्वतंत्र भारतात हिंदूची लुट होत आहे. महाराष्ट्रात असो वा भारत अशावेळी वस्तुचे दर वाढविले जातात. यामुळे हा भारत हिंदूचा आहे की नाही, याची शंका येते.

एका विशिष्ट धर्मीयांच्या उपवासाच्या महीन्यात फळांना व सुक्या मेव्याला प्रचंड मागणी असते.उन्हाळ्यासारख्या दिवसातही जर त्यांचा सण आला, तेव्हा उत्पादन कमी असुनही अगदी स्वस्त दरात त्यांना फळे उपलब्ध होतात. साधे उदाहरण पाहिल्यास केळी विस ते तिस रुपये डझनानी-मिळतात तर हिंदूच्या सण-उत्सवावेळी हीच केळी पन्नास ते साठ रुपये डझन विकली जातात.

सध्याचे ताजे उदाहरण. नुकतीच महाशिवरात्री उत्सव पार पडला. महिन्याभरापूर्वी शेगदाण्याचे भाव १२० ते १४० रु. किलो होते. शिवरात्रीच्या चार दिवस आधी त्याच दाण्याचे भाव २०० रुपये किलो झाले. आणि एकदिवस आधी शेंगदाण्याचे भाव २०० ते २३० रुपये किलो झाले. उपवासासंबंधीत इतर साहित्य जसे साबुदाना, भगर, तेल, विविध फळे इत्यादी वस्तुचेही भाव कडाडले. असे कसे काय? वस्तूंचे भाव किलोमागे दहा-बारा दिवसात ६० ते ७० रुपयांनी वाढतात.

या सर्व गोष्टीला जबाबदार कोण? उत्पादक, व्यापारी, किरकोळ दुकानदार की, राज्यकर्ते ? महाराष्ट्रातच नव्हे तर भारततही हिंदूना राज्यकर्त्यांच्या लेखी काडीचीही किंमत नाही. राज्यकर्त्यांना देणे-घेणे नाही. अशा वेळी सर्वसामान्य जनतेचे काय हाल होत असेल, त्यांनी सण-उत्सव कसे साजरे करायचे हा प्रश्न आहे.याप्रसंगी सत्ताधारी व राजकारणी झोपले आहेत का? असा सवाल निर्माण होतो. केवळ निवडणुका लढणे, जिंकणे एवढेच ध्येय असून राजकीय पक्षांनी आपला सरपंच बनवा, जिल्हा परिषदा मिळवा, महापौर करा, मंत्रीपद मिळवा, आमदार-खासदारीचे गणित जुळवा, हा पक्ष फोडा तो पक्ष फोडा आणि कुठल्याही परिस्थीतीत सत्ता मिळवा, बस येवढेच ध्येय आहे का? राजकारणी लोक सत्तेत येण्यापूर्वी अनावश्यक असे आश्वासने देतात. विनाकामाच्या घोषणा करतात. ऐतखाऊ लोकांची फळी निर्माण करतात. आणि एकदा सत्तेत आले कि, त्यांना सर्व-सामान्य जनतेचा अन् गरिबांचा विसर पडतो.

असो,या विषयाच्या निमित्तान एकच प्रश्न आहे कि, हिंदूंच्या सणासुदीलाच वस्तुंचे भाव का वाढतात, याला दोषी कोण ? व्यापारी, कारखानदार की दुकानदार.एखाद्या विशिष्ट सणाच्या वेळी काही वस्तुंची मागणी वाढते, हे सत्य असले तरी त्या वस्तू अचानक निर्माण कराव्या लागत नाही. त्याच उत्पादनही त्या विशिष्ट काळात मुबलक प्रमाणात होते. आणि महत्वाचे म्हणजे हिंदूचे सण आणि उत्सव मुळात निसर्ग चक्रावर आधारीत आहे. असे मकरसंक्रांत किंवा तिळ संक्रांत हा सण त्याचवेळी येतो ज्यावेळी शेतात तिळाचे प्रचंड उत्पादन होते.

व्यापाऱ्यांकडे त्या-त्या वेळी त्या वस्तुंचा अतिरीक्त साठाही असतो. मग भाव वाढविण्याचे कारण काय? शासन यंत्रणेचे यावर नियंत्रण का नाही? शासनाचे लोक या कारखानदारांना आणि व्यापा-यांना बांधलेले आहेत. या सर्वांचे उत्तर नाही असेल तर राज्यकर्त्यांनी केवळ सत्ता मिळविण्यात, खुर्च्या झिजविण्यात, सामान्य जनतेच्या पैशावर मौज करण्यात धन्यता मानावी. तसेच शासनाच्या सर्व सुखसोई उपभोगाव्या आणि आपल्या सात पिढयांच भले होईल एवढी कमाई करून ठेवावी. एवढाच उद्देश आहे का? या सर्व गोष्टीवर आतातरी राज्यकर्ते लक्ष देतील? सणासुदीच्या दिवसात वाढणा-या महागाईवर नियंत्रण ठेवतील ही अपेक्षा, अन्यथा हिंदू आजही मोगलशाही व सुलतान शाहीतच 'जिझीया' कर भरून जगत आहे, असेच म्हणावे लागेल.

**प्रा. किशोर रा. बुरुंगे**

भाजीबाजार, अमरावती,
मो.८६००५८६८८७

## संवाद

### प्लास्टिक पिशव्यांवर बंदी आहे का ?

होळी आणि धुलीवंदनाच्या दिवशी रस्त्यांवर या पिशव्यांचा अक्षरशः खच पडलेला पाहायला मिळतो. याच पिशव्या हवेमुळे जवळच्या गटारांत आणि नाल्यांत जातात आणि पुढे जे व्हायचे तेच होते. दरवर्षी एवढ्या मोठ्या प्रमाणात या पिशव्या येतात कुठून हा प्रश्न त्यावेळी सर्वांनाच पडतो. प्लास्टिक पिशव्यांविरुद्धच्या मोहिमेअंतर्गत सरकारी कर्मचारी विक्रेत्यांवर कारवाई करतात; मात्र या कमी जाडीच्या पिशव्या ज्या ठिकाणी तयार केल्या जातात त्या कारखान्यांवर किंवा त्यांच्या घाऊक व्यापाऱ्यांवर सरकारी अधिकाऱ्यांकडून कारवाई केली गेल्याचे आजतागायत ऐकिवात नाही. राज्यात ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्यांवर कायद्याने बंदी घालण्यात आली. बंदी येताच सरकारच्या वतीने भरारी पथकांची नेमणूक करून प्लास्टिक पिशव्यांचे स्रोत असलेल्या किराणा मालाच्या, फळांच्या, भाज्यांच्या दुकानांवर धाडी टाकून ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्या मोठ्या प्रमाणात जप्त करण्यात आल्या आणि त्या देणाऱ्या विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली ज्यामधून सरकार दरबारी लाखोंचा महसूल गोळा झाला. सरकारच्या अन्य मोहिमांप्रमाणे ही मोहीमही काही दिवसांनी थंड पडली, पातळ पिशव्या पुन्हा बाजारांत भाजी, फळे, मासे विक्रत्यांकडे दिसू लागल्या. कालांतराने कोणीतरी न्यायालयात याचिका दाखल करून, सरकार दरबारी निवेदने देऊन किंवा विरोधी पक्षाच्या निदर्शनास आणून देऊन राज्यात प्लास्टिक पिशव्यांवरील बंदीचे कसे तीनतेरा वाजले आहेत ही बाब निदर्शनास आणून देते आणि पुन्हा एकदा सरकार खडबडून जागे होते. पुन्हा नव्याने कारवाईला सुरुवात होते. २००५ सालापासून आजतागायत प्लास्टिक पिशव्यांसह समस्त प्लास्टिक वस्तूंवर ६-७ वेळा बंदीची मोहीम उघडण्यात आली असून सहाही वेळा ही मोहीम काही कालावधी चालल्यानंतर पुन्हा बंद पडली आहे.

**जगन घाणेकर**

### राज्याच्या सभागृहांत विरोधी पक्षनेत्यांची नेमणूक नाही?

राज्याच्या विधानसभेपाठोपाठ विधानपरिषदेतही विरोधी पक्षनेतेपद नसल्याने राज्याची दोन्ही सभागृहांतील अर्थसंकल्पीय अधिवेशनातील कामकाज विरोधी पक्षनेत्यांशिवाय पार पाडली जातील हा अपेक्षित अंदाज आहे. सर्वसाधारणपणे पहिल्या अधिवेशनात विरोधी पक्षनेत्यांची निवड होते, परंतु, विधानसभा सदस्यांची संख्या ही विधानसभा सदस्यांच्या एकूण सदस्यांच्या १० टक्के नसल्याचे कारण सांगत विधानसभा अध्यक्षांनी विरोधी पक्षनेतेपदाचा निर्णय प्रलंबित ठेवला आहे. मागील सभागृहातील अधिवेशनात विरोधी पक्षनेत्याची निवड ही विधानसभा अध्यक्ष आणि विधानपरिषदेच्या अध्यक्षांच्या अखत्यारीत असल्याचे सांगण्यात आले तर विधानसभा अध्यक्षांनी याबाबत अभ्यास सुरू असल्याची घोषणा करत या पदाची निवड झालेली नाही. नव्याने निवड होऊ शकणाऱ्या अध्यक्षांच्या बाबतीत कार्यवाही करणारा निर्णय होऊ शकला नाही. निर्वाचित आमदारांचे राजीनाम्यांमुळे संख्याबळ घटले,कुठे सदस्यांची मुदत संपत आली असल्याचे समोर येताच विरोधी पक्षनेतेपदावर नवी निवड झाली नाही.

वास्तविक विरोधी पक्षनेते असोत किंवा निर्वाचित सदस्य असोत राज्याच्या जनतेचे प्रतिनिधित्व करणारे नेते यांची निवड राज्याच्या सभागृहांत होणे गरजेचे आहे. कारण विरोधी पक्षनेतेसुद्धा जनतेने निवडून दिलेले असतात, त्यांचे प्रश्न राज्याच्या सभागृहांत मांडले जाऊन त्यांवर जनतेला उत्तरे मिळणे अपेक्षित असते. विरोधी पक्षियांच्या मतांना सभागृहात उत्तरे न मिळणे किंवा त्यांचे प्रश्न अनुत्तरीत राहणे हे त्या विधानसभा विभागाचा हक्कांचा भंग होण्यासारखे आहे. शिवाय संपूर्ण विधीमंडळ काही ठराविक मतदारसंघाच्या मतदारांच्या बळावर निर्णय घेते असा निष्कर्ष काढला जाऊ शकतो. या सर्वांची जबाबदारी विधानसभा, विधानपरिषदेच्या अध्यक्ष यांनी संयुक्तपणे घेतांना कोठल्याही जनतेच्या विभागावर अन्याय होऊ होणार नाही याची काळजी घेतली जाणे आवश्यक असते. अशा प्रश्नांवर दोन्ही सभागृहांतील जबाबदार पदाधिकाऱ्यांनी राज्यातील जनतेचा विश्वास प्राप्त करून घेणे आवश्यक असते हे लक्षात घेतले पाहिजे.

**स्नेहा राज**

### मणिपुरी चित्रपट 'बूंग' ला प्रतिष्ठेचा 'बाफ्टा' पुरस्कार!

मणिपुरी भाषेतील 'बूंग' या चित्रपटाने ७९ व्या 'ब्रिटिश अकॅडेमी ऑफ फिल्म अँड टेलिव्हिजन आर्टस् फिल्म अवॉर्ड्स' ('बाफ्टा') २०२६ मध्ये 'बेस्ट चिल्ड्रेन'स अँड फॅमिली फिल्म' हा पुरस्कार जिंकला आहे. या चित्रपटाची लेखिका लक्ष्मीप्रिया देवी यांनी दिग्दर्शित केलेला आणि या श्रेणीत 'बाफ्टा' पुरस्कार जिंकणारा हा पहिलाच भारतीय चित्रपट ठरला आहे. या चित्रपटाची कथा 'बूंग' नावाच्या एका ९-१० वर्षांच्या शाळकरी मणिपुरी मुलाभोवती फिरते. नोकरीसाठी शहरात गेलेले त्याचे वडील हरवल्यानंतर बूंग आणि त्याची आई त्यांचा शोध घेण्यासाठी वणवण फिरतात. मणिपूरच्या सामाजिक आणि राजकीय ताण तणावाच्या पार्श्वभूमीवरची त्यांच्या या प्रवासाची ही भावनिक कथा प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेते. पूर्वोत्तर भारताच्या मणिपुरी भाषेतील कथेला जागतिक स्तरावर सन्मान मिळवून देणाऱ्या 'बूंग'च्या या यशामुळे देशभरातून या चित्रपटावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

**-प्रदीप मोरे**

### 'आदि मी, अनंत मी '

नुकतीच स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची पुण्यतिथी झाली . १९ तारखेला आपण शिवजयंती साजरी केली.. स्वातंत्र्यवीर सावरकर,छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, स्वामी विवेकानंद या व्यक्ती नव्हत्या तर विचार होता. राष्ट्र, धर्महित, संस्कृती, सभ्यता, परंपरा जपणारा विचार म्हणूनच तो नष्ट झाला नाही. काही वर्षापासून हा विचार दाबण्याचा, नष्ट करण्याचा तऱ्हेने प्रयत्न झाला. साम, दाम, दंड, भेद याचा उपयोग करून, तर कधी खोट्या कथानकाचा आधार घेत, कधी खोटे पुरावे दाखवून, कधी प्रेमासारख्या पवित्र भावनेला अपवित्र करून येन केन प्रकरणेन हे विचार नष्ट करण्याचा प्रयत्न झाला. हे विचार, नुसते विचार नव्हते तर आत्मतेज्याने झळकणारे धकधकते निखारे होते. काही काळासाठी ह्या सात्विक, पवित्र विचारांवर रजतम कणांचे म्हणजेच पापी, धर्मांध लोकांच्या विचाराचे धुलीकरण जमा झाले आहे. राष्ट्र, धर्मप्रेमी यांनी हळुवार फुंकर घातली आणि त्यावरील धुळीकण दूर होऊ लागले. लोकांच्या मनात या पवित्र विचारांचे स्फुल्लिंग फुलवण्याचे काम गोवा आणि नवी दिल्ली येथे झालेल्या सनातन राष्ट्र संखनाद या महोत्सवाने आणि धर्मप्रेमी, राष्ट्रप्रेमी यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नमुळे झाले आहे. हे स्फुल्लिंग असेच धगधगते ठेवण्याच्या दृष्टीने मुंबई येथे मे महिन्यात शंखनाद रामराज्याचा होणार आहे. सर्वांमध्ये असलेली ईश्वरी चेतना जागृत होऊ लागली आहे. समाजाची धारणा, राष्ट्राचे स्थैर्य आणि स्वातंत्र्य हे केवळ राजसत्तेवर अवलंबून नाही तर संस्कारावर अवलंबून आहे.संस्कार विस्कळीत अथवा नाहीसे झाले तर समाज भरकट जातो हे आजच्या परिस्थितीवरून लक्षात येते. संस्कृती अभंगता हे आपल्या देशाचे बळ आहे, सामर्थ्य आहे. ही अभंगता भंग करण्याचा प्रयत्न जो चालला आहे त्याला आता थांबवण्याची प्रत्येकाची जबाबदारी आहे.

**लीना गाडगीळ**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सखय

# जिल्हा परिषद यवतमाळ शिक्षण विभागाचा आदेश!

## 295 दिव्यांग शिक्षकांना 26 फेब्रुवारीला सुनावणीस हजर राहण्याचे निर्देश

**विवेक वानखडे (जि.प्र.)**



यवतमाळ - जिल्हा परिषद, यवतमाळ अंतर्गत प्राथमिक शिक्षण विभागाने दिव्यांग आरक्षणांतर्गत नियुक्त, पदोन्नत व विविध शासकीय सवलतींचा लाभ घेणाऱ्या शिक्षक संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची पडताळणी सुरू केली असून २९५ दिव्यांग शिक्षक व संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांना २६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समक्ष सुनावणीस उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या स्वाक्षरीने काढण्यात आलेल्या पत्रानुसार, महाराष्ट्र शासनाच्या दिव्यांग कल्याण विभागाच्या ९ ऑक्टोबर २०२५ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने दिव्यांग प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र (UDID) सादर केले आहे की नाही. तसेच दिव्यांगत्वाची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आली आहे की नाही याची तपासणी करण्यात येत आहे. पडताळणीत काही प्रकरणांमध्ये शासन निर्णयातील तरतुदीनुसार 'लक्षणीय दिव्यांगत्व' बाबत प्रत्यक्ष पाहणी आवश्यक असल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित सर्व दिव्यांग शिक्षक व कर्मचाऱ्यांना आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहण्यास सांगण्यात आले आहे. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती स्तरावरून अधिनस्थ सर्व दिव्यांग शिक्षकांना दिव्यांग प्रमाणपत्र/UDID कार्डसह उपस्थित राहण्याबाबत सूचना देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सुनावणीच्या दिवशी कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी अनुपस्थित राहणार नाही याची दक्षता घेण्याचेही स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. सदर पत्रा सोबत २९५ दिव्यांग शिक्षक व संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांची यादी सहपत्र म्हणून जोडण्यात आली असून सर्व संबंधितांना वैयक्तिकरित्या कळविण्यात येत आहे.

या आदेशामुळे जिल्ह्यातील शिक्षण वर्तुळात खळबळ उडाली असून दिव्यांग आरक्षणाच्या अंमलबजावणीबाबत प्रशासन अधिक काटेकोर भूमिका घेत असल्याचे संकेत मिळत आहेत. पारदर्शकता आणि नियमबद्धतेच्या दृष्टीने ही कारवाई होत असल्याचे प्रशासनाचे मत असले तरी संबंधित शिक्षकांमध्ये संभ्रम आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. आता २६ फेब्रुवारीच्या सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागले असून प्रत्यक्ष पडताळणी नंतर पुढील प्रशासकीय निर्णय काय होणार याकडे शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

### दिव्यांग आरक्षणातील नियुक्त्या व पदोन्नतींची पडताळणी

जिल्हा परिषद यवतमाळ अंतर्गत प्राथमिक शिक्षण विभागाने दिव्यांग आरक्षणातून नियुक्त, पदोन्नत तसेच विविध शासकीय सवलतींचा लाभ घेतलेल्या शिक्षक संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्रांची सखोल पडताळणी सुरू केली आहे.सध्या ऑनलाइन अपंगत्व प्रमाणपत्रे ग्राह्य धरली जात असली तरी पूर्वी सादर करण्यात आलेल्या ऑफलाइन अपंगत्व प्रमाणपत्रांमध्ये अनियमितता किंवा घोळ असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः काही अधिकाऱ्यांनी पदोन्नतीसाठी ऑफलाइन प्रमाणपत्रांचा आधार घेतल्याची चर्चा सर्वत्र असून या प्रकरणाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. येत्या काळात पडताळणी दरम्यान कोणते गैरप्रकार समोर येतात, संबंधितांवर काय कारवाई होते आणि दिव्यांग आरक्षणाचा लाभ खऱ्या पात्रांना मिळतो का, याबाबत सामान्य नागरिकांमध्ये उत्सुकता आहे. प्रशासनाच्या या कारवाईमुळे संभाव्य गैरव्यवहार उघडकीस येणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# मुख्य सिग्नलवरच जीव धोक्यात!

## 'माऊली कन्स्ट्रक्शन' च्या टिपरने महावितरणच्या महिला कर्मचाऱ्यास चिरडले





**जनमाध्यम प्रतिनिधी**

### बंदी असतानाही जड वाहतुकीचा मोकाट सुळसुळाट

यवतमाळ - शहरात जड वाहतुकीस बंदी असतानाही ट्रक-टिपरांची बेधडक वर्दळ सुरूच असल्याचे धक्कादायक चित्र आज पुन्हा समोर आले. २४ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.४५ वाजताच्या सुमारास संविधान चौकात सिग्नलवर उभ्या असलेल्या महावितरण कार्यालयातील कनिष्ठ सहाय्यक मयुरी रुपेश पाटील (वय ३४) यांना 'माऊली कन्स्ट्रक्शन'च्या MH/29/BE-0505 क्रमांकाच्या टिपरने धडक देत दोन्ही पायांना गंभीर जखमी केले.

पोलीस स्टेशन, यवतमाळ शहर येथे दाखल गुन्हा क्र. 134/2026 नुसार, पाटील या MH/27-BR/8830 क्रमांकाच्या ॲक्टिवावरून कार्यालयाकडे जात होत्या. सिग्नल लाल असल्याने त्या चौकात थांबल्या असताना त्यांच्या शेजारी उभा असलेला टिपर सिग्नल सुरू होताच भरधाव व निष्काळजीपणे पुढे निघाला. जागेवरूनच वेगाने गाडी चालवत ॲक्टिवाला घासत नेत अपघात घडवून आणला. या धडकेत पाटील यांच्या दोन्ही पायांना गंभीर दुखापत झाली असून त्यांना तातडीने वसंतराव नाईक शासकीय रुग्णालयात दाखल करून पुढील उपचारासाठी रेफर करण्यात आले. त्यांच्या दुचाकीचे सुद्धा मोठे नुकसान झाले आहे. याप्रकरणी चालक छगन रामराव बुरड (रा. वारज, लाडखेड) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम 281, 125 तसेच मोटार वाहन कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र मूलभूत प्रश्न कायम आहे.शहरात जड वाहतुकीवर निर्बंध असताना अशा टिपर,व जड वाहनास मुख्य चौकात प्रवेश कसा दिला जातो? माऊली कंट्रक्शन कंपनीच्या मूळ मालकास सुद्धा या प्रकरणात तंबी देत गुन्ह्यात सहभागी करणे गरजेचे आहे. वाहतूक विभागाचे नियंत्रण नेमके कुठे आहे? सिग्नलवर नियम पाळत उभ्या असलेल्या महिलेलाच जर चिरडले जात असेल, तर सर्वसामान्य नागरिकांची सुरक्षितता कोण पाहणार? केवळ गुन्हा दाखल करून प्रशासन जबाबदारी झटकणार, की अवैध जड वाहतुकीवर कठोर कारवाई करणार, याकडे यवतमाळकरांचे लक्ष लागले आहे. मात्र अवैध वाहतुकीमुळे एका निष्पाप प महिलेला कायमचे अपंगत्व आणून कुटुंबातला मोठा आघात दिला असल्याची खंत यावेळी नागरी व्यक्त करीत आहे.



## अरुणोदय विद्यालयात संत गाडगेबाबा जयंती उत्साहात साजरी

दिग्रस - दिग्रसजवळच असलेल्या लाख रा. येथील अरुणोदय विद्यालयात संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. विद्यालयाचे मुख्याध्यापक सुधीर काळबोंडे यांनी आपल्या भाषणातून संत गाडगेबाबा यांच्या स्वच्छता, समाजसेवा आणि अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला. त्यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छता व सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थ्यांनी संत गाडगेबाबा यांच्या जीवनावर आधारित भाषणे, अभंग आणि गीत सादर करून कार्यक्रमात रंग भरला. तसेच शाळा परिसरात स्वच्छता अभियान राबवून "स्वच्छ शाळा, सुंदर शाळा" हा संदेश दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. प्रशांत गावंडे यांनी केले. यावेळी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# वेचक




## कला वाणिज्य महाविद्यालयात गाडगेबाबा जयंतीनिमित्त दशसूत्रीवर आधारित व्याख्यानाचे आयोजन

राळेगाव - स्थानिक कला वाणिज्य महाविद्यालय राळेगाव जिल्हा यवतमाळ येथे दिनांक 23 फेब्रुवारी 2026 रोजी संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त सांस्कृतिक विभाग व वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दशसूत्री वर आधारित व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. व्याख्यानाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. अजय पातालबंशी उपस्थित होते. तसेच व्याख्यानाला प्रमुख वक्ते म्हणून मराठी विभाग प्रमुख प्रा. अनिल दौलतकर उपस्थित होते. प्रथमतः पाहुण्यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या पावन स्मृतीस हार अर्पण व दीप प्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. पाहुण्यांच्या स्वागता नंतर व्याख्यानाचे प्रास्ताविक वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. रुपेश पवार यांनी केले. प्रास्ताविकामधून त्यांनी संत गाडगेबाबा यांच्या जीवनातील संघर्ष व अंधश्रद्धा मुक्त समाज कसा घडविला याबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. तसेच कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित प्रा. धीरज गोबरे यांनी गाडगेबाबा कीर्तनाच्या माध्यमातून लोकांना कशा पद्धतीने संदेश द्यायचे याबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व्याख्यानाचे प्रमुख वक्ते प्रा. अनिल दौलतकर यांनी विद्यार्थ्यांसमोर संत गाडगेबाबा यांचे संपूर्ण जीवनपट मांडले व गाडगेबाबा यांच्या आयुष्यातील प्रत्येक घडामोडींना त्यांनी त्यांच्या भाषणातून उजाळा दिला व विद्यार्थ्यांनी संत गाडगेबाबा यांच्या कार्यामधून प्रेरणा घ्यावी असे त्यांनी आवाहन केले.

## पांढरकवडा तालुक्यात 'रोहयो' विहिरींच्या कामात मोठा भ्रष्टाचार

पांढरकवडा - तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (रोहयो) अंतर्गत मंजूर झालेल्या सिंचन विहिरींच्या कामात मोठ्या प्रमाणावर अनियमितता व भ्रष्टाचार होत असल्याचा खळबळजनक आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) तर्फे करण्यात आला आहे. मनसेचे तालुकाध्यक्ष अश्विन ठाकरे यांनी जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पत्र देऊन सखोल चौकशीची मागणी केली आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात तालुक्यात एकूण १५६ सिंचन विहिरी मंजूर करण्यात आल्या आहेत. मात्र प्रत्यक्षात झालेल्या कामापेक्षा कागदोपत्री अधिक मोजमाप दाखवून देयके तयार केली जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. चुकीचे मोजमाप करून शासकीय निधीचा अपहार होत असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. या गैरव्यवहारात राजकीय ठेकेदार आणि काही प्रशासकीय अधिकाऱ्यांचे साटेलोटे असल्याचा आरोप मनसेने केला आहे. तालुक्यातील सुमारे ९५ टक्के विहिरींची कामे राजकीय ठेकेदारांमार्फत होत असून, संबंधित एपीओ व पीटीओ अधिकारी ठेकेदारांच्या दबावाखाली कार्यरत असल्याचे चित्र असल्याचे म्हटले आहे. जे शेतकरी स्वतः विहीर खोदण्यास इच्छुक आहेत, त्यांना तांत्रिक कारणे पुढे करून अडचणी निर्माण केल्या जात असल्याची तक्रारही करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, पांढरकवडा पंचायत समितीमध्ये यापूर्वीही रोहयो अंतर्गत सुमारे ५४ कोटी रुपयांच्या कथित भ्रष्टाचाराचा मुद्दा गाजला होता. त्या प्रकरणातील १७४ पैकी १३३ कामांची चौकशी अद्याप प्रलंबित असल्याचे सांगण्यात आले आहे. जुन्या प्रकरणात ठोस कारवाई न झाल्यामुळेच नव्या विहिरींच्या मोजमापात गैरप्रकार होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

## सात वर्षाच्या रिदा हुरैन हिने केले पहिला रोजा पुर्ण



उमरखेड़ - पवित्र रमजान महिन्याची सुरुवात मोठ्या भक्तीभावाने झाली असुन उमरखेड़ येथील शेख करीम यांच्या रिदा हुरैन या सात वर्षीय चिमुकलीने आपला पहिला रोजा पुर्ण केला आहे.
रमजान महिना मुस्लिम समाजासाठी अत्यंत पवित्र असुन या महिन्यात पहाटेपासून सूर्यास्तापर्यंत उपवास ठेवला जातो. नमाज पठण, कुराण वाचन, दानधर्म आणि गरजुची मदत याला विशेष महत्व असते. रिदा हुरैन हिने श्रद्धेने व उत्साहाने पहिला रोजा ठेवत कुटुंबीयासोबत नमाज अदा केली.तिच्या या धार्मिक भावना व चिकाटीचे परिसरात कौतुक होत आहे.

# खडका येथे किशोरवयीन आरोग्य दिवस साजरा

**जनमाध्यम प्रतिनिधी**



महागाव - २३-०२-२०२६ रोजी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान व प्राथमिक आरोग्य उपकेंद्र खडका अंतर्गत राजीव गांधी भवन येथे राष्ट्रीय किशोर स्वास्थ कार्यक्रम (RKSK) अंतर्गत किशोरवयीन आरोग्य दिवस (AHD) साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन मा.श्री. दत्तात्रय कदम सर (गट विकास अधिकारी, पंचायत समिती महागाव) यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष सौ कमलताई अरुणराव देशमुख (सरपंच ग्रामपंचायत कार्यालय खडका) तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. डॉ. ज्ञानेश्वर राठोड (वैद्यकीय अधिकारी, प्रा. आ. केंद्र पोहंडूळ), सौ वैशाली कागदे (समुपदेशक, ग्रामीण रुग्णालय सवना), श्री नागेश्वर खंदारे (आरोग्य सहाय्यक) श्री युवराज जाधव (आरोग्य सहाय्यक), श्री विजयराव देशमुख, श्री अरुणराव देशमुख, डॉ. राजेंद्र पुरोहित, श्री दत्तराव कदम उपसरपंच,डॉ. संदीप शिंदे,ग्रामपंचायत अधिकारी पृथ्वीराज गावंडे, यांनी दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली... सदर कार्यक्रमात संत गाडगेबाबा जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले त्याचबरोबर स्वराज्य संकल्पिका राजमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.मा. श्री दत्तात्रय कदम (गट विकास अधिकारी) व मा. डॉ ज्ञानेश्वर राठोड (वैद्यकीय अधिकारी) यांनी किशोरवयीन मुलींना आरोग्य, स्वच्छता तसेच पोषण आहार बाबत माहिती दिली... तसेच सौ वैशाली कागदे (आरोग्य समुपदेशक) यांनी किशोरवयीन मुलींना किशोरवयीन आरोग्य दिनाबाबत आरोग्य शिक्षण दिले सदर कार्यक्रमात किशोरवयीन मुलींसाठी पोषण आहार प्रदर्शनी ठेवण्यात आली होती.

# माणिकडोह ग्रामपंचायतने दिव्यांगांच्या हक्काच्या निधी केला हडप

## चार दिवस होऊन ही उपोषणची अद्याप दखल नाही!

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - तालुक्यातील माणिकडोह ग्रामपंचायतींमध्ये दिव्यांगासाठी पाच टक्के निधी राखीव असूनही तो खर्च तो निधी सन २०२१-२०२६ दिव्यांगनां वितरित केला जात नाही. या दिव्यांगाच्या निधीवर संबंधित ग्रामपंचायतचे सरपंच/सचिव यांनी हडप केल्याचा आरोप गावातील दिव्यागांने केला असून गेल्या दि.२० फेब्रुवारी पासून पुसद पंचायत समितीच्या आवारात उपोषण सुरू केले आहे. तरीही संबंधित पंचायत समितीचे गटविकास अधिकारी किंवा संबंधित ग्रामपंचायतीचे पदाधिकारी प्रशासकीय अधिकारी यांनी चार दिवस होऊन ही उपोषणाची दखल घेतली नाही.

त्यामुळे दिव्यांगणाच्या मागण्या तात्काळ मान्य केल्या नाही तर आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा दिला आहे. याबाबत प्राप्त माहिती अशी की, पुसद पंचायत समितीच्या आवारात माणिकडोह ग्रामपंचायतीच्या हद्दीतील दिव्यांग ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीच्या एकूण उत्पन्नातील ५ टक्के निधी गावातील दिव्यांगांवर खर्च करणे बंधनकारक असतांना सुद्धा या गावातील ग्रामपंचायतीच्या सरपंच- सचिवांनी सन २०२१ ते २०२६ दिव्यांगाच्या निधीवर डल्ला मारला असल्याचा खळबजनक आरोप केला आहे. आमच्या हक्काचा पाच टक्के निधी त्वरीत मिळावा, शासनाकडून अपंग व्यक्तीला घरकुल द्यावे आणि शबरी, पंतप्रधान आवास योजना, व रमाई घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना ग्रामपंचायतीकडे ज्या फाईल सन २०२१ ते २०२५ सादर केल्या आहेत. त्या संदर्भातील नमुना १० पावती व ९ नंबर ला खतावणी केल्याच्या प्रति लाभार्थ्यांना द्याव्या, व इतर अनेक योजनांचा लाभ दिव्यांगाना देन्यात यावा तसेच सन २०२३ ते २०२५ या आर्थिक वर्षात गृहकर व पाणी पुरवठा फंडातील झालेल्या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करावी, गृहकर व पाणीकर, या दोन्ही खात्याचे बँक स्टेटमेंट ची तपासणी करावी, आणि जि.प.शाळेत सर्व शिक्षा अभियान अंतर्गत बांधलेले शौचालय मधील शेपटी टँक चोरी गेल्याने त्याबाबत ही चौकशी करावी आणि घनकचरा व्यवस्थापनाचे काम व इस्टीमेट नुसार काम न केल्याने त्याबाबत संबंधित कंत्राटदार सरपंच व सचिवावर कारवाई करावी तसेच दिव्यागांचा २०२१ ते २०२५ पर्यंत मोठ्या प्रमाणात निधीचा प्रष्टाचार केल्यामुळे एकही लाभार्थी दिव्यांगास लाभ मिळाला नाही.

अशा विविध मुद्द्याची सखोल चौकशी करून सबंधित ग्रामपंचायतीचे सरपंच सचिव यांची सखोल चौकशी करून त्यांचेवर कायदेशिर कारवाई करण्यात यावी तसेच दिव्यांग व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी दिव्यांग हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, अपंग व्यक्तींना अपमानास्पद वागणूक देणाऱ्यावर कडक कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी माणिकडोह येथील दिव्यांग ग्रामस्थ त्यामध्ये पंडित नागोराव ढोले, दीक्षा प्रल्हाद वाघमारे, कोमल रामदास सरकटे, प्रियांका वसंत राठोड, अविनाश विठ्ठल लांडगे, पल्लवी नामदेव राठोड, सखुबाई भाऊराव शेळके, विलास वामन ढोले यांनी पंचायत समिती कार्यालयासमोर दि.२० फेब्रुवारी २०२६ पासून साखळी उपोषण सुरू केले आहे. उपोषणकर्त्यांच्या मागण्या संबंधित प्रशासनाने तात्काळ मंजूर करून संबंधितांवर कारवाई केली नाही तर पुढील काळात आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

# विचारांची शिवजयंती डीजेच्या गजरात नव्हे, तर शिवचरित्राच्या प्रकाशात आमणी बु. येथे प्रेरणादायी शिवव्याख्यान

**जनमाध्यम प्रतिनिधी**



महागाव - महाराष्ट्राच्या मातीत आजही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाचे प्रतिध्वनी दुमदुमत आहेत. शौर्य, स्वाभिमान आणि स्वराज्याच्या संकल्पनेचा अभंग स्वर जपणारी नवी पिढी घडावी, या उदात्त ध्येयाने आमणी बु. येथील शिवजन्मोत्सव समितीने यंदा शिवजयंती निमित्त एक आगळावेगळा आणि प्रेरणादायी उपक्रम हाती घेतला आहे.

डीजेच्या कर्णकर्कश गजरात नव्हे, तर शिवचरित्राच्या तेजस्वी विचारांत शिवजयंती साजरी व्हावी, या भूमिकेतून सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा २०२६ अंतर्गत विशेष शिवव्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सायं. ७.०० वा. प्रख्यात व्याख्यात्या भाग्यश्रीताई मोहीते पाटील यांचे प्रेरणादायी शिवव्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या व्याख्यानातून शिवरायांचे जीवनचरित्र, त्यांचा दूरदर्शी आणि लोकाभिमुख राज्यकारभार, स्वराज्याची भव्य संकल्पना, स्त्रीसन्मानाची भूमिका तसेच समाजप्रबोधनाचा व्यापक संदेश उलगडला जाणार आहे. विशेष म्हणजे जिजाबाई यांच्या संस्कारांची शिकवण आजच्या पिढीपर्यंत पोहोचविण्यावर भर दिला जाणार आहे. "नाचून नव्हे, वाचून साजरी व्हावी शिवजयंती" हा संदेश देत हा कार्यक्रम विचारांचा दीपोत्सव ठरणार आहे. लहान मुलांच्या मनात शिवरायांचा आदर्श दृढ व्हावा, युवकांनी शौर्यासोबत संयम, शिस्त आणि राष्ट्रनिष्ठा आत्मसात करावी, तसेच समाजात सकारात्मक प्रबोधन व्हावे, या हेतूने समितीने पुढाकार घेतला आहे. या कार्यक्रमास महागाव तहसीलचे तहसीलदार अभय मस्के, महागाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार धनराज निळे, महागाव तालुका सरपंच संघटनेचे अध्यक्ष अमोल चिकने, जगदीश नरवाडे जन आंदोलन संघर्ष समिती पंकज इंगळे यांची प्रमुख उपस्थिती समस्त गावकरी, नवतरुण युवक आणि महिलांची लक्षणीय उपस्थिती माहिती समितीच्या वतीने देण्यात आली. शिवजन्मोत्सव समिती, आमणी बु. (ता. महागाव) यांच्या वतीने सर्व शिवप्रेमींना मोठ्या संख्येने उपस्थित राहून विचारांची शिवजयंती साजरी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# २२ किमी मेटीखेडा राळेगाव मार्गावरील सिमेंट रस्त्याचे काम एक वर्षापासून संथ

**जनमाध्यम प्रतिनिधी**

राळेगाव - राळेगाव ते मेटीखेडा या सुमारे २२ किलोमीटर लांबीच्या दुपदरी सिमेंट रस्त्याच्या बांधकामाला तब्बल एक वर्षाचा कालावधी उलटूनही काम संथ गतीने सुरू असल्याने वाहनधारक व ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या या कामामुळे या मार्गावर वाहतूक कोंडी, अपघातांचा धोका आणि नागरिकांची गैरसोय वाढली आहे.

या मार्गावर चार ठिकाणी चार मोठ्या जिनिंग फॅक्टरी आहे. रोडला लागूनच आश्रम शाळा व आयटीआय आहे. सिमेंट रोडचे काम सुरू असून, विविध टप्प्यांवर रस्ता उकरून ठेवण्यात आला आहे. मात्र काम सुरू असलेल्या ठिकाणी आवश्यक त्या सुरक्षाव्यवस्थेचा अभाव असल्याचे स्पष्ट दिसून येते. सूचना फलक, वेगमर्यादा दर्शविणारे बोर्ड, रात्री परावर्तित होणारे रिफ्लेक्टर, सुरक्षा बॅरिकेड्स यांची कमतरता असल्याने विशेषतः रात्रीच्या वेळी वाहनचालकांना मार्ग ओळखणे कठीण होत आहे. पावसाळ्यात या रस्त्यावर चिखल आणि खड्ड्यांमुळे अनेक लहान-मोठे अपघात घडले आहेत. काही ठिकाणी रस्त्याच्या कडेला खोदकाम करून नाले तयार करण्यात आले असले तरी त्यावर कोणतीही सुरक्षितता उपाययोजना नसल्याने दुचाकीस्वार आणि पादचारी यांना मोठा धोका निर्माण झाला आहे. रात्रीच्या अंधारात रस्त्याच्या कडेला ठेवलेले प्लास्टिकचे ड्रम, मातीचे ढिगारे किंवा लोखंडी सळ्या स्पष्ट दिसत नसल्याने वाहनधारकांची दिशाभूल होत आहे. मार्गावरील डोंगर खड्डा, अंतरगाव, पिंपरी दुर्ग, मजरा, मेटीखेडा आदी गावांच्या जवळपास लहान-मोठी वस्ती असून शाळकरी मुले, शेतकरी आणि व्यापारी यांची रोजची ये-जा या रस्त्यावरूनच होते. दिवसरात्र सर्व प्रकारची वाहने – दुचाकी, चारचाकी, ट्रक, ट्रॅक्टर, शेतमाल वाहतूक करणारी वाहने – मोठ्या प्रमाणात धावत असतात. अशा परिस्थितीत कामाची संथ गती आणि सुरक्षेचा अभाव यामुळे नागरिकांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, काम सुरू करण्यापूर्वी एका बाजूने नाला व साइड ड्रेनेजचे काम करून नंतर त्या बाजूचा सिमेंट रस्ता तयार केला जातो. मात्र दुसऱ्या बाजूचे काम सुरू करताना पहिल्या बाजूची सुरक्षितता आणि वाहतूक व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष होत आहे. काही ठिकाणी अर्धवट काम सोडून यंत्रसामग्री बाजूला ठेवण्यात आली असून त्यामुळे वाहतुकीत अडथळे निर्माण होत आहेत. या प्रकल्पासाठी नियुक्त अभियंते आणि संबंधित अधिकारी यांनी नियमित पाहणी करून कामाची गती वाढविणे व सुरक्षाव्यवस्था काटेकोरपणे अंमलात आणणे गरजेचे आहे, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. दोन वर्षांचा कालावधी उलटूनही काम पूर्णत्वास न गेल्याने खर्चात वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच संथ गतीमुळे स्थानिक व्यावसायिक, शेतकरी आणि विद्यार्थ्यांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. वाहनचालकांनीही सावधगिरी बाळगावी, वेगमर्यादा पाळावी आणि बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी दक्षता घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे. मात्र केवळ नागरिकांवर जबाबदारी टाकून चालणार नाही; संबंधित यंत्रणांनी तातडीने प्रभावी उपाययोजना करून कामाला गती देणे आणि सुरक्षिततेचे सर्व नियम काटेकोरपणे पाळणे अत्यावश्यक आहे. दरम्यान, प्रशासनाने या कामाचा आढावा घेऊन ठरावीक कालमर्यादा जाहीर करावी व नियमित प्रगती अहवाल प्रसिद्ध करावा, अशी मागणीही जोर धरत आहे.

# अजामीनपात्र 'लव्ह जिहाद व अवैध धर्मांतर विरोधी कायदा' करण्यात यावा

## हिंदू जनजागृती समितीचे मुख्यमंत्री यांना निवेदन

**जनमाध्यम प्रतिनिधी**



बाभुळगाव - उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड राज्यांच्या धर्तीवर कठोर आणि अजामीनपात्र 'लव्ह जिहाद व अवैध धर्मांतर विरोधी कायदा' येत्या अधिवेशनात तात्काळ संमत करण्यात यावे या सबंधितचे निवेदन हिंदू जनजागृती समितीच्या वतीने दि. 23 ला तहसीलदार मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे.

गेल्या दिड -दोन चर्षापासून संपूर्ण महाराष्ट्रात 'लव्ह जिहाद' आणि 'अवैध धर्मावर या गभीर समस्या विरोधात सकल हिंदू समाज, हिंदु जनजागृती समिती आणि विविध महिला संघटनांनी एकत्रित येत प्रचंड जनआक्रोश मोर्चे काढले. या मोर्चामध्ये राज्यातील लाखो माता-भगिनी आणि हिंदू बांधव रस्त्यावर उतरले होते. त्यावेळी सरकारने या विषयाचे गांभीर्य ओळखून 'लया जिहाद' विरोधात कठोर कायदा करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, आजही दुर्दैवाने या घटना थांबलेल्या नाहीत, उलट त्यांची तीव्रता आणि क्रूरता वाढतच चालली आहे. कठोर कायदा कराः उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड राज्यांप्रमाणे गुन्हेगाराला जन्मठेप शिक्षा देणारा कठोर आणि अजामीनपात्र स्वरूपाचा 'लव्ह जिहाद व अवैध धर्मांतर विरोधी कायदा' महाराष्ट्रात तात्काळ लागू करावा.विशेष तपास पथकः प्रत्येक जिल्ह्यात पोलीस उपअधीक्षक (DySP) दर्जाच्या अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली 'लव्ह जिहाद विरोधी विशेष पथक' स्थापन करावे,अशा प्रकरणांचा निकाल ६ महिन्यांच्या आत लागावा, यासाठी जलदगती न्यायालये स्थापन करावीत. बेपत्ता मुलींचा शोधः महाराष्ट्रातून बेपत्ता असलेल्या १,७८,४०० महिला आणि मुलींचा शोध घेण्यासाठी 'विशेष मोहीम' (Special Drive) राबवावी आणि त्यातील 'लव्ह जिहाद'ची प्रकरणे वेगळी नोंद करावीत. पूर्वपरवानगी बंधनकारकः धर्मांतर किंवा आंतरधर्मीय विवाह करण्यापूर्वी किमान ६० दिवस आधी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करणे आणि पोलीस चौकशी होणे बंधनकारक करावे. अशा मागण्या असून उत्तर प्रदेश, उत्तराखंड, मध्य प्रदेश, गुजरात आणि हिमाचल प्रदेश या राज्यांनी आधीच कठोर कायदे केले आहेत, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये तर आता जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्राने यात मागे का राहावे ? असे निवेदनात म्हटले आहे.

# पुसद नगरपरिषद मधील आरोग्य विभाग व्हेंटिलेटरवर

## संपूर्ण शहरात व प्रभागात समस्याचा डोंगर!

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - नगरपरिषद मधील २०२१मध्ये लोकप्रतिनिधी नगरसेवकांचा कार्यकाळ संपल्यानंतर २०२५ पर्यंत ४ वर्ष प्रशासकीय राज होते. या कार्यकाळात आरोग्य विभागातील सफाई कर्मचारी यांनी कोणत्याही प्रकारचे प्रभागातील साफसफाई व अस्वच्छतेचे काम जबाबदारीने न केल्यामुळे आज संपूर्ण शहरातील असलेल्या १५ प्रभागातही समस्यांचा डोंगर उभा झालेला आहे त्यामुळे पुसद नगर परिषदेची आरोग्य यंत्रणा ही पूर्णपणे कोलमडली आहे.

यामुळे प्रभागातील नाल्यासफाई होत नाही अशी नागरिकांची ओरड सुरू आहे, नगरसेवक लोकप्रतिनिधीने सोशल मीडियावर ग्रुप तयार करून आपल्या कामाचे अपडेट नागरिकापर्यंत पोहोचण्यासाठी तयार केलेले आहे यावर अनेक ठिकाणाहून नागरिक आपल्या समस्या मांडत आहे परंतु अनेक दिवसापासून नागरिकांच्या समस्याचे ह्या निरंकार होत नाही. आरोग्य विभागातील सफाई कर्मचारी हे काही ठराविक सत्तेत असलेल्या नगरसेवकांच्या हाताचे कटपुतले झाल्यामुळे वारंवार त्यांच्याच प्रभागात सफाई कर्मचारी तसेच जेसीबीद्वारे साफसफाई व कामे करतांना नागरिकांची व नगरसेवकांची ओरड सुरू आहे. शहरातील दलित वस्ती असलेल्या तसेच दलितेत्तर वस्त्या यामध्ये महावीर नगर,संभाजी नगर, डॉ. आंबेडकर वार्ड, तुकाराम बापू वार्ड, मुखरे चौक ,नवल बाबा वार्ड, बालाजी वार्ड, सुभाष वार्ड,हे स्लम एरिया असल्यामुळे या ठिकाणी अनेक समस्या तोंड वर काढत असल्यामुळे येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. तसेच पुसद मधील प्रभागातील कचरा इंदिरानगर येथील डम्पिंगयार्ड मधील रोडवर टाकत असल्यामुळे या ठिकाणी दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. यामुळे परिसरात राहणाऱ्याचे आरोग्य धोक्यात आले आहे. डम्पिंग यार्डमध्ये वारंवार कचरा पेटवून देण्याच्या घटना घडत आहे. त्यामुळे पुसद-माहूर रोडवर ये-जा करणाऱ्या वाहनधारकांना नाहक त्रास होत आहे त्यामुळे या राज्य मार्गावर अपघाताची होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे, नगरपालिकेचे कर्मचारी डम्पिंग ग्राउंडच्या बाहेरच कचरा टाकून देत असल्यामुळे या गंभीर संपूर्ण समस्याकडे नगराध्यक्ष मॅडम यांनी लक्ष देऊन हलगर्जीपणा करणाऱ्या कर्मचाऱ्यावर कारवाई करावी अशी मागणी होत आहे, आरोग्य विभाग हा सफाई कामाचे कोणत्याही प्रकारे नियोजन करत नसल्यामुळे हा विभाग व्हेंटिलेटरवर असल्याचे सर्वसामान्य नागरिकांकडून बोलल्या जात आहे.

## संक्षिप्त

### राहुल उगले यांना आयएसएसएफ-बी प्रमाणपत्र

**अमरावती**- नुकताच दिल्ली येथे पार पडलेल्या प्रतिष्ठित प्रशिक्षण कार्यक्रमात श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ संचालित शूटिंग रेंजचे प्रशिक्षक राहुल उत्तमराव उगले यांनी आयएसएसएफ-बी पिस्तोल शूटिंग प्रशिक्षक पदविका, शैक्षणिक प्रमाणपत्र तसेच अधिकृत



शूटिंग प्रशिक्षक परवाना प्राप्त करून अमरावती विभागासाठी ऐतिहासिक कामगिरी नोंदवली आहे. अमरावती विभागातून आयएसएसएफ-बी पदविका संपादन करणारे राहुल उगले पहिलेच प्रशिक्षक ठरले असून, त्यांच्या या यशामुळे अमरावती शहर व जिल्ह्यात नेमबाजी क्षेत्रात अभिमानाची भावना व्यक्त होत आहे. या यशाबद्दल मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, कार्याध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके, कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, सचिव प्रा. रवींद्र खांडेकर, सचिव प्रा. विकास कोळेश्वर यांच्यासह मंडळाचे सर्व पदाधिकारी, प्राध्यापकांवर व क्रीडासह सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### धिरज रामपुरे भाजयुमोच्या जिल्हा सचिवपदी

**तिवसा**- तालुक्यातील जावरा फत्तेपुर येथील धीरज संजय रामपुरे यांची भारतीय जनता युवा मोर्चाच्या जिल्हा सचिव पदी निवड करण्यात आली. भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सचिन इंगळे यांनी ही निवड केली असून पक्ष संघटना वाढीस अधिक बळकटता व सहकार्य करणार, असा विश्वास व्यक्त करून ही नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन व्यक्त करण्यात येत आहे.




### जिल्हाधिकारी कार्यालयात संत गाडगेबाबा जयंती

**अमरावती**- जिल्हाधिकारी कार्यालयात आज संत गाडगेबाबा जयंती साजरी करण्यात आली. निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी अधिक्षक निलेख खटके यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनीही संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.



### सिपना अभियांत्रिकी महाविद्यालयात गाडगेबाबांना अभिवादन



**अमरावती**- सिपना अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये थोर समाजसुधारक, स्वच्छतेचे प्रणेते संत गाडगेबाबा यांची जयंती श्रद्धा व आदराने साजरी करण्यात आली. संत गाडगेबाबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले व 'स्वच्छतेतूनच सेवा' हा बाबांचा संदेश पोहचवण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष जगदीश गुप्ता व प्राचार्य डॉ. संजय खेरडे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. रासेयो अधिकारी डॉ. योगेश गुल्हाने, प्रा. अश्विनी घाटोळ, सर्व विभागप्रमुख तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यक्रमाला उपस्थितीत होते.

### डॉ .विशाल बाहेकर यांचे व्याख्यान



**अमरावती**- महाराष्ट्र होमिओ डॉक्टर्स असोसिएशन तर्फे हॉटेल रंगोली पर्ल, नवाथे येथे यूरोलॉजिस्ट डॉ .विशाल बाहेकर यांचे व्याख्यान घेण्यात आले. यावेळी मंचावर संघटनेच्या अध्यक्षा डॉ.स्वाती पडोळे, सि एम ई व्याख्याते डॉ.विशाल बाहेकर ,सचिव डॉ.नंदकिशोर भुतडा, डॉ .अशोक उमप, पूर्वाध्यक्ष फोरम अध्यक्ष डॉ .शशांक दुबे, लेडी विंग चेअरपर्सन डॉ.शितल आचार्य, प्रकल्प प्रमुख डॉ.विक्की पिंजाणी उपस्थित होते. सर्वप्रथम डॉ .सम्युअल हॅनिमन याच्या प्रतिमेला हारार्पण व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरवात करणात आली. डॉ. विक्की पिंजाणी यांनी प्रकल्प अहवाल सादर केला आणि सह प्रकल्प प्रमुख डॉ .स्नेहा पिंजाणी यांचे त्यांना सहकार्य लाभले. मंचावर उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुछ देऊनस्वागत केले. डॉ.विशाल बाहेकर व डॉ.स्वाती बाहेकर यांचे शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन स्वागत केले. यानंतर डॉ .स्वाती पडोळे यांचे अध्यक्षीय भाषण झाले. डॉ.विशाल बाहेकर यांनी यूरोलॉजि या विषयी अत्यंत सुंदर असे व्याख्यान प्रस्तूत केले. संघटनेत नवीन आलेल्या सदस्यांचे पुष्पगुछ देऊन स्वागत करण्यात आले. तसेच नुकताच आरोग्य सेवा सन्मान प्राप्त करणारे डॉ .अमित निंभोरकर आणि डॉ .प्रिया मोहोड यांना देखील संघटने तर्फे पुष्पगुछ देऊन सन्मानित करण्यात आले.

संचालन पूर्वाध्यक्ष डॉ.राजकुमार जैसवाल आणि डॉ. स्नेहल खेरडे यांनी केले. आभार प्रदर्शन संघटनेचे सचिन डॉ .नंदकिशोर भुतडा यांनी केले. या कार्यक्रमाला संघटनेचे सन्मानीय पूर्वाध्यक्ष, उपाध्यक्ष, तालुका प्रतिनिधी, सदस्य, महिला डॉक्टर्स मोठ्या संख्येत उपस्थित होते. या कार्यक्रमाची माहिती संघटनेच्या प्रसिद्धी प्रमुख डॉ . वैशाली टेंभे आणि सहप्रसिद्धी प्रमुख डॉ .प्रज्ञा घाटोळ यांनी माध्यमांना दिली.

# पट्टेधारकांचा २२ वर्षांपासून प्रलंबित प्रश्न मार्गी



## १८० पट्टे धारकांना मिळणार वारसाहक्काने पट्टे

### आ. प्रवीण तायडे यांच्या प्रयत्नाना यश

**चांदूरबाजार/वार्ताहर**
तालुक्यातील तळवेल येथे १८० घरकुल धारकांचा, मागिल २२ वर्षांपासून घरकुलाचा प्रश्न मार्गी लागत नव्हता. कुटुंब प्रमुखाचे नावे मिळालेल्या जागेच्या पट्ट्यावर, वासराचे नांव लागण्यास अनेक अडचणी येत होत्या. २००४ पासून तळवेल गावातील मृत जागा पट्टे धारकांचे १८० वारस, शासन व प्रशासनाचे उंबरठे झिजवित होते. तर तर लोकप्रतिनिधींचे दारी ही मुजरा करत होते. मात्र २२ वर्षे त्यांच्या प्रयत्नांना यश प्राप्त झाले नाही. अखेर आमदार प्रवीण तायडे यांनी तळलेले येथील, या १८० पट्टे धारकांचा प्रश्न अधिकार्यांशी चर्चा करून मार्गी लावला.

या बाबतचा सविस्तर वृतांत असा की, तळलेल्या १४० पट्टेधारकांनी आपली २२ वर्षा पासून ची कैफियत आ.तायडे यांचे कडे मांडली. त्याप्रमाणे आ.तायडे यांनी दिनांक २२ ला सकाळी, तळलेले येथे या सर्व पट्टेधारकांची एकत्रित सभा घेतली. यात सर्व पट्टेधारकांची म्हणणे ऐकून घेतले. या सर्व पट्टेधारकांना १९८६ सारी, इंदिरा गांधी आवास योजनेंतर्गत घरकुलाचे पट्टे मिळाले होते. हे सर्व पट्टे त्यावेळचे कुटुंब प्रमुखाचे नावे होते. कालांतराने कुटुंब प्रमुखांचा मृत्यू झाला. मात्र घरकुल पट्टे मृत व्यक्तीच्या नावे राहीले. या मृत व्यक्तीचे १४० वारसांनी , घरकुल पट्टे आपल्या नावे करण्यासाठी २००४ पासून ते २०२४ पर्यंत प्रयत्न केला. तहसिल कार्यालयापासून ते महसूल मंत्रालया पर्यंत २२ वर्षे संघर्ष केला. मात्र यश मिळाले नाही. अखेर २२ फेब्रुवारीला या अडचणींवर उपविभागीय अधिकारी अचलपूर, यांचे सोबत चर्चा करून सदर प्रकरणी सामंजस्या तोडगा काढला. महसूल मंत्र्यांचे नविन महसूल धोरणा नुसार, या १८० नागरिकांना लवकर वारसांचा पट्टा मिळणार आहे. हा पट्टा मिळताच हे सर्व लाभार्थी, नविन घरकुल योजनेस पात्र ठरतील.

तसेच याच गांवातील १३८ लोकांनी शंभर रूपयांचे स्टॅम्प पेपर वर, गावातील काही भूखंड खरेदी केले होते. परंतू सदर भूखंड त्यांचे नावे होत नव्हता. मागिल २८ वर्षांपासून त्यांचा ही भूखंड नावे होण्यासाठी संघर्ष सुरू होता.

मात्र यात त्यांनाही यश आले नाही. २२ फेब्रुवारीच्या बैठकीत या प्रश्नावर ही, महसूल यंत्रणेशी चर्चा करून आमदारांनी तोडगा काढला. यात महसूलच्या काही न्यायीक प्रक्रिया पार पाडून, या १३८ लोकांच्या शंभर रूपयांचे स्टॅम्प घेतलेल्या जागांचा मालकी हक्क मिळणार आहे. आमदार प्रवीण तायडे यांनी स्वतः पुढाकार घेऊन, आमच्या तक्रारीची दखल घैतली. तसेच आमचा वर्षानुवर्षे रखडलेला प्रश्न, तातडीने निकाली काढून आम्हाला दिलासा दिला. त्याबद्दल आमदारांचे गावातील बैठकीत आभार मानले.

## ज्यात दूध खरेदी संदर्भात समसमान धोरण आखणार-आ. सुलभा खोडके



### राज्य विधिमंडळाच्या प्रशोत्तराच्या तासामध्ये दूध उत्पादन खरेदी संदर्भात चर्चा

**अमरावती/का.प्र.**
आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत दूध व दुग्धजन्य पदार्थांच्या मागणीत मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्यामुळे यावर्षी दुधाला चांगला भाव प्राप्त झाला आहे. मात्र, राज्यातच जिल्ह्या-जिल्ह्यांमध्ये दूध खरेदीच्या दरात मोठ्या प्रमाणात तफावत आढळून येत असल्याने दूध उत्पादकांतून नाराजी व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर राज्यात दूध खरेदी संदर्भात सम-समान धोरण आखण्याची गरज असल्याची बाब आ.सुलभा खोडके यांनी राज्यविधिमंडळाच्या अधिवेशनात स्पष्ट केली.

राज्यविधिमंडळाच्या अर्थ संकल्पीय अधिवेशनामध्ये आज दुसऱ्या दिवसाच्या कामकाजा दरम्यान प्रश्नोत्तराच्या तासामध्ये आ.सुलभा संजय खोडके यांनी राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या संदर्भात चर्चा केली. राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना संपूर्ण अनुदान वितरण केल्याबद्दल तसेच दुध खरेदीचे दर हे २५ लिटर वरून ३५ ते ३८ रुपये पर्यंत वाढविण्यात आल्याबद्दल आमदार महोदयांनी शासनाचे अभिनंदन केले.

परंतु प्रत्येक राज्यात दूध खरेदीचे भाव वेगवेगळे आहेत. चारा खाद्य, पाणी, मजूर यांचा खर्च वाढत चालला आहे. अनेक शेतकरी सुद्धा आता कृषी पूरक व्यवसाय म्हणून दूध उत्पादनाकडे वळत असल्याने दूध खरेदी संदर्भात राज्यभरातील दूध उत्पादक संघांच्या बाजारभावाची सुद्धा शेतकरी वर्तुळात चर्चा होत आहे.

प्रत्येक जिल्ह्यात दूध खरेदीचे भाव हे वेगवेगळे आहेत, त्या पार्श्वभूमीवर राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना चांगला भाव मिळावा म्हणून राज्यात दूध खरेदी संदर्भात प्रत्येक जिल्ह्यात समसमान -भाव ठरविण्यासाठी योग्य धोरण आखण्याची गरज असल्याचे सांगून आ.खोडके यांनी विधानसभा अध्यक्ष अँड.राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्यासह सभागृहाचे लक्ष वेधले.

यावर शासनाच्या वतीने उत्तर देतांना मंत्री अतुल सावे यांनी सांगितले कि, मागील तीन वर्षांत पशुखाद्यांच्या किमतींमध्ये वाढ झालेली नाही.

तसेच सुमारे ९८ टक्के दूध उत्पादकांचे अनुदान अदा करण्यात आले असून उर्वरित काही प्रकरणांमध्ये बँक खात्यांच्या पडताळणी अभावी विलंब झाला आहे.

दरांतील फरकाबाबत स्पष्ट करण्यात आले की, पूर्वी शासन दर ठरवत होते; मात्र आता संबंधित जिल्ह्यातील दूध संघांना दर निश्चित करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

# अर्थसंकल्पीय अधिवेशनात व्यापक विमर्श घडवून आणणार-आ. प्रवीण तायडे

**अचलपूर/वार्ताहर**
महाराष्ट्र राज्याचे वर्ष २०२६ - २७ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन मुंबई येथील विधानभवनात सुरू झाले आहे. तब्बल एक महिना चालणाऱ्या या महत्त्वपूर्ण अधिवेशनात अचलपूर विधानसभा मतदार संघातील प्रलंबित विकासकामांसाठी आ. प्रवीण तायडे यांनी सशक्त पाठपुरावा करण्याची तयारी केली आहे. मतदार संघातील जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी तारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना व विविध संसदीय आयुध वापर करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अधिवेशनात आ. प्रवीण तायडे यांनी खालील प्रमुख मुद्दे उपस्थित करण्यात येणार आहेतः यामध्ये प्रामुख्याने अचलपूर नगरपरिषद प्रशासकीय भव्य दिव्य इमारत बांधकाम करिता ४० कोटी रुपयांची निधीची मागणी केली जाणार आहे .

त्यानंतर अचलपूर मतदार संघामध्ये रोजगार निर्मिती मोठे शेतीवर आधारित प्रकल्पाची निर्मिती करणे, तसेच ब दर्जा तीर्थक्षेत्र क्षेत्राकरिता उर्वरित १० कोटी रुपयांचा निधीची मागणीचा समावेश आहे. मतदार संघातील अतिशय महत्वाच्या आवश्यक



असलेल्या रस्ते व पुलाकरिता मंजुरात व निधी उपलब्ध करणे, मतदार संघातील अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी मंजुरात करणे. आणि चांदूर बाजार येथील एम .आय.डी.सी सुरू करण्याची मागणी चा ही समावेश आहे. अचलपूर नगरपरिषद क्षेत्रातील अमृत योजने अंतर्गत कामात झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशीची मागणी करण्यात आली आहे. यामुळे या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आ.प्रवीण तायडे अचलपूर मतदार संघाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने रोजगार, सिंचन, प्रशासकीय कार्यालय ,आरोग्य आदी प्रलंबित प्रश्नाबाबत आवाज उठविणार आहे .राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कुशल नेतृत्वाखाली हे सर्व विषय लवकरात लवकर मार्गी लावून अचलपूर मतदार संघाला जास्तीत जास्त निधी मिळवून देण्याचा विश्वास असल्याचे आ. प्रवीण तायडे यांचा सातत्याने पाठपुरावा सुरू राहील, असेही त्यांनी अधोरेखित केले.

## महापौरांनी केली प्रभाग क्र. ६ ची पाहणी

**अमरावती/का.प्र.**
अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी आज सोमवार दि. २३ फेब्रुवारी रोजी सकाळी प्रभाग क्र. ६ विलास नगर–मोरबाग परिसरातील हजरत बिलाल नगर, न्यू कॉटन मार्केट रोड, शेगाव, रहाटगाव रोड, के.एल. कॉलेज रोड, मसानगंज, कल्पना नगर व इतवारा बाजार परिसराची स्वच्छतेबाबत पाहणी केली.



पाहणीदरम्यान महापौरांनी स्वच्छता, आरोग्य आणि शिस्तबद्ध प्रशासनाला सर्वोच्च प्राधान्य देण्याचा निर्धार व्यक्त केला. शहरातील स्वच्छतेच्या कामात कोणतीही ढिलाई सहन केली जाणार नसून निष्काळजीपणा करणाऱ्या स्वास्थ्य निरीक्षकांवर कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. नगरसेवक किंवा नागरिकांकडून स्वच्छतेबाबत तक्रार प्राप्त झाल्यास ती तात्काळ निकाली काढणे बंधनकारक राहील. तक्रारी प्रलंबित ठेवणे किंवा दुर्लक्ष करणे अजिबात सहन केले जाणार नाही. एखाद्या स्वास्थ्य निरीक्षकाविरुद्ध नगरसेवकांकडून तक्रार आल्यास थेट कारवाई करण्यात येईल, असेही महापौरांनी स्पष्ट केले.

स्वच्छतेच्या मोहिमेत लोकसहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगत महापौरांनी नागरिकांना कचरा निर्धारित ठिकाणीच टाकण्याचे व स्वच्छतेचे नियम पाळण्याचे आवाहन केले. स्वच्छतेच्या कामांचा आढावा घेऊन संबंधित स्वास्थ निरीक्षकांना जागेवरच सूचना देण्यात आल्या. अमरावती स्वच्छ, सुंदर आणि निरोगी व्हावी, यासाठी प्रशासनासोबत नागरिकांचे सहकार्यही तितकेच महत्त्वाचे आहे असे महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी सांगितले. पाहणी दरम्याननगरसेवक संजय नरवणे, दिपक साहू (सम्राट), कौशिक अग्रवाल, पंजाबराव तायवाडे, स्वास्थ निरीक्षक, सफाई कामगार उपस्थित होते.

## ११ पराभूत उमेदवारांचा अद्यापही हिशेब नाही

### १५ दिवसांत उत्तर न दिल्यास आगामी निवडणुकीतून अपात्र

**अमरावती/का.प्र.**
नगरपालिका निवडणुकीनंतर झालेल्या प्रशासकीय शिस्त चाचणीनंतर, ११ पराभूत उमेदवारांनी अद्याप त्यांचे निवडणूक खर्च विवरणपत्र सादर केलेले नाही. एकूण ६६१ उमेदवारांनी नगरपालिका निवडणूक लढवली. निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार, प्रत्येक उमेदवाराला निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर निर्धारित कालावधीत त्यांचे निवडणूक खर्च विवरणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात आली होती. तरीही, ११ उमेदवारांनी जाणूनबुजून या नियमाकडे दुर्लक्ष केले आहे. निवडून आलेल्या सर्व ८७ नगरसेवकांनी निर्धारित कालावधीत त्यांचे खर्च विवरणपत्र सादर केले आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. यावरून असे सूचित होते की सत्ताधारी आणि विजयी उमेदवारांनी किमान कागदपत्रांशी संबंधित शिस्तीचे पालन केले आहे, परंतु पराभूत झालेल्या ११ उमेदवारांनी त्यांचे हिशेब सादर न केल्याने संशय निर्माण होतो. हा खर्च लपवण्याचा प्रयत्न आहे का? अशी अफवा पसरत आहे दिलेल्या मुदतीत खर्चाचा हिशेब सादर न केल्यास आगामी निवडणुकीत त्यांची उमेदवारी धोक्यात येऊ शकते. शिवाय, त्यांची कागदपत्रे रोखल्याने अपात्रतेच्या कारवाईचे दार उघडू शकते. पारदर्शकता आणि जबाबदारी ही लोकशाही प्रक्रियेची खरी ताकद मानली जाते. अशा परिस्थितीत, खर्चाचा हिशेब सादर करण्यास उशीर करणाऱ्या उमेदवारांवर कठोर कारवाई केल्याने इतरांना स्पष्ट संदेश जाईल. आता शहरवासीयांचे लक्ष या १५ दिवसांत संबंधित उमेदवार नियमांचे पालन करतात की अपात्रता स्वीकारतात यावर केंद्रित आहे.

## स्नेहसंमेलन हे कलागुणांना वाव देणारे व्यासपीठ-विलास इंगोले





### डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयात तरुणाईचा जल्लोष

**अमरावती/का.प्र.**
श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय येथे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. स्नेहसंमेलन हे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे व्यासपीठआहे असे प्रतिपादन मनपा विरोधी पक्षनेते विलास इंगोले यांनी केले.

डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय येथे आयोजित स्नेहसंमेलनाच्या समारोपीय कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.

या कार्यक्रमात विविध सांस्कृतिक उपक्रमांची रंगतदार मेजवानी पाहायला मिळाली.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून विलास इंगोले तसेच ॲड.सुनील देशमुख, प्राचार्य ढोबळे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख ह्या होत्या. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्य, गीत, नाट्यछटा, एकांकिका आणि लोककलेच्या सादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकली.

यावेळी प्रमुख अतिथी विलास इंगोले आणि सुनील देशमुख यांनी विद्यार्थ्यांच्या उत्साहाचे व आयोजन कौशल्याचे कौतुक करत शिक्षणाबरोबरच सांस्कृतिक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध स्पर्धा आणि उपक्रमात यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांचे विविध पारितोषिके देऊन त्यांना गौरविण्यात आले.

महाविद्याल याच्या वतीने अतिथींचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सिद्धार्थ भोयर, जाज्जी ओबेरॉय, व राधिका ठाकरे यांनी प्रभावीपणे केले तर आभार प्रदर्शन प्रफुल्ल घवळे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.



# मुकुल रॉय: कुशल रणनीतिकार !

तृणमूल काँग्रेसचे नेते मुकुल रॉय यांच्या निधनामुळे एका कुशल रणनीतिकाराचा अंत झाला आहे.मुकुल रॉय हे पश्चिम बंगालच्या राजकारणातील चाणक्य मानले जात असत.आपल्या राजकीय जीवनाची सुरुवात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा एक कार्यकर्ता म्हणून करणारे मुकुल रॉय हे नंतर तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे उजवे हात बनले आणि पक्षाचे मास्टर स्ट्रॅटेजिस्ट म्हणून ओळखले जाऊ लागले.मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा कार्यकर्ता म्हणून काम करत असताना, काँग्रेसच्या एका स्थानिक नेत्याच्या संपर्कात ते आले आणि त्याच्या नेतृत्वाने प्रभावित होऊन त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.मात्र ते काँग्रेसमध्ये फार काळ रमले नाहीत.

१९९८ साली पक्ष नेतृत्वाशी मतभेद झाल्याने,ममता बॅनर्जी यांनी काँग्रेसचा राजीनामा देऊन, तृणमूल काँग्रेस पक्षाची स्थापना केली.मुकुल रॉय हे काँग्रेसमध्ये असताना,युथ काँग्रेसचे काम करत होते.ममता बॅनर्जी याही तेंव्हा युथ काँग्रेसच्या नेत्या असल्याने, मुकुल रॉय हे त्यांच्या संपर्कात होते.ममतांनी काँग्रेसचा राजीनामा दिल्यानंतर, मुकुल रॉय हे त्यांच्याबरोबर काँग्रेसमधुन बाहेर पडले आणि तृणमूल काँग्रेसच्या स्थापनेत त्यांनी, ममतांना मोलाचे सहकार्य केले.त्यादृष्टीने मुकुल रॉय हे तृणमूल काँग्रेसच्या संस्थापक सदस्यांपैकी एक होते.

२००९ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत, पश्चिम बंगाल मधील लोकसभेच्या एकूण ४२ जागांपैकी १९ जागा जिंकून,ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसने राज्यातील सत्ताधारी डाव्या आघाडीला मोठाच दणका दिला.तृणमूल काँग्रेसच्या या भव्य यशात मुकुल रॉय यांच्या कुशल रणनीतिचा मोठा वाटा होता.२०११ मध्ये झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसने, सत्ताधारी डाव्या आघाडीचा दारुण पराभव केला आणि डाव्या आघाडीची ३४ वर्षांची सत्ता संपुष्टात आणली.त्या विजयातही मुकुल रॉय यांनी महत्वाची भूमिका बजावली होती.तृणमूल काँग्रेसचे जाळे पश्चिम बंगालमध्ये खेडोपाडी पोहोचविण्यात मुकुल रॉय यांनी महत्वाची भूमिका बजावली होती.२००९ मध्ये ते राज्यसभेचे खासदार झाले.माजी पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या मंत्रिमंडळात ते रेल्वे खात्याचे मंत्री होते.ते तृणमूल काँग्रेसचे महासचिव म्हणूनही कार्यरत होते.

२०१५ साली शारदा चिटफंड घोटाळा आणि नारदा स्टिंग ऑपरेशन यांमध्ये त्यांचे नाव आल्यानंतर,ते पक्ष नेतृत्वाच्या नजरेतून उतरले होते.त्यानंतर त्यांची पक्षाच्या महासचिव पदावरून उचलबांगडी करण्यात आली होती.२०१७ मध्ये त्यांनी तृणमूल काँग्रेसचा राजीनामा देऊन भाजपात प्रवेश केला आणि तेथेही आपली उपयुक्तता सिद्ध केली.त्यांनी तृणमूल काँग्रेस मधील अनेक नेत्यांना भाजपामध्ये आणले आणि भाजपाची संघटना मजबूत केली.त्यांचा आपल्या कार्यकर्त्यांबरोबरचा संपर्क दांडगा होता.जिल्हा स्तरावरील आणि बूथ स्तरावरील कार्यकर्त्यांची माहिती आणि त्यांचे फोन नंबर्स त्यांच्याकडे नोंदलेले असत.२०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत, भाजपाने पश्चिम बंगाल मधील लोकसभेच्या एकूण ४२ जागांपैकी १८ जागा जिंकून ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला मोठाच धक्का दिला.२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत पश्चिम बंगाल मधील लोकसभेच्या केवळ २ जागा जिंकणाऱ्या भाजपाची ही गरुडझेप सर्वांनाच थक्क करणारी होती.भाजपाच्या या भव्य यशात मुकुल रॉय यांचा मोठा वाटा होता.२०२१ मध्ये झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत, मुकुल रॉय हे भाजपाच्या तिकिटावर कृष्णनगर उत्तर विधानसभा मतदारसंघातून निवडून आले होते.मात्र भाजपाचे स्थानिक नेते सुवेंदू अधिकारी यांच्याशी त्यांचे मतभेद झाल्याने ते पक्षात नाराज होते.सुवेंदू अधिकारी यांनी विधानसभा निवडणुकीत खुद्द ममता बॅनर्जी यांचा पराभव केल्याने,त्यांचे पक्षातील महत्त्व वाढले होते.त्यातच विधानसभा निवडणुकीनंतर सुवेंदू अधिकारी यांची विधानसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून निवड झाल्यानंतर, दुखावलेल्या मुकुल रॉय यांनी भाजपाचा राजीनामा देऊन पुन्हा तृणमूल काँग्रेसमध्ये प्रवेश केला.मात्र त्यांनी आपल्या आमदारकीचा राजीनामा दिला नाही.

भाजपाचे नेते सुवेंदू अधिकारी यांनी पक्षांतरबंदी कायद्यांतर्गत मुकुल रॉय यांची आमदारकी रद्द करण्यासंदर्भात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली.नोव्हेंबर २०२५ मध्ये उच्च न्यायालयाने त्यांची आमदारकी रद्द केली,मात्र त्या विरोधात त्यांच्यातर्फे सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली.जानेवारी २०२६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने, उच्च न्यायालयाच्या निर्णयाला अंतरिम स्थगिती दिली.२०२१ साली झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भाजपाच्या तिकिटावर निवडून आलेल्या मुकुल रॉय यांनी थोड्याच दिवसात तृणमूल काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता.तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी त्यांचे मोठ्या थाटामाटात पक्षामध्ये स्वागत केले होते.मात्र काळ आता बदलला होता.ममता बॅनर्जी यांचे भाचे अभिषेक बॅनर्जी यांचे पक्षातील महत्त्व आता खूपच वाढले होते.अभिषेक बॅनर्जी हे आता ममतांचे उजवे हात बनले होते.अशा परिस्थितीत पक्षात पुनरागमन केलेल्या मुकुल रॉय यांचे, पक्षनेतृत्वाच्या दृष्टिकोनातून पुर्वी सारखे महत्व राहिले नव्हते.त्यातच मुकुल रॉय यांना निरनिराळ्या आजारांनी ग्रासल्यामुळे,ते सक्रिय राजकारणातून जवळ जवळ निवृत्तच झाले होते.एक कुशल रणनीतिकार, उत्कृष्ट संघटक म्हणून मुकुल रॉय हे पश्चिम बंगाल मधील जनतेच्या सदैव लक्षात राहतील.

**अभय गोखले**

---

# डॉ.देवीसिंहजी शेखावत
## कर्तृत्व, दूरदृष्टी आणि समर्पणाची कहाणी

अमरावतीच्या सुपीक मातीने घडवलेले, शहराच्या इतिहासावर अमिट ठसा उमटवणारे आणि जनमानसात कायमचे स्थान मिळवणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. देवीसिंह रामसिंह शेखावत. त्यांच्या स्मृतिदिनी आपण केवळ एका नेत्याला नव्हे, तर एका युगपुरुषाला, दूरदर्शी शिल्पकाराला आणि जनतेच्या हृदयातील आधारस्तंभाला कृतज्ञतापूर्वक स्मरतो.

१९ एप्रिल १९३४ रोजी जन्मलेले हे कर्तबगार व्यक्तिमत्त्व २४ फेब्रुवारी २०२३ रोजी वयाच्या ८९व्या वर्षी अनंतात विलीन झाले. त्यांच्या जाण्याने अमरावतीच नव्हे, तर विदर्भ आणि संपूर्ण महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात एक अपूरणीय पोकळी निर्माण झाली. परंतु त्यांचे कार्य, त्यांची विचारसरणी आणि त्यांची प्रेरणा आजही तितक्याच तेजाने उजळत आहे.

अमरावतीचे प्रथम महापौर म्हणून त्यांनी शहराच्या विकासाचा पाया घातला. नियोजनबद्ध वाढ, पायाभूत सुविधा, नागरिकाभिमुख दृष्टीकोन आणि दूरगामी नियोजन या माध्यमातून त्यांनी अमरावतीला आधुनिकतेकडे नेले. अमरावती महानगर पालिकेच्या बळकटीकरणात तसेच अप्पर वर्धा प्रकल्पासारख्या महत्त्वाकांक्षी उपक्रमांमध्ये त्यांचे योगदान मोलाचे ठरले.

शिक्षण क्षेत्रातील त्यांची ओढ आणि बांधिलकी विशेष उल्लेखनीय आहे. विद्याभारती शैक्षणिक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष म्हणून त्यांनी असंख्य विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा दिली. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ उभारणीच्या प्रक्रियेत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला आणि विदर्भातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचे दरवाजे अधिक व्यापक केले.

**स्मृतिदिनानिमित्त**

शेतकऱ्यांविषयी त्यांना विशेष कळकळ होती. दुर्गापूर (बडनेरा) येथील कृषी विज्ञान केंद्राचे प्रकल्प संचालक म्हणून त्यांनी शेतकऱ्यांसाठी संशोधनाधारित, प्रगत आणि व्यवहार्य योजना राबवल्या. शेतकऱ्यांच्या समस्यांवर त्यांनी केवळ भाष्य केले नाही, तर प्रत्यक्ष उपाययोजना राबवून त्यांना सक्षम बनवले. औद्योगिक प्रगतीसोबतच कृषी विकासाची सांगड घालण्याची त्यांची दृष्टी खऱ्या अर्थाने दूरदर्शी होती.



१९८९ च्या नागपूर अधिवेशनात मोसीकॉल कामगारांच्या न्यायासाठी त्यांनी बुलंद आवाज उठवला. त्यांच्या ठाम भूमिकेमुळे कामगारांच्या हक्कांच्या लढ्याला बळ मिळाले.ते फक्त पद भूषवणारे राजकारणी नव्हते; ते जनतेच्या वेदना जाणणारे आणि त्या वेदनांना शब्द देणारे नेतृत्व होते.त्यांच्या जीवनातील एक अभिमानास्पद अध्याय म्हणजे माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील उपाख्य ताईसाहेब यांच्या सहचारिणी म्हणून निभावलेली भूमिका. भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपतींच्या कार्यकाळात त्यांनी अमरावतीच्या विकासासाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे अमरावतीला राष्ट्रीय पातळीवर नवे स्थान मिळाले. हे केवळ योगायोग नव्हते, तर त्यांच्या निष्ठेचे, प्रेमाचे आणि शहरावरील अपार विश्वासाचे फलित होते.

एक साधा शेतकरी, शिक्षणतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ता, दूरदर्शी राजकारणी आणि आदर्श पती या सर्व भूमिका त्यांनी प्रामाणिकपणे आणि निस्वार्थ भावनेने निभावल्या. त्यांच्या प्रत्येक कृतीत समाजातील दुर्बल घटकांचे कल्याण, विद्यार्थ्यांचे भविष्य आणि अमरावतीचा सर्वांगीण विकास यांचा ध्यास दिसून येत असे.

आज त्यांच्या स्मृतिदिनी आपण दुःखाने नव्हे, तर अभिमानाने त्यांना आठवतो. त्यांनी आपल्याला दिलेली मूल्ये, संघर्षाची प्रेरणा आणि विकासाची दिशा हीच त्यांना खरी आदरांजली आहे. त्यांचे जीवन आपल्याला शिकवते..स्वप्न मोठे असावे, ध्येय स्पष्ट असावे आणि कार्य निस्वार्थ असावे. डॉ. देवीसिंहजी शेखावत साहेबांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन!त्यांच्या कार्याची ज्योत अमरावतीच्या प्रत्येक रस्त्यावर, प्रत्येक शैक्षणिक संस्थेत, प्रत्येक शेतात आणि प्रत्येक तरुणाच्या मनात सदैव प्रज्वलित राहो हीच कृतज्ञ श्रद्धांजली.

**संतोष देशमुख**
मो.७०२०६६०५३४

---

# युगावतार मेहेरबाबा...

'प्रेम'हे सर्वशक्तिमान आहे.या शब्दात खूप मोठी ताकत आहे.जीवनात याच प्रेमाला आपण एकमेकांमध्ये वाटत राहलो तर निश्चितपणे बंधूभाव कायम राहील. प्रेमाला वाटा,पैसे दान करण्यापेक्षा प्रेमाचे दान करा,ते सर्वात मोठे कार्य राहील.नेमक्या याच 'प्रेमा'चा संदेश अवतार मेहेरबाबा यांनी जगभरातील प्रेमीजनांना दिला.श्री मेहेरबाबा यांचा एका इराणी नामक पारशी कुटुंबात २५ फेब्रुवारी १८९४ रोजी झाला.

अगदी लहानपणापासून आपल्या प्रेमळ व आनंदी स्वभावाने ते सर्वांना हवेसे वाटत. कित्येक काव्य-पंक्ती ते आपल्या मधुर आवाजात म्हणत. क्रिकेट, आट्यापाट्या,गोट्या वगैरे देशी-विदेशी खेळांत ते तरबेज होते.कॉलेजमध्ये त्यांनी 'विश्वबंधु'संघाची स्थापना केली होती.१९१३ साली इंटरमध्ये शिकत असतांनाच हजरत बाबाजान यांच्याशी त्यांची दृष्टभेट झाली व ती श्रीमेहेरबाबांच्या दैवी जीवनाचा शुभारंभच ठरली.श्रीसाईबाबा,श्री उपासनी महाराज,हजरत बाबाजान,श्री नारायण महाराज व ताजुद्दीनबाबा हे श्रीमेहेरबाबांचे पाच सद्गुरु होत. त्यांच्यामुळे, आपण अज व अव्यय असे सनातन पुरुष असून,सर्वत्र आपणच विनटलो आहोत व जगतकल्याणासाठी 'युगे युगे'अवतरणारा पुरुषोत्तम तो आपणच आहोत,असा अनुभव श्रीबाबांना आला.

१० जुलै १९२५ पासून श्रीबाबानी वैखरी वाणीचे मौन पाळले.आयुष्याच्या अखेरपर्यंत त्यांच्या मुखातून एक शब्दही बाहेर पडला नाही.हृदयातील सत्य जागृत करण्यासाठी मी आलो आहे व ते कार्य मौनानेच अधिक प्रभावीपणे मी करतो.'श्रीबाबांच्या मौनाचा प्रभाव इतका होता कि,त्यांच्या उपस्थितीत ते बोलत नाहीत असे कधी वाटतच नसे,उलट भेटीस जाणारा मात्र नतमस्तक होऊन मौन होत असे.सन १९१३ मध्ये मेहेरबान १८ वर्षाचे होते,तेव्हा एक दिवस डेक्कन कॉलेज मधून परतत असतांना सायकल ने घरी जातेवेळी त्यांना पाहून हजरत बाबाजान यांनी भक्ताच्या गर्दीतून मेहेरबान जवळ आले.मेहेरबान सायकल वरून उतरले आणि दोघांची भेट झाली आणि बाबजान यांनी मेहेरबान यांच्या कपाळावरील मधोमध चुंबन घेत ते आपल्या जागी परतले.त्या चुंबन द्वारे सद्गुरु बाबाजान यांनी मेहेरबान ला ब्रम्ह चेतना प्रदान केली होती अर्थात मेहेरबान ला ईश्वरी साक्षात्कार झाला होता

सन १९१५ मध्ये मेहेरबान अंतप्रेरनेने सद्गुरु साईबाबा यांच्याजवळ गेले. तेव्हा त्यांनी मेहेरबान यांना 'परवरदिगार'म्हणून संबोधले.त्यानंतर साईबाबा नी मेहेरबान ला साकोरी चे सद्गुरु उपासनी महाराज जवळ जाण्यास सांगितले तेव्हा महाराज यांनी एक छोटा दगड फेकून मारला तो मेहेरबान च्या कपाळावर त्याच ठिकाणी लागला ज्या ठिकाणी हजरत बाबजान ने चुंबन घेतले होते.१९२१ च्या शेवटी मेहेरबान ला पूर्ण मानवीय चेतना प्राप्त झाली होती आणि सोबतच त्यांची ब्रम्हचेतना जशीच्या तशी कायम राहिली.अश्याप्रकारे मेहेरबान चे २० वर्ष पूर्ण झाले.



या तीन सद्गुरु सोबतच मेहेरबान चे आणखी दोन सद्गुरु होते.केळगाव चे नारायण महाराज आणि नागपुरचे ताजुद्दीन बाबा.मेहेरबाबा वेळोवेळी या दोन सद्गुरुकडे जात होते.नंतर मेहेरबान हे 'मेहेरबाबा'म्हणून ओळखल्या जात होते.१९५२ मध्ये मेहेरबाबा त्यांच्या ४५ शिष्यांना घेवून पुणे येथून पायदळ मुंबई गेले आणि तिथे त्यांनी दादर मोहल्ल्यात 'मंजिल-ए-मिम'(गुरू-गृह) नावाचे आश्रम सुरु केले.त्या आश्रमात बाबा ने शिष्यांना कडक आध्यात्मिक शिकवण ,निस्वार्थ सेवा आणि आज्ञाकरिता शिकवण दिली.कधी-कधी मेहेरबाबा रोडवर भीक मंगणाऱ्या लंगडे,अंधळे, लुले अश्या अपंग भिक्षुकांना बोलावून त्यांना जेवण,माला व कपडे देत होते.१९२३ मध्ये मेहेरबाबा आपल्या शिष्यांना घेवून अहमदनगर वरून ६ किलोमीटर अंतरावर असलेल्या अरणगाव येथे आले.तेथे बाबानी एका निंबाच्या झाडाखाली 'धुनी'पेटविली आणि हे गाव नंतर मेहेरबाद म्हणून ओळखल्या जाऊ लागले.तेथेच बाबांचे निवास राहायचे.तेथे बाबांनी आपले शरीर सोडण्यापूर्वीच शिष्यांना येथेच माझी समाधी बनविण्याचे आदेशीत केले.मेहेरबाद मध्ये मेहेरबाबानी हजरत बाबजान स्कुल,धर्मार्थ दवाखाना, धर्मशाळा,कुष्ठरोग्यासाठी व अनाथांसाठी आश्रम अशी मानवसेवेत काही संस्था सुरु केल्या.जीवनास अंतिम सत्याप्रत नेणाऱ्या विविध मार्गाचे विवरण श्रीबाबानी केले असले तरी त्यांचा मुख्य भर 'प्रेम हीच अध्यात्म मार्गाची सुरुवात व अखेर आहे.

३१ जानेवारी १९६९ ला अवतार मेहेरबाबानी मेहेराजाद मध्ये दुपारी १२.१५ वाजता आपल्या मंडळीजनासमोर भौतिक शरीर सोडले.२५ फेब्रुवारी रोजी देश-विदेशातील सर्व बाबाप्रेमी हे अवतार मेहेरबाबा यांचा १३२ वा जन्मोत्सव विविध कार्यक्रमांनी साजरा करतात.

**हेमंत निखाडे**
मो.९९२२६६९७०६

---

# आयुष्याचे सुख-दुःख मांडणारे 'रातमतरा'

**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ एकहत्तर वा प्राथमिक नाट्य महोत्सव २०२५- २६ भाऊसाहेब लिमये नाट्यगृह सिपना कॉलेज अमरावती येथे श्री.भगवान हिरे लिखित 'रातमतरा' हा नाट्यप्रयोग कामगार कल्याण केंद्र उमरी, अकोला यांनी सादर केला.**



प्रवासी निवारा संतूरवाद्याने प्रवेश,बाकावर बसलेला इसम केळ खात साल रस्त्यावर फेकताच प्रवेशित झालेला दुसरा इसम जागृत नागरिक संवाद आरंभ विनोदाचे शब्द फेकताना जीर्ण उच्चारनात खेळ सुरू, सफरचंदला बॉल करून हॉकीस्टिक उर्फ काठींचा वापर अचानक सैराटधुनीत हिंदी गीत सुरू व इसमाचा नाच अन् गीत बंद होताच पूर्ववत खेळ म्हणजे महाराष्ट्राची हास्यजत्रा थाटात प्रभाकर मोरे व समीर चौगुलेच्या नक्कलयुक्त प्रयोगाची झलक. ज्ञानाचे वाटप करणारा इसम खेळातले सफरचंद खेळमोडून खाताना नाट्य तिसऱ्या व्यक्तीचा प्रवेशताना गावंढळ संवादात सुटबुटातला व्यक्ती सादर करतो. भांडणात ब्रिफकेसने इसम कोसळून मेला असावा तेवढ्या तिसरा ओरडतो,त्यास थांबवण्याच्या नादात तोही खाली पडतो.नाटकाचे गूढ वाढताच इसमाला गाणे ऐकायला येते व नाचत शुद्धीवर येतो. शंकेला घर करणारे संवाद तिसऱ्याच्या शुद्धीवर येण्याने नाटकात नाटक खेळत असल्याचे दिसते. फर्टीलायझरच्या कंपनीचे कृषक पुत्र तिघेही एजंट असल्याचे स्पष्ट होत.संवादात तत्वज्ञान, विनोद व स्थितीच्या विळख्यात असलेल्या घटनांचे दर्शन होत 'रातमतरा' शब्दाचा अर्थ उलगडत सर्व मित्र एकत्र नाट्य खेळ खेळवत उघड होताच बसचा आवाज, तिघेही धावताना बस सुटली !!

कातरवेळ अन् घरी जाण्याचे मार्ग बंद झाल्याने झालेली झंझट 'रातमतरा' निमित्ताने प्रदर्शित.तेवढ्यात देशस्थ वेशात येणारा सद्गृहस्थ ही बस आज शेवटी ! म्हणत पर्यायी वाहनाची सोय नाही, गावखेड्यात दोनच मोटरसायकल सांगत खेड्याच्या आर्थिक परिस्थितीचा संकेत मांडत, चला आपल्या घरी! म्हणून गृहस्थ अडचणीचा धर्म निभावत 'जे का रंजले गांजले'म्हणत निघतो. मध्यंतर होऊन पुढे नाटकाला काय मांडायचे आहे हे प्रेक्षकाला प्रतीक्षेत ठेवून भग्न भिंतीमध्ये घुबडं चित्रित नेपथ्य, रातकिडाचे पार्श्वध्वनी.पहिल्या प्रवेशाचे संहारण मांडत अव्वासव्वा अभिनयाचे वर्णनात भूक गृहस्थ ऊर्फ तात्या घालवणार ह्या अपेक्षेने रात्रीचा अंधार अन् भग्न जागेचे दृष्य शंकेला जागे करते.कंदिलाच्या उजेडात लघुशंकेचे विवरण व गावात राष्ट्रीय कार्यक्रमाची सोय अर्थात मद्यपान. बेवडा हा देवमाणूस असल्याने त्याला यथोचित सन्मान वगैरेवर संवाद. कृषी विषयक धोरणाचा अलगत विचार त्यात भुकेची बाधा झाल्यावर प्रतीक्षेला तडा जात असताना तात्या पिशवीत गावठी मद्यपेयाची सोय लावताच दोन मित्र जाम खुश !! एक मद्याला नाकारत भुकेपोटी संयमी बसला.

गुत्त्यावर सर्व काही खुलेआम चर्चा.. बाटली नाही चालली तर कडेवर घेऊ अशी डायलॉगबाजीने मद्यग्रहणवेळी तात्या मान वाकून माळ काढत सिटीफ्रेंडमध्ये सहभागी होऊन पेयप्राशन करतात. जंगली वातावरणात रोमँटिक पार्श्व-संगीतासह प्रवेश सादर.तात्याच्या भूमिकेचा परिचय एक बाप खपज(खाणे, पिणे व ...)मूळ उद्ध्वस्त कसा झाला.कुणबीमाळी म्हणून पडके वखार,रग्गड शेतीचा हवाला देत,

**एक टक नाटक**
**समीक्षण**

तो मध्येच जरा येतो!! सांगून निघतो. पुन्हा मित्रांच्या विनोदाचे वातावरण, पिशवीत जेवनाचे काय म्हणून बघत त्यात फक्त ग्लास बघून पुन्हा शंकेचे घर. अचानक बाहेरून दगडफेक व भयाचे वातावरण,काळे दगड कोण फेकतो.हे शोधतच फोनची रिंग वाजते.माझे पाहुणे आहात तुम्ही!! माझ्या जागेत काय उद्धटपणा सुरू आहे. फोन स्पीकरवर करून ऐका!! एकमेकाला गुदगुल्या करून हसा मला हसायला आवडते आणि त्यांनाच मी जिवंत ठेवणार !! फोन कट होताच सर्व गांगरून जातात.परत फोन येतो व तात्याचा गेम केला चला पुन्हा हसा नाही तर!!...हसण्याचा आवाज पुन्हा येतो. कंदीलउजेडात तात्याचा शोध,खून करून मुडदा पडल्याचे दिसताच सर्व भयभीत वातावरण. एवढ्यात घुंगराचा आवाज ! सर्वांचे भय शिगेला, जंगलात तमाशाची कथा.. 'करायला गेले एक झाले अनेक'अशा स्थितीत त्याचा हटकाची काठी घेऊन तात्या प्रगट होतो.सर्व अचंबित होऊन तात्याचे भूत म्हणून घाबरून पळापळ.भानावर आणत तात्या ! गोफणीने रात्री फेकलेले दगड व बुजगावणे बघून तुम्ही घाबरले त्यात मी मुद्दाम फोन करून गंमत घेतली सांगतो. भुकेला मारायला धान्याची दारू घ्या ! नाही तर मी सर्वांना तलवारीने मारून टाकेल हा धाक दाखवत पुनः झोपा अन् स्वप्न पाहून मला सांगा अशी अटीने नवाप्रयोग सुरू होतो.

साधुवेशात व पुढारीपदाने सामान्य माणसाची लूट दर्शवत स्वप्न सांगतो. दुसरा सतत काही तरी ओझे ओढत आयुष्य कसे संपले या गुढाने प्रतिके,मान्यता, अज्ञानी अंधकार,नशिबाने आयुष्य व आशेने सुख-दुःख, अनादी अनंत ओढत जाणारा माणूस सांगतो. तात्या दोन स्वप्नाची तुलना करून तिसऱ्या व्यक्तीला स्वप्न बघण्यासाठी शस्त्र उगारतो.त्याला कधी स्वप्नच पडत नाही.तो विनंती करतो.फोनची रिंग वाजते.बोल बेटा ! म्हणून गाणे ऐकण्याची विनंती भल्या पहाटे मुलगी करते. म्हणून अभागी बाप आशयाचे गीत सुरू होते. खजिल झालेला तात्या माफी मागत बाप असल्याची सल कशी वेडावून सोडते.ह्या कथानकात कुटुंबाची होरपळ, शेतीव्यवस्थेच्या व्यवस्थापनात शासनाचा दुजाभाव शेतकऱ्याचे आयुष्य कसे खिल्ली उडवणारे करते व त्यात फर्टीलायझरच्या कंपनीचे एजंट कसे अडकतात जी शेतकऱ्यांच्या घरातील असताना पहाटेच्या चिवचिवाटात नाट्यअंत होतो.

दिग्दर्शक विनय बोदडे यांनी लेखक भगवान हिरे यांच्या विनोदाला सजवताना कलावंत गणेश डांगे,अनिल वाडकर,सूरज मारके व तात्या हरिदास आंग्रे संथगतीत व संगीत असंगत साद राजेश पळसपगार यांची तर वेषभूषा अमोल खंडार व रंगभूषा विनय वानखोडे यांनी साधली.नेपथ्य बसथांबा पण रस्त्याशिवाय, वखारीचे भग्न घुबडीचे चित्राने पटप्रदर्शन, संध्याकाळ व रात्र यातला प्रकाश योजनेत राहुल भगत यांच्या प्रयत्नाने नाटक खुलण्याचा प्रयत्न 'रातमतरा' ठरला.

**कबीर फादर**
मो.७७९८६४५५६५



# १० कोटींची खंडणी ; आमदार साजिद खान पठाण यांना जीवे मारण्याची धमकी

## विधानसभेत वडेट्टीवार संतापले : 'झेड' दर्जाची सुरक्षा देण्याची मागणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

राज्यातील कायदा-सुव्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचा आरोप करत काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत जोरदार हल्लाबोल केला. अकोला पश्चिमचे काँग्रेस आमदार साजिद खान पठाण यांना बिश्नोई गँगच्या नावाने १० कोटी रुपयांची खंडणी मागत जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचा गंभीर मुद्दा त्यांनी सभागृहात उपस्थित केला.

१७ फेब्रुवारी रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास आमदार पठाण यांना आंतरराष्ट्रीय क्रमांकावरून फोन आला. स्वतःला बिश्नोई गँगशी संबंधित शुभम लोणकर असल्याचे सांगत संबंधित व्यक्तीने १० कोटी रुपयांची उघड मागणी केली. पैसे न दिल्यास गोळ्या घालून ठार मारू, अशी थेट धमकी देण्यात आली. 'पोलिसांना




सांगितले तरी काही उपयोग नाही; काही महिन्यांनी आम्ही काम तमाम करू,' अशा शब्दांत आमदारांना धमकावण्यात आल्याचे वडेट्टीवार यांनी संतापाने सांगितले.

सभागृहात बोलताना वडेट्टीवार म्हणाले, 'राज्यात लोकप्रतिनिधीच सुरक्षित नसतील, तर सामान्य जनतेची काय अवस्था असेल? दिवसाढवळ्या धमक्या दिल्या जात आहेत. गँगस्टरचे नाव घेऊन आमदारांना लक्ष्य केले जाते, ही अत्यंत धक्कादायक बाब आहे.' धमकीचा ऑडिओ ऐकला तर अंगावर काटा येतो, असेही त्यांनी नमूद केले.

साजिद पठाण यांचा कोणत्याही गुन्हेगारी पार्श्वभूमीशी संबंध नसताना त्यांना लक्ष्य करण्यात येत असल्याचा आरोप करत वडेट्टीवार यांनी सरकारवर जोरदार टीका केली. 'सरकार झोपले आहे का? लोकप्रतिनिधींनाच संरक्षण नसेल तर राज्य चालवायचे कसे?' असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला.

या प्रकरणाची गंभीर दखल घेत विधानसभा अध्यक्षांनी सरकारला तात्काळ कारवाईचे निर्देश दिले. संबंधित आमदारांना कडक सुरक्षा देऊन धमकी प्रकरणाचा छडा लावावा, अशी मागणी सभागृहातून करण्यात आली.

## 'वाई प्लस' सुरक्षेची काँग्रेसची मागणी ; जिल्हाधिका-यांना निवेदन



**अकोला :** अकोला पश्चिमचे आमदार साजिद खान पठाण यांना जीवे मारण्याची धमकी मिळाल्याच्या गंभीर प्रकारामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी प्रशासनावर जोरदार दबाव आणत तात्काळ 'वाई प्लस' दर्जाची सुरक्षा देण्याची आक्रमक मागणी केली आहे.

जिल्हाध्यक्ष अशोक अमानकर व महानगर अध्यक्ष डॉ. प्रशांत वानखडे पाटील यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देत संताप व्यक्त केला.

'लोकप्रतिनिधींनाच धमक्या मिळत असतील तर सर्वसामान्य नागरिकांची सुरक्षा कोण करणार?' असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला. अलीकडे गुन्हेगारी टोळ्यांकडून, विशेषतः कथित बिश्नोई गँगकडून धमक्या दिल्या जात असल्याच्या घटनांनी राज्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आमदार पठाण यांना मिळालेली धमकी ही केवळ एका व्यक्तीविरुद्धची बाब नसून लोकशाही व्यवस्थेलाच दिलेले आव्हान असल्याचे काँग्रेसने स्पष्ट केले.

निवेदनात आमदार पठाण यांना तात्काळ उच्चस्तरीय पोलीस सुरक्षा देण्याची, विद्यमान सुरक्षेचा आढावा घेऊन 'वाई प्लस' दर्जासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याची तसेच धमकी देणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून राज्य व केंद्रीय गुप्तचर यंत्रणांशी समन्वय साधण्याचीही मागणी करण्यात आली. दरम्यान, या घटनेमुळे अकोला जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून प्रशासनाने तात्काळ ठोस पावले उचलावीत, अशी आग्रही मागणी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

यावेळी बबनराव चौधरी, प्रदीपकुमार वखारिया, कपिल रावदेव, तश्वर पटेल, मो. युसुफ मो. इलियास, विजय पचारे, मोहम्मद इरफान, शे. इब्राहिम शे. कासम, याकूब खान, हुसेन चौधरी, मोईन खान, मेहबूब खान, आर्किटेक निलोफर खान सोहेल खान, निखत शाहीन अहमद कुरेशी, कनिश खातून मो. इलियास, आर्शिया परवीन मो. शारिक, सैय्यद यासीन, शेख अब्दुल्लाह, सैय्यद अहमद, सैय्यद शहजाद सज्जू भाई यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## आ. साजीद खान पठाण यांच्या सुरक्षावाढीसाठी निवेदन

### राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाची पोलीस अधीक्षकांकडे मागणी



**अकोला :** अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण यांना मिळालेल्या जीवे मारण्याच्या धमकीच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या सुरक्षेत तात्काळ वाढ करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) अकोला पश्चिमच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात अकोला पोलीस अधीक्षक कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, आमदार पठाण यांना मिळालेली धमकी ही अत्यंत गंभीर बाब असून त्यामुळे जनप्रतिनिधींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अशा प्रकारच्या धमक्यांमुळे परिसरातील कायदा व सुव्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. अलिकडील काळात विविध गुन्हेगारी टोळ्यांकडून, विशेषतः कथित बिश्नोई गँगकडून दिल्या जाणाऱ्या धमक्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले.

आमदार पठाण यांना तात्काळ उच्चस्तरीय सुरक्षा देण्यात यावी तसेच त्यांच्या सुरक्षा श्रेणीत वाढ करून 'वाय प्लस' सुरक्षा देण्यासाठी शासन स्तरावर प्रस्ताव सादर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच धमकी देणाऱ्या संबंधित व्यक्ती किंवा टोळीविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करावी व संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून आवश्यक असल्यास राज्य व केंद्रीय गुप्तचर यंत्रणांशी समन्वय साधावा, अशीही मागणी करण्यात आली.

'जनप्रतिनिधींची सुरक्षा ही लोकशाहीची सुरक्षा आहे. त्यामुळे या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने ठोस पावले उचलावीत,' असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. हे निवेदन कार्याध्यक्ष सैयद युसुफ अली यांच्या अध्यक्षतेखाली पश्चिम विधानसभा अध्यक्ष महेमुद खान पठाण, अल्पसंख्यांक शहर अध्यक्ष वसीम खान, पप्पू खान, आवेज खान, युसुफ बेग, अमीन खान, आसिफ भाई आदी पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सादर करण्यात आले.

### पोलिस स्टेशनला बरिकेट्स चे वितरण

**अकोला :** सहकार क्षेत्रासोबतच सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या गोदावरी नागरी सहकारी सोसा.च्या स्थानीक शाखेच्या वतीने पोलीस ठाण्यांना रहदारी व बंदोबस्त च्या दृष्टीकोणातून बॅरिकेट्स वितरित करण्यात आलेत.


**जाहीर नोटीस**

**दिवाणी न्यायालय क. स्तर बाळापुर**
**दयानंद मारुती वाघमारे यांचे न्यायालयात**
**सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर बाळापुर, बाळापुर, अकोला.**

दिवाणी किरकोळ अर्ज/३८/२०२६
श्रीमती कोकिळा रवींद्र बदरखे वि. कोणीही नाही
पुढिल तारिख : ३०-०३-२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती. कोकिळा रविंद्र बदरखे वय अं४७वर्ष धंदा घरकाम २. राधिका रविंद्र बंदरखे वय अं२४वर्ष धंदा शिक्षण ३. आदित्य रविंद्र बदरखे वय अं२२ वर्ष धंदा शिक्षण अर्जदार क १ ते ३ रा हनुमान मंदिर जवळ, निमकर्दा ता. बाळापूर जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार : निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन अॅक्ट VIII १८२७ अंतर्गत वारस प्रमाणपत्र मिळणे करीता वि.न्यायालयामध्ये अर्ज केला आहे. मय्यत रविंद्र रामभाउ बदरखे दिनांक ०५.१२.२०२५ रोजी मौजे निमकर्दा ता. बाळापूर ता. अकोला येथे मरण पावले. मय्यत देवकाबाई रामभाउ बदरखे हे दिनांक १०.०४.२०२१ रोजी मरण पावल्या. वरील नमुद अर्जदार हे मय्यत रविंद्र रामभाउ बदरखे यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक ३०/०३/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक ०२.०२.२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का
**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय क. स्तर, बाळापुर

**जाहीर नोटीस**

**विद्यमान दिवाणी न्यायालय (क. स्तर), तेल्हारा यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५४/२०२६ — प्रोसेस नं.१२८/२०२६
चौ.ता. २३/०३/२०२६ — दिनांक : ०३/०२/२०२६

**अर्जदार :** १. रत्नप्रभा अर्जुन गवळी वय ५२ वर्षे, धंदा - घरकाम २. वनीता भास्कर टपके वय ४३ वर्षे, धंदा - घरकाम ३. सुनीता सुभाष बोदडे वय ३६ वर्षे, धंदा - घरकाम ४. रेश्मा प्रकाश फुकट वय ३३ वर्षे, धंदा - घरकाम ५. संगीता स्वप्नील घावट वय ३१ वर्षे, धंदा - घरकाम अर्जदार क. १, ५ रा. कार्ला बु., ता. तेल्हारा, जि. अकोला अर्जदार क्र. २ रा. हनवाडी, ता. अकोट, जि. अकोला अर्जदार क्र. ३ रा. दहीहांडा, ता. अकोट, जि. अकोला अर्जदार क्र. ४ रा. वडाळी देशमुख, ता. अकोट, जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही.

ज्याअर्थी वरील अर्जदार क्र. १ ते ५ नुसार मुंबई रेग्युलेशन अॅक्ट अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर तेल्हारा यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. अर्जदार क्र. १ यांचे पती, अर्जदार क्र. २ ते ५ यांचे वडील मयत नामे अर्जुन सदाशिव गवळी हे दि. २०/१२/२०२५ रोजी मौजे कार्ला बु., ता. तेल्हारा, जि. अकोला येथे मरण पावले त्यामुळे अर्जदार हेच कायदेशीर वारस असून इतर कोणतेही वारस नाहीत.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक २३/०३/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक ०३/०२/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का
**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क स्तर, तेल्हारा

**जाहीर नोटीस**

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २६०/२०२६ — प्रोसेस नं.२५५३/२०२६
चौ.ता. ०२/०४/२०२६ — दिनांक : २३/०२/२०२६

**अर्जदार :** १. अब्दुल लतिफ अब्दुल अझिझ कुरेशी रा. मोमीनपुरा मस्जिद जवळ, मोमीनपुरा, अकोला, ता. जि. अकोला. २. रफिकुन्निसा अब्दुल गफ्फार कुरेशी रा. काझी काटोल जवळ, गौस नगर, अमरावती. ता. जि. अमरावती. ३. रझिया बानो अब्दुल रझाक रा. मस्जिद जवळ, कुरेश नगर, सुर्जी, पोस्ट अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती. ४. सलिम अहमद अब्दुल अझिझ कुरेशी रा. खोजा जमात खाना जवळ, खंगारपुरा, अकोला. ता. जि. अकोला. ५. कलिम अहमद अब्दुल अझिझ कुरेशी रा. लाल बंगला, छोटी मस्जिद जवळ, बैदपुरा, अकोला. ता. जि. अकोला. ६. नसरीन बानो अझिझ कुरेशी रा. लाल बंगला, बैदपुरा, अकोला. ता. जि. अकोला. ७. मोहम्मद अजाझ अहमद अब्दुल अझिझ कुरेशी रा. सागर बेकरी च्या बाजूला, कलाल की चाल, अकोला, ता. जि. अकोला. ८. रियाज अहमद अब्दुल अझिझ कुरेशी रा. लाल बंगला, बैदपुरा, अकोला. ता. जि. अकोला. ९. फिरोज अहमद अब्दुल अझिझ कुरेशी रा. खंगारपुरा, तेलीपुरा चौक, अकोला. ता. जि. अकोला. १०. अफरोज अहमद अब्दुल अझिझ कुरेशी रा. छोटी मस्जिद जवळ, लाल बंगलो, बैदपुरा, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : १. अब्दुल अझिझ अब्दुल रहिम कुरेशी २. हसानुर यी अब्दुल अझिझ करेशी

**पत्ता :-** रा. मोमीनपुरा मस्जिद जवळ, मोमीनपुरा, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्धीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अब्दुल अझिझ अब्दुल रहिम कुरेशी यांचे दि. ०३/०८/२०२३ रोजी अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत हसानुर बी अब्दुल अझिझ कुरेशी यांचे दि. १९/०२/२०२१ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०२/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर समन्स**

**मा. न्यायाधीश, सहकार न्यायालय, अकोला यांचे न्यायालयात**

ज्याअर्थी **मयत बबन गुलाबराव शेळके** यांचा मृत्यू दि.**२७.१०.२०१३** रोजी शिवाणी रसुलापुर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे **अर्जदार १ ही पत्नी आहे व नं.२ हा मुलगा असून अर्जदार नं.३ ही मुलगी आहे.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **५ फेब्रुवारी २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
मा.दिवाणी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 122 / 25 **कलम** - 22

सार्वजनिक न्यासाचे नांव व **कौतीकाई बहुउद्देशीय संस्था, प्लॉट नं.४७-ए पराग टाऊनशिप, देशमुख लॉनजवळ, शेगाव-रहाटगांव र ा ड , अमरावती**

नोंदणी क्रमांक **एफ-२९१३३**

बाबत अर्जदार - **शंकर राजपाल ठाकरे**

**गैरअर्जदार -** १) डॉ.बाळासाहेब नारायणराव बेडोदेकर २) प्रफुल लहानुजी दाभाडे ३) रुपाली अमोल खंडारे, ४) अनिकेत लक्ष्मणराव देवडेकर

या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक १८.०२.२०२६ रोजी दिली.

शिक्का
**अधीक्षक,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती विभाग, अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२६७/२०२६
**कमल चौधरी अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.२०.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Kamal Vasantrao Chaudhari, Age 74 Yrs. Occu.: Nil
2. Shrikant Vasantrao Chaudhari, Age 37 Yrs. Occu.: Labour Both R/o Near Amba Gate, Patvipura, Amravati.
3. Shriram Vasantrao Chaudhari, Age 36 Yrs. Occu.: Labour R/o Matakhidki Road, Inside Amba Gate, Patvipura, Dist. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Vasant Dattusa Chaudhari हे दिनांक 06.04.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Kamal Vasant Chaudhari + 2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Kamal Vasant Chaudhari + 2 वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२१.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१८६/२०२६
**श्रीमती ऐश्वर्या -वि- गैरअर्जदार आशा**
पुढील ता.१०.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Smt.Aishwarya Rupesh Mehare, Age 26 Yrs. Occu.: Household R/o Janta Colony, Gopal Nagar, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** 1. Smt.Asha Namdev Mehre, Age 61 Yrs. Occu.:Household R/o Mangal Murti Apartment 303, Near Bhatkuli Tahsil Commissioner Colony, Camp Amravati. At present : Janta Colony, Gopal Nagar, Amravati.

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **रुपेश नामदेवराव मेहरे** हे दिनांक 13.07.2023 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **ऐश्वर्या विरुध्द गैरअर्जदार आशा** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **ऐश्वर्या विरुध्द गैरअर्जदार आशा** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१२.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

प्रो.क्र.२५४/२०२५

## वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस

**मा.विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्रमांक ६८/२०२६ | ने.ता.३०.०३.२०२६

**अर्जदार :**
1. Babanrao Kashinath Khorgade, Age 79 Yrs. Occu.: Labour R/o. Sawarkheda, Tq. Bhatkuli, Dist. Amravati
2. Sumanbai Devidasrao Tipare, Age 72 Yrs. Occu.: Household R/o. Sawarkheda Haturna Tq. Bhatkuli, Dist. Amravati
3. Shalutai Dadarao Gawande, Age 68 Yrs. Occu.: Household R/o Chandrawati Nagar, Sai Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati
4. Ekanath Kashinath Khorgade, Age 69 Yrs. Occu.: Labour R/o. Sawarkheda Haturna Tq. Bhatkuli, Dist. Amravati
5. Shakuntala Vishwas Buraghate, Age 67 Yrs. Occu.: Household R/o Near India Gandhi Putala, Jevad Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati
6. Latabai Sureshsingh Thakur, Age 54 Yrs. Occu.: Household R/o Near Saroj Colony, Sutgirni Road, Jay Nagar, Amravati Tq. & Dist. Amravati
7. Lata Narayan Kadu, Age 53 Yrs. Occu.: Household R/o Devara, Tq. & Dist. Amravati
8. Jagannath Kashinath Khorgale, Age 51 Yrs. Occu.: Labour R/o Dastur Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदारः-** **Nil**

ज्यापेक्षा **Kashinath Tukaram Khorgade** हे दि.**०५.०७.१९९८** रोजी मयत झाले आणि **Vachhalabai Kashinath Khorgade** हे दि.**३०.०८.२०१८** रोजी मयत झाले.अर्जदार **Babanrao Kashinath Khorgade, Age-79 yrs, Occu- Labour, R/o. Sawarkheda, Tq. Bhatkuli, Dist. Amravati** व इतर यांनी **बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २ प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता** या न्यायालयामध्ये दि.**११.०२.२०२६** रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत **Kashinath Tukaram Khorgade** आणि **Vachhalabai Kashinath Khorgade** यांचे वारस आहेत.ते सदरहू अर्जदार फक्त मयत **Kashinath Tukaram Khorgade** आणि **Vachhalabai Kashinath Khorgade** यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक १८.०२.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का
आदेशान्वये,
सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर,भातकुली
दि.१८/०२/२०२६

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.८४/२०२६ | ने.ता.१७.०३.२०२६

**अर्जदार -**
१. श्रीमती सुमन सुधाकरराव धुताले, वय ५८ वर्षे, धंदा - घरकाम
२. श्री रोशन सुधाकरराव धुताले, वय ४० वर्षे, धंदा - मजुरी
३. श्री अमित सुधाकरराव धुताले, वय ३६ वर्षे, धंदा - मजुरी
सर्व रा. रुख्मीणी नगर, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती
४. सौ.स्वाती विलासराव गाठे, वय ३८ वर्षे, धंदा - घरकाम
रा.वावरुळी, ता.वरुड, जि.अमरावती ह.मु.यवतमाळ

-- विरुध्द --
**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती न अर्जदार नं.२ ते ४ चे वडिल नामे **सुधाकर भगवानजी धुताले** हे दि.**०३.११.२०२५** रोजी मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०१.०२.२०२६

शिक्का
आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक २०.०२.२०२६

आज दि.२०.०२.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **ममता फगनू इवने** अर्जात नमूद जन्म दिनांक **२६.०८.१९९३** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **सांभोरा** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **जन्म नोंदीबाबत अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).
४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशी करुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) श्री.शिवानंद ए.मदने (सरपंच) | १) शिवानंद ए.मदने (सरपंच) |
| २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) | २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) |
| ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) | ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) |
| ४) श्री.दादाराव शा.इवनाते (पो.पा.) | ४) श्री.दादाराव शा.इवनाते (पो.पा.) |
| ५) श्री.अशोक मो.उईके (मा.सरपंच) | ५) श्री.अशोक मो.उईके (मा.सरपंच) |

शिक्का
**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२२३/२०२६
**निलकंठ बांबल अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.१२.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Nilkanth Janrao Bambal, Age 70 Yrs. Occu.: Retd.Officer R/o Plot No.7, Behind Atul Mangal Karyalaya, Rukhmini Nagar,Amravati
2. Sau.Saronani W/o Diwarkar Ghate, Age 64 Yrs. Occu.: Household R/o C/o Diwakar Ghate, Ambika Nagar, Digras, Tq.Dist.Yavatmal

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Janrao Kelaji Bambal हे दिनांक 21.10.2023 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. तसेच Dwarkabai Janraoji Bambal ही दिनांक 31.12.2015 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. आणि Najukrao Janrao Bambal हे दिनांक 29.01.2023 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Nilkanth Janrao Bambal + 1 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Nilkanth Janrao Bambal + 1 वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक **१८.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३०४/२०२६
**भाग्यलता व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०१.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Bhagyalata Uday @ Udaykumar Raut, Age 69 Yrs. Occu.: Housewife
2. Atul Udaykumar Raut, Age 50 Yrs. Occu.: Business Both R/o 12, Muktai Yadav Layout Ring Road, Near Arun Colony, V.M.V.Amravati. Tq. Dist. Amravati
3. Shirish Udaykumar Raut, Age 47 Yrs. Occu.: Labour Appli.No.1 to 3 R/o Malipura, Nandgaon Peth, Tq. Dist. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत उदयकुमार तुळशिरामजी राऊत** हे दिनांक 18.12.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **भाग्यलता व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **भाग्यलता व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२०.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन अमरावतीचे आंदोलन

# आज मराठी शाळा वाचविण्यासाठी पालक व विद्यार्थ्यांचा मोर्चा

**अमरावती/का.प्र.**

शिक्षण हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांच्या घरापासून १ किलोमीटरच्या आत प्राथमिक शाळा, ३ किलोमीटरच्या आत उच्च प्राथमिक शाळा व ५ किलोमीटरच्या आत माध्यमिक शाळा असणे बंधनकारक आहे. तरीसुद्धा हा कायदा मोडून आजचे सरकार २० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळा बंद करीत आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या नावाखाली गावातील शाळा बंद पाडण्यासाठी 'शाळा संकुल' ही नवी रचना सरकार समोर आणत आहे. ज्यामध्ये विद्यार्थ्यांच्या घरापासून शाळा ३० किलोमीटर पर्यंत दूर फेकली जाईल. शाळा संकुलामुळे अवघ्या ५ वर्षात देशातील ८ लाख ५० हजार विद्यार्थ्यांचे प्राथमिक शिक्षण बंद झाले. महाराष्ट्रातील ३०,७५४ विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद झाले. ज्यामध्ये १५,३५७ मुलींचा समावेश आहे. यामुळे असंख्य शिक्षक अतिरिक्त ठरत आहेत.



महाराष्ट्रात जवळपास १८,००० शाळा बंद होत आहेत. अमरावती जिल्ह्यातील १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या २२५ शाळांचा यामध्ये समावेश आहे. व या बंद होणाऱ्या सर्व शाळा ग्रामीण दुर्गम भागातील आदिवासी व बहुजन लोक राहत असलेल्या गावातील आहे.दुसरीकडे, खाजगी शाळांची संख्या वाढवून तिथे भरमसाठ फी आकारली जात आहे. त्यामुळे गरीब विद्यार्थ्यांचे शिक्षण यापुढे अशक्य होईल. भारतातील प्रत्येक राज्याला स्वतःचे शिक्षण धोरण आखण्याचे, नियंत्रण व संचालन करण्याचे अधिकार संविधानाच्या २४६ कलम व सूची ७ प्रमाणे दिले आहेत. परंतु महाराष्ट्र सरकारने केंद्रापुढे शरणागती पत्करून महाराष्ट्राच्या १३ कोटी जनतेचे भविष्य अंधारात लोटले आहे.अशा बेजबाबदार व मुजोर सरकारला जाब विचारण्याची वेळ आता आली आहे.तरी सर्व गावकरी, ग्रामपंचायत, पालक, विद्यार्थी व शिक्षक सर्वजण मिळून पटसंख्येच्या आधारावरील शाळा बंदीला कडाडून विरोध करू. आपल्या गावची शाळा बंद होण्यापासून रोखू या.यासाठी २५फेब्रुवारीला सकाळी ११वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ईर्विन चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे.या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन, जिल्हा अमरावतीचे प्रतिक्षा ढोके,धिरज बनकर,सुप्रिया राऊत,दिप सावळे,कैलास चव्हाण यांनी केले आहे.या मोर्चात शिक्षक,सेवानिवृत्त शिक्षक,शिक्षणप्रेमी सहभागी होणार आहे.

**प्रमुख मागण्या**

राज्यातील कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याचा निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा,पटाच्या आधारावर शिक्षकांची संख्या ठरविणारे धोरण रद्द करण्यात यावे,दत्तक शाळा योजना रद्द करून शासनानेच शाळांची जबाबदारी घ्यावी,सर्व शिक्षण संस्थांमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदभरती तातडीने घेण्यात यावी,शिक्षकांना अध्यापना व्यातिरिक्त इतर कोणतेही कामामध्ये गुंतवू नये,संचमान्यता शासन निर्णय दि. १५ मार्च २०२४ तसेच कमी पटसंख्येच्या नावाखाली शाळा बंद (समायोजित) करण्याचे धोरण रद्द करून बालकांच्या शिक्षणाची हेळसांड थांबवावी,शिक्षकांना टीईटी परीक्षा अनिवार्य केल्याचे निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावे, सार्वत्रिक शिक्षण हक्क (ऊँ) कायद्यान्वये शाळांमध्ये भौतिक व शैक्षणिक सुविधा (प्रयोगशाळा, ग्रंथालय, खेळाचे साहित्य, प्रशस्त हवेशीर वर्गखोल्या, शौचालय, कम्प्युटर लॅब, इंटरनेटची सुविधा इत्यादी.) उपलब्ध करण्यात यावे, शाळांना गरजेनुसार आवश्यक निधी देण्यात यावा, शालेय पोषण आहारामध्ये सुधारणा करण्यात यावी व गुणवत्तापूर्ण जेवन विद्यार्थ्यांना देण्यात यावे, शिक्षणावर उअ‍ङ च्या ६३ खर्च झालाच पाहिजे.केरळ राज्याप्रमाणे महाराष्ट्रातही पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्णपणे मोफत करण्यात यावे. आदी विविध मागण्या करण्यात यावे.

## पीडीएमसी येथे अत्याधुनिक सुक्ष्मजीवशास्त्र संग्रहालयाचे उद्‌घाटन



**अमरावती -** श्री शिवाजी शिक्षण संस्था व्दारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय येथील सुक्ष्मजीवशास्त्र विभागात डिजीटल संग्रहालयाचे उद्‌घाटन संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धनजी प्र. देशमुख यांच्या शुभहस्ते व संस्थेचे पदाधिकारी अ‍ॅड. गजाननराव पुंडकर, अ‍ॅड. जयवंत उपाख्य भैय्यासाहेब पाटील (पुसदेकर),केशवराव मेतकर, दिलीपबाबू इंगोले,सुरेशराव खोटरे, प्रा. सुभाषराव बनसोड, संस्थेचे आजीवन सभासद तथा स्वतंत्र विकास समितीचे सदस्य डॉ. प्रभाकरराव काळमेघ, डॉ. विरेंद्र वसु, डॉ. विजयराव बोंडे, डॉ. निळकंठ यावलकर, अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख, विभाग प्रमुख डॉ. प्रमोद भिसे, वैद्यकीय अधिक्षक डॉ. पवन टेकाडे, प्रशासकीय अधिकारी डॉ. स्वप्नील मोहोड यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.वैद्यकीय शिक्षण अधिक प्रभावी व प्रात्यक्षिकाधिष्ठित व्हावे या उद्देशाने महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागात डिजीटल सुक्ष्मजीवशास्त्र संग्रहालयाची स्थापना करण्यात आली आहे. या संग्रहालयामध्ये जीवाणूशास्त्र, विषाणूशास्त्र, पॅरासीटॉलॉजी, मायक्रोलॉजी, इम्युनॉलॉजी, मॉलिक्युलर मायक्रोबायोलॉजी या विषयांशी संबधित संरक्षित नमुने, विविध मॉडेल्स, चार्ट्स, छायाचित्रे, कल्चर प्लेटस्, रंगीकरण स्टेनिंग पध्दती तसेच दृक-श्राव्य साधने उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

हे संग्रहालय पदवी व पदव्यूत्तर विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त अध्ययन केंद्र ठरणार असून, विद्यार्थ्यांना विषयाचे दृश्यात्मक व प्रत्यक्षज्ञान मिळण्यास मदत होणार आहे.उद्‌घाटनाप्रसंगी महाविद्यालयीन प्राध्यापक, शिक्षक,पदव्युत्तर व पदवी विद्यार्थी तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे यशस्वीतेकरीता सुक्ष्मजीवशास्त्र विभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, टेक्निशिअनस् व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## संक्षिप्त



### ग्रामपंचायतमध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी

**शिराळा :** येथील ग्रामपंचायत मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. सर्व प्रथम रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन माल्यार्पण कृउबास संचालक तथा ग्रामपंचायत सदस्य मिंलिदभाऊ तायडे व ग्रामविकास अधिकारी अनितााताई नवले यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांची गरज आहे असे प्रतिपादन मिंलिंदभाऊ तायडे यांनी केले. तसेच ग्रामविकास अधिकारी अनितााताई नवले यांनी सुध्दा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयी मनोगत व्यक्त केले. यावेळी कृउबास संचालक मिंलिदभाऊ तायडे व ग्रामविकास अधिकारी अनितााताई नवले, तसेच ग्रामस्थ वायरमन भास्कर राऊत व ग्रामपंचायत कर्मचारी योगेंद्र तायडे मधुकरराव खेडकर रविंद्र मोहोड प्रविण भागवत दिनेश मुंदाने, निखिल गावंडे उज्वला मोहोड कुसटकर आदी उपस्थित होते.

### संत गाडगे महाराज यांच्या नविन मुर्ती स्थापन सोहळा

**कुऱ्हा-** स्वच्छताचे पुजारी,वैराग्यमुर्ती, जनकल्याणसाठी झटणारे



महाराष्ट्रातील राज्यातील प्रत्येक्ष परिस्थितीचे चित्रण रेखाटनारे किर्तनकार,संत समाजसुधारक आणि लोकजागृती समाज प्रबोधनकार स्व.मा.गाडगे बाबा यांची १५०व्या जयंती उत्सव निमित्ताने मारडा गावातील जय गुरुदेव मंदीर मारडा येथील व गावातील आजुबाजुचा परिसर स्वच्छता करतांना संजय शा.टेकाडे,रामरावजी साऊतकार,सुनिल जिरापुरे,गजानन साऊतकार,अंबादास गायकवाड, नरेंद्र साऊतकार,अशोकराव पाटील,बबनराव झोडेकर,नंदकिशोर ना.जिरापुरे, ज्ञानेश्वर झोडेकर,विनायक झोडेकर, प्रफुल्ल गायकवाड समस्त मा.गाडगे महाराज मित्र मंडळी व समस्त मारडा गावकरीच्या सहकार्याने स्वच्छता अभियान राबविण्यात आले.त्यांनंतर कर्मयोगी मा.संत गाडगे महाराज यांच्या नविन मुर्ती सोहळा भंजन दिडी सोहळ्याने पार पाडुन हुनुमान मंदीर येथे स्थापन मा.कर्मयोगी गाडगे बाबा यांची मुर्ती स्थापन सोहळा पार पडला.

# मयुरी बारीचा दुहेरी गौरव

**अमरावती/का.प्र.**




संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या ४२ व्या दीक्षांत समारंभात श्री शिवाजी कला व वणिज्य महाविद्यालयाची मास्टर ऑफ जर्नालिजम अ‍ॅड मास कम्युनिकेशन विभागाची विद्यार्थीनी मयुरी गणपत बारी हिला पत्रमहर्षी बाळासाहेब मराठे सुवर्ण पदक, श्री.पी.के.उपाख्य अण्णासाहेब देशमुख अमरावती स्वर्ण पदक देऊन गौरविण्यात आले.या कार्यक्रमाला सर्वोच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश भूषण गवई, महात्मा गांधी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, माजी प्र-कुलगुरू डॉ. व्ही.एस. जामोदे, डॉ. प्रसाद वाडेगावकर, माजी कुलसचिव डॉ.वंदन मोहोड, प्रा. सी.डी.देशमुख, डॉ. बी.आर.वाघमारे, डॉ. तुषार देशमुख तसेच डॉ. श्वेता मिलींद बारहाते, प्रा. स्वाती महेंद्र ढोरे व ओजस्विनी अविनाश असनारे तसेच एन.सी.सी.चे अधिकारी, शासकीय अधिकारी, विविध संस्थांचे पदाधिकारी, विद्यापीठाच्या विविध प्राधिकारिणींचे सर्व सदस्य, शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी, पाचही जिल्ह्यातील गुणवत्ताधारक विद्यार्थी, आचार्य पदवीधारक, महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक याशिवाय शहरातील गणमान्य नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. तिने या यशाचे श्रेय प्राध्यापकांसह आई-वडिल व भावंडांना दिले आहे. तिच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

## श्रीमती नरसम्मा महाविद्यालयात गाडगेबाबा जयंती



**अमरावती/का.प्र.**

श्रीमती नरसम्मा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय किरण नगर अमरावती, येथे नुकतेच गाडगेबाबा जयंतीनिमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी कर्मयोगी संत गाडगेबाबांच्या प्रतिमेला हारार्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश चंदनपाट यांनी गाडगेबाबांची दशसूत्री तसेच गाडगेबाबांच्या जीवनकार्याचा परिचय उपस्थितीतांना करून दिला.गाडगेबाबांचा स्वच्छता विषयक दृष्टिकोन व त्याचे महत्त्व तसेच त्यांनी कीर्तनाच्या माध्यमातून केलेली समाजजागृती, व्यसनमुक्ती संदर्भातील कार्य अतिशय मौलिक स्वरूपाचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.गाडगेबाबांचे विचार प्रत्येकांनी आचरणात आणण्याची गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाचे आयोजन अभ्यासेतर उपक्रम समिती आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

## राममंदिर परिसरात संत गाडगेबाबा जयंती निमित्त स्वच्छता अभियान

**शिराळा-** येथील राममंदिर परिसरात संत गाडगेबाबा यांची जयंती गाव स्वच्छ करून करण्यात आली. सर्व प्रथम संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण मान्यवरांनी केले. गांधी चौक राममंदिर परिसरात झाडुने परिसर स्वच्छ करण्यात आला.

यावेळी कृषी सहायक मारोती जाधव, राजेश भोवाळु, अरुणभाऊ देशमुख, ज्ञानेश्वर वानखडे, गजानन गवळी, सुबोध अनिल घायर, रामरावजी दहापुते, त्र्यंबकराव साखरवाडे, संजय गोमकाळे गोपाल भोवाळु गोपाल ठाकरे गजानन महाराज ठाकरे आदी उपस्थित होते.



# नेरपिंगळाईचे कुटूंब देहदानरत्न पुरस्काराने सन्मानीत

**लेहेगाव/वार्ताहर**

कापूस तळणी येथील श्री संत गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्था यांच्या सभागृहात राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या १५० व्या राष्ट्रीय जयंतीनिमित्त देहदान करणाऱ्या नेरपिंगळाई (ता. मोर्शी) येथील कुटुंबांचा अत्यंत भावपूर्ण सन्मान सोहळा पार पडला. सभागृहातील वातावरण दुःख आणि अभिमानाच्या भावनांनी भारावून गेले होते. आपल्या जिवलग व्यक्तीच्या जाण्यानंतरही त्यांच्या देहातून समाजाला जीवन देण्याचा महान निर्णय घेणाऱ्या कुटुंबांना 'देहदान कुटुंब रत्न – २०२६' पुरस्कार प्रदान करण्यात आला. कुटुंबांमध्ये विशाल क्रांतिकुमार मंगळे यांनी आपल्या आजोबा भाई उर्फ नथुजी देवाजी मंगळे यांच्या निधनानंतर देहदानाचा निर्णय घेत मानवतेचा दीप प्रज्वलित ठेवला. नरेश ओंकारराव कुऱ्हेकर यांनी आपल्या वडिलांच्या देहदानाचा निर्णय घेत समाजासमोर आदर्श निर्माण केला.एका देहदानातून अनेक डॉक्टर घडतील, संशोधनाला दिशा मिळेल आणि अनेक कुटुंबांना जीवनदानाची आशा



प्राप्त होईल, ही भावना उपस्थितांच्या मनाला खोलवर स्पर्शून गेली.देहदान हा केवळ वैद्यकीय निर्णय नसून मानवतेचा सर्वोच्च त्याग आहे.कार्यक्रमाचे आयोजन पक्षीमित्र अरुण वामनराव शेवाणे, संस्थापक अध्यक्ष – श्री संत गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्था, कापूस तळणी यांच्या पुढाकाराने करण्यात आले. सचिव दयाराम वामनराव शेवाणे यांच्या सहकार्याने हा सोहळा यशस्वीरीत्या पार पडला.या कार्यक्रमात लोकमतचे तालुका प्रतिनिधी अंजनगाव सुर्जी येथील अ‍ॅड. सुदेश मोरे होते. मार्गदर्शक म्हणून डॉ. प. दे. रुग्णालय, अमरावती येथील HOD Anatomy डॉ. दिपाली विधळे उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून श्री संत गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्था, कापुसतळणीचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वरराव झि.शेठे, सत्यपाल महाराज यांचे शिष्य संदीपपाल महाराज गीते तसेच प्रा. दिलीपदादा काकडे उपस्थित होते.नेरपिंगळाई येथील या कुटुंबांनी दाखवून दिले की मृत्यू हा शेवट नसतो — तो नव्या जीवनाचा प्रारंभ असतो. त्यांच्या या निर्णयामुळे परिसरात मानवतेचा दीप अधिक तेजाने प्रज्वलित झाला असून समाजात देहदानाबाबत जागरूकतेची नवी लाट निर्माण झाली आहे.

# रायसोनी विद्यापीठातर्फे 'विद्यार्थी सुरक्षा जनजागृती शिबीर

## जिल्हा परिषद कन्या शाळा येथे आयोजन

**अंजनगाव बारी/का.प्र.**

जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा अंजनगाव बारी येथे जी. एच. रायसोनी विद्यापीठा तर्फे विद्यार्थी सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना व POSCO कायदा मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.यासाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ.वामणे न्यायाधीश तथा सचिव डीएलएसए, प्रमुख अतिथी डॉ.निता नाथ डीन जीएच रायसोनी कॉलेज ऑफ लॉ, डॉ. रंजन दुबे एचओडी, डॉ.कोमल खोजणे प्राध्यापिका, संदीप मेटे, रमेश गोटखडे, शाळेच्या मुख्याध्यापिका विजया झाडे, शाळेतील ज्येष्ठ शिक्षक रामेश्वर सर्गीय, किशोर मालोकार, रेशमा वांगे उपस्थित



होते. तसेच केंद्राचे केंद्रप्रमुख मोहन जाधव हे सुद्धा उपस्थित होते.

सर्वप्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व रायसोनी विद्यापीठाचे संस्थापक यांच्या फोटोंचे पूजन व हारार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.त्यानंतर या चर्चा सत्राला न्यायाधीश डीएलएसए डॉ.वामणे यांनी POSCO कायद्याचे सविस्तर मार्गदर्शन केले, प्राध्यापक डॉ. रंजन दुबे यांनी सुरक्षा उपाययोजना संदर्भात मार्गदर्शन केले. तसेच शाळेच्या उच्च श्रेणी मुख्याध्यापिका विजया झाडे यांनी विद्यार्थी सुरक्षेबाबत पालकांनी घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले. तसेच लॉ-कॉलेज च्या विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन केले व विद्यार्थिनींशी संवाद साधला. एक छोटी नाटिका मुलांसाठी सादर केली. त्यातून Good Touch- Bad Touch समजाऊन दिले. तसेच पालकांना कायद्याची माहिती असलेले पत्रके वाटली.यावेळी लॉ-कॉलेजचे विद्यार्थी व पालकवर्ग मोठ्या संख्येने पालक उपस्थित होता.पालकांना POSCO विषयक व अत्याचार विषयक जागरूक करण्याचे काम या कार्यक्रमातून केले गेले. कार्यक्रमाचे संपूर्ण आयोजन लॉ-कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी केले. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वितेकरीता संगीता इंगळे, अर्चना कुऱ्हाडे तसेच सर्व शिक्षकांनी मेहनत घेतली.लॉ-कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी मुलींना चॉकलेट वाटप करून व पालकांना नाश्ता देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लॉ-कॉलेजच्या विद्यार्थिनीने केले व आभार प्रदर्शन प्राध्यापक रमेश गोटखडे यांनी केले.

## विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतग विद्यार्थ्यांचा योग व निसर्गोपचार संबंधी अभ्यास दौरा

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत येणा-या पी. जी. डिप्लोमा इन योग थेरपी या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकरिता हरिद्वार येथे अभ्यास दौ-याचे आयोजन करण्यात आले आहे दि. २४ फेब्रुवारी ते ०२ मार्च या कालावधीत सदर आयोजित करण्यात आला असून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून योग व निसर्गोपचार पध्दतीचे सखोल ज्ञान मिळावे, या उद्देशाने या अभ्यास दौ-याचे आयोजन करण्यात आले आहे.

अभ्यास दौ-यादरम्यान हरिद्वार येथील गायत्री शक्तीपीठ, देव संस्कृती विश्वविद्यालय, परमार्थ निकेतन येथे भेट देऊन विविध आध्यात्मिक आणि शैक्षणिक अशा विविध प्रकारचे शिक्षण, साधना तसेच संशोधनकार्य करता येते. देव संस्कृती विश्वविद्यालय, हरिद्वार येथे योग, ध्यान, वेद, संस्कृत, अध्यात्मिक विज्ञान, भारतीय तत्त्वज्ञान आणि आयुर्वेद शिकण्याचे ठिकाण आहे. परमार्थ निकेतन ऋषिकेश येथे योग, ध्यान, पर्यावरण संवर्धन व गंगा आरती यासारख्या सांस्कृतिक उपक्रमांचा अभ्यास करण्याकरिता प्रसिध्द आहे.गायत्री शक्तीपीठ येथे गायत्री मंत्र, यज्ञशास्त्र, आध्यात्मिक साधना आणि समाजसेवेवर आधारित जीवन तत्त्वज्ञान शिकता येईल. विद्यार्थी रोजगाराभिमुख होऊन स्वतःचे स्वयंरोजगारासाठी तयार होतील.कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांची प्रेरणा व विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांच्या मार्गदर्शनात पी जी डिप्लोमाइन योग थेरपी या अभ्यासक्रमाच्या समन्वयक प्रा. राधिका खडके तसेच प्रा. आदित्य पुंड, डॉ. अनघा देशमुख यांच्या नेतृत्वात या अभ्यास दौ-याचे आयोजन करण्यात आले आहे.

GHARIKUL Masale
**पाहिजेत**
**ब्रँडेड अगरबत्ती घरोघरी विक्रीकरिता महिला व पुरुष पाहिजे.**
**: संपर्क :**
**घरकुल मसाले फॅक्टरी,**
**एमआयडीसी. अमरावती**

# अंजनगाव-आकोट महामार्गावर एसटी बस व कारचा भीषण अपघात

## एक ठार, नवविवाहित दाम्पत्यासह सहा जखमी

**अंजनगाव सुर्जी/ प्रतिनिधीः-** अंजनगाव-आकोट महामार्गावरील




भंडाराज येथे आज (दि.२४) दुपारी चार वाजताच्या दरम्यान एसटी बस व कारचा भीषण अपघात झाला. यात एकाचा जागीच मृत्यू झाला असून अन्य सहा जन गंभीर जखमी आहेत.

अधिक माहितीनुसार, अंजनगाव सुर्जी येथून आकोटकडे जाणाऱ्या राज्यमहामार्ग क्रमांक ५७२ वरील भंडारज येथे सोमवारी दुपारी चार वाजता एसटी महामंडळाची बस क्रमांक एमएच २० जीसी ३९३२ ही बस आकोट कडे जात होती. दरम्यान समोरून भरधाव येणारी कार क्रमांक एमएच २७ जीई ८०८१ येत असतांना दोन्ही वाहनांची समोरासमोर धडक होऊन अपघात झाला. यामध्ये कारचालक शालिग्राम वानरे (वय ६०) यांचा जागीच मृत्यू झाला तर कारमधील नुकतेच लग्न झालेले प्रथमेश वानरे (वय ३०), उत्कर्षा वानरे-कडू (वय २७) या दाम्पत्यासह कुसुम वानरे☞(पान २ वर)

### ■ अपघातस्थळ धोकादायक

अंजनगाव-आकोट या राष्ट्रीय महामार्गावर भंडाराज जवळील एका पुलासमोरील रस्ता दबल्यामुळे भरधाव असलेल्या वाहनांचे नियत्रण सुटून नेहमी अपघात होत आहेत. या मार्गाची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पाहणी करून मधोमध रोडचा दबलेला भाग बुजून टाकणे गरजेचे आहे. त्यामुळे पुन्हा अपघात होणार नाही.

# मनपाच्या जनसंवाद कार्यक्रमात गोंधळ

## आयुक्तांसमोर नगरसेवक खेडकर यांची तक्रारदाराला शिवीगाळ

### रहाटगांवच्या अतिक्रमणावरून वातावरण तापले

**अमरावती/ प्रतिनिधीः-** महापालिकेत आयोजित करण्यात आलेल्या जनसंवाद कार्यक्रमादरम्यान नगरसेवकाने महिला आयुक्तांसमोरच तक्रारदाराला आक्षेपार्ह शिवीगाळ केल्याने सारेच जण अवाक झाले. इतर नगरसेवकांनी समजूत काढल्यानंतर एकमेकांना शिवीगाळ करणारे नगरसेवक आणि तक्रारकर्ते एकमेकांपासून दूर गेले पण यामुळे आज मंगळवार २४ फेब्रुवारी रोजी महापालिकेतील वातावरण चांगलेच तापले. माहितीनुसार



मालमत्ता कर आकारणी, शहरातील साफसफाई आणि इतर प्रश्नांसदर्भात तक्रारींच्या सोडवणुकीसाठी महापालिकेत जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन मंगळवारी करण्यात आले होते. महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयाच्या प्रांगणात आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात☞(पान २ वर)

# भारवाडी येथील हत्या प्रकरणात दोघांना राजकोट येथून अटक

### स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला यश

**तिवसा/ प्रतिनिधीः-**
स्थानिक तिवसा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भारवाडी नजीक असलेल्या आयआरबी ट्रक लेबाय याठिकाणी राजकोट येथील ३०वर्षीय विमल संतोष अग्रावत याची (ता.२०) चाकूने हत्या केल्याचीं घटना घडली होती. या प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेच्या दोन पथकाने शोध मोहीम राबवित रोजकोट येथून दोनजणांना ताब्यात घेतले आहे.तपासा दरम्यान विमलच्या हत्येचा कट त्याच्याच दोन मित्रांने



जुन्या वैसमानातून राजकोट येथे रचल्याचीं माहिती पुढे आली आहे.माहिर माजीदभाई सोलंकी (वय २२,रा.हुसेनी चौक, राजकोट), राज वहिदभाई चव्हाण, (वय २२, रा. नानावटी चौक, राजकोट) असे ताब्यात घेण्यात आलेल्या संशयीतांचे नाव असून हत्येसाठी वापरण्यात आलेली जीजे ०३पिडी ०९११ क्रमांकाचीं बॅलेनो कार देखील जप्त करण्यात आली आहे.

मागील डिसेंबर २०२५ मध्ये मृत विमल याच्या अल्पवयीन☞(पान २ वर)

# तमिळनाडूत सापडली अपहृत अल्पवयीन

## राजापेठ पोलिसांनी सुखरूप दिले आईच्या ताब्यात

**अमरावती/ प्रतिनिधीः-** राजापेठ पोलीस ठाणे हद्दीतील अपहरण प्रकरणात १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचा तमिळनाडूत शोध लावून तिला सुखरूप अमरावतीत आणण्यात पोलिसांना यश आले. विधी प्रक्रिया पूर्ण करून मुलीला तिच्या आईच्या ताब्यात देण्यात आले.

बहलोलपूर परिसरातील ५० वर्षीय महिलेने १६ फेब्रुवारी रोजी तक्रार दिली होती की, तिची १७ वर्षीय मुलगी राजापेठ येथील होप हॉस्पिटलमधून कोणालाही



न सांगता निघून गेली आहे. त्यानुसार राजापेठ पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांनी या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक विपुल हुलावले यांच्याकडे सोपविला. तांत्रिक तपासादरम्यान मुलगी तमिळनाडूतील कोयंबटूर येथे असल्याची माहिती मिळाली. तत्काळ पोलीस पथक तेथे रवाना झाले. मात्र पोलिसांची चाहूल लागताच मुलगी तेथून निघून गेल्याचे समोर आले. पुढील तांत्रिक तपासात ती चेन्नई एग्मोर एक्सप्रेसने तिरुचिरापल्लीकडे जात असल्याचे निष्पन्न झाले. राजापेठ पोलिसांनी तात्काळ तिरुचिरापल्ली रेल्वे स्थानकावरील जीआरपीशी संपर्क साधून मुलीचा फोटो पाठविला☞(पान २ वर)

# मेळघाटातील मनरेगा मजुरांच्या खात्यात २८ कोटी जमा

**अमरावती/ प्रतिनिधीः-** होळीनिमित्त राज्यातील मनरेगा मजुरांसाठी ६७ कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला. यातील २८ कोटी ३९ लाख रूपयांचा निधी मेळघाटसाठी आज उपलब्ध झाला आहे. हा निधी मजुरांच्या खात्यात तातडीने जमा करण्यात आला आहे.

होळीनिमित्त आदिवासींना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने रोजगार हमी योजनेअंतर्गत मजुरांना मजुरी अदा करण्यासाठी ६७ कोटींचा निधी मंजूर केला. याची देयके कोषागाराकडे सादर करण्यात आली. त्यानुसार आज मजुरीची रक्कम थेट मजुरांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत अकुशल मजुरांना रोजगार उपलब्ध करून दिला जातो. मेळघाट या आदिवासीबहुल



जिल्ह्यांमध्ये मजुरांना काम देताना वाढीव लेबर बजेट मान्यतेचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे विचाराधीन असल्यामुळे काही कालावधीपासून मजुरी अदा करणे प्रलंबित होते. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन मजुरांची मजुरी तातडीने जमा केली आहे. मजुरीचा☞(पान २ वर)

# 'हे मना' आध्यात्मिक पुस्तकाचे लोकार्पण शनिवारी



**अमरावती/ प्रतिनिधीः-** जीवन यथार्थपणे जगण्याचे भान देणारी आणि आत्मबोधाचा प्रकाश प्रेरणा साहित्य साधना म्हणजे 'हे मना' आहे. या आध्यात्मिक पुस्तकाचे भव्य लोकार्पण शनिवार २८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता शेगाव नाका येथील अभियंता भवनात पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे, अशी माहिती आज मंगळवार २४ फेब्रुवारी रोजी पत्रकार परिषदेमध्ये गजानन पातुर्डे यांनी दिली. त्यांनी सांगितले की मनाशी केलेल्या आत्मीय समजातून सुद्धा अध्यात्माचा सूक्ष्म अर्थ☞(पान २ वर)



**हिरवाईच्या कुशीत फुललेला केशरी अग्नीपुष्प (आपला पळस). रंगपंचमी जवळ आल्याची चाहूल. अशी नैसर्गिक रंग उधळण फक्त शेत शिवारातच पहायला मिळते. (मोबाईल क्लिकः- अभि.प्रदीप अंधारे)**

# खुनाच्या प्रयत्नातील फरार मुख्य सूत्रधार जेरबंद

### गाडगेनगर डी.बी. पथकाची धडक कारवाई

अमरावती/प्रतिनिधीः-
जुन्या वादातून तरुणावर चाकू हल्ला करून खुनाचा प्रयत्न करणाऱ्या गुन्ह्यातील फरार मुख्य सूत्रधाराला गाडगेनगर पोलिसांच्या डी.बी. पथकाने अटक केली आहे. जवळपास महिनाभरापासून पोलिसांच्या रडारवर असलेला आरोपी अखेर सापळ्यात अडकला.

रामानुज राजाभाऊ हेरोडे (वय १८, रा. लक्ष्मी नगर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ३१ जानेवारी २०२६ रोजी रात्री भागवत सप्ताहातील पालखी सोहळ्यात जेवण करत असताना जुन्या वादाच्या कारणावरून आरोपी कुणाल वाघमारे व अंश वाघमारे यांनी चाकूने हल्ला केला. फिर्यादी पळून जात असताना त्याला इसळ यांच्या घराच्या अंगणात गाठून छातीच्या उजव्या बाजूस चाकू खुपसण्यात आला. ☞(पान २ वर)

# मंदिरात चोरी करणारा आरोपी अटकेत

### चोरीचा मुकुट व दुचाकी जप्त



**अमरावती/ प्रतिनिधीः-** शहरातील राजापेठ परिसरातील हनुमान मंदिरातून चांदीचा मुकुट चोरी केल्याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली असून त्याच्याकडून १ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी राजापेठ येथील एका इमारतीच्या पार्किंगमध्ये असलेल्या छोट्या हनुमान मंदिरातील मूर्तीवरील सुमारे २५० ग्रॅम वजनाचा, अंदाजे ४० हजार रुपये किंमतीचा चांदीचा मुकुट चोरीला गेल्याचे उघडकीस आले. याबाबत पवन रंगराव भेरडे (रा. राजापेठ) यांनी राजापेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला. ☞(पान २ वर)

# कुख्यात आरोपी शेख शहबाजवर एमपीडीए

### अमरावती मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध



**अमरावती/ प्रतिनिधीः-** आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर शहर पोलिसांनी मोठी प्रतिबंधात्मक कारवाई करत कुख्यात आरोपी शेख शहबाज उर्फ मुरारी शेख कलीम (वय २५, रा. झिब्राईल बाबा दर्गा परिसर, पठाण चौक, अमरावती) याला महाराष्ट्र प्रतिबंधक नजरकैद कायदा (एमपीडीए) अंतर्गत अमरावती मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध केले आहे.

सदर आरोपी २०१८ पासून विविध गंभीर गुन्ह्यांत सक्रिय असल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्याच्याविरुद्ध नागपुरी गेट, खोलापुरी गेट आणि सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात खून, मारहाण, घरफोडी, रात्रीची चोरी, अश्लील कृत्य, शांतता भंग, ☞(पान २ वर)

# नागझिरीजवळील भीषण अपघातातील जखमीचा मृत्यू

### -अज्ञात वाहन चालक फरार

**अमरावती/ प्रतिनिधीः-**
अमरावती-कारंजा महामार्गावरील नागझिरी ते ढंगारखेडा दरम्यान रविवारी रात्री झालेल्या भीषण अपघातातील गंभीर जखमी राहुल लक्ष्मण मुंदरे (वय ३५, रा. शेवती, पो. स्टे. नांदगाव पेठ) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यामुळे या अपघातातील मृतांची संख्या दोनवर पोहोचली असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

या अपघातात शेख शहजाद



शेख मोहम्मद (रा. कामुंजा) यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला होता. रविवारी रात्री साडेआठ ते नऊ वाजताच्या सुमारास दोघेही दुचाकीने कामुंजाकडे जात असताना अज्ञात भरधाव वाहनाने त्यांच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार ☞(पान २ वर)

# प्रवक्ते हनुमंत पवार यांच्यावरील हल्ल्याच्या युवक काँग्रेसतर्फे निषेध

### भाजपा सरकार गुंडगिरीला प्रोत्साहन देत असल्याचा केला आरोप



**अमरावती/ प्रतिनिधीः-** भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे प्रवक्ते हनुमंत पवार यांच्यावर पुणे येथील स्वारगेट मित्र मंडळ चौक परिसरात झालेल्या मारहाणीच्या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत युवक काँग्रेसतर्फे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनात म्हटले आहे की, एका वृत्तपत्राच्या कार्यालयाबाहेर झालेली ही घटना अत्यंत गंभीर व लोकशाहीविरोधी असून संबंधित घटनेचा व्हिडिओ सामाजिक माध्यमांवर प्रसारित झाला आहे. त्यामध्ये भाजपाचे तुषार दामगुडे यांनी उघडपणे मारहाण ☞(पान २ वर)

# प्रवीण पोटे यांची भाजप प्रदेश उपाध्यक्ष पदावर निवड



**अमरावती/ प्रतिनिधीः-** माजी राज्यमंत्री प्रवीण पोटे यांना भारतीय जनता पार्टीने मोठी जबाबदारी दिली आहे. प्रदेश उपाध्यक्ष म्हणून त्यांची नियुक्ती केली आहे. ही नियुक्ती करताना त्यांना विदर्भ विभागाची वेगळी जबाबदारी सोपवण्यात आली आहे.राजकीय क्षेत्रामध्ये प्रवीण पोटे यांचे फार मोठे प्रस्थ आहे. पोटे संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. गेल्या महानगरपालिका निवडणुकीत प्रवीण पोटे यांना अपेक्षित यश मिळाले नाही. पोटे यांचे समर्थक अनेक उमेदवारांना पराभवाचा सामना करावा लागला. या निवडणुकीत पोटे यांनी आमदार संजय खोडके यांच्याशी हात मिळवणी केली,असा आरोपही झाला होता. सोशल मीडियावरही याची चर्चा होती. मात्र पार्टीने डोळे झाक☞(पान २ वर)

# यवतमाळ नगर परिषदला मुंबईत पुरस्कार..!

### शहरात खड्डे, श्वानांची दहशत आणि निधीचा हिशोब गायब

### -'दिखाऊ सन्मान' की विकासाचा भ्रम?

**यवतमाळ/ प्रतिनिधीः-** मुंबईत द्वितीय पुरस्कार स्वीकारणारी यवतमाळ नगर परिषद आणि दुसरीकडे शहरात खड्ड्यांनी भरलेले रस्ते, सांडपाण्याची बिकट व्यवस्था, अपुरी दिवाबत्ती, वाढती मोकाट श्वानांची दहशत, दलित व अल्पसंख्याक वस्त्यांसाठी आलेल्या निधीच्या वापराबाबत प्रश्नचिन्ह या परस्परविरोधी चित्रामुळे शहरात संतापाची लाट उसळली आहे. 'पुरस्कार कागदोपत्री, त्रास प्रत्यक्षात' अशी भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.




नऊ कोटींचा हिशोब कुठे? असा सवाल उपस्थित होत असताना जीवन प्राधिकरणाच्या नऊ कोटी रुपयांच्या निधीचा स्पष्ट लेखाजोखा उपलब्ध नसल्याची चर्चा रंगत आहे. त्यातच दलित वस्ती विकास, अल्पसंख्याक वस्त्यांसाठी आलेला निधी, सार्वजनिक शौचालयांसाठी मंजूर झालेली रक्कम यांचा पारदर्शक तपशील जाहीर न झाल्याने गैरव्यवहाराच्या आरोपांना खतपाणी मिळत आहे. नगरपरिषदेकडे नियमित सफाई कर्मचारी असताना कंत्राटी सफाई कामगारांची ☞(पान २ वर)